रायगड, शनिवार, दि. ६ सप्टेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

**उद्या अंक नाही!**
अनंत चतुर्दशीनिमित्त शनिवार, दि. ६ सप्टेंबर २०२५ रोजी कृषीवल कार्यालयाला सुट्टी असल्याने रविवार, दि. ७ सप्टेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची सर्व वाचक, वितरक, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक




**रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
दहा दिवसांच्या पाहुणचारानंतर उद्या शनिवार, दि. ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला बाप्पाला निरोप देण्यात येणार आहे. जिल्ह्यामध्ये १८ हजार २११ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात येणार आहे. त्यात घरगुती १८ हजार ४२ आणि सार्वजनिक १६९ मूर्तींचा समावेश आहे. 'गणपती बाप्पा मोरया ... पुढच्या वर्षी लवकर या' असा जयघोष करीत नदी, तलाव व समुद्रात मूर्तींचे विसर्जन केले जाणार आहे. यावेळी गणरायाला निरोप देण्यासाठी भाविकांच्या आलोट गर्दी असणार आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात केला जाणार आहे.

जिल्ह्यामध्ये एक लाखांहून अधिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना २७ ऑगस्टला झाली होती. दहा दिवस बाप्पाची मनोभावे पूजा करण्यात आली. जिल्ह्यातील काही भागांमध्ये मंडळाच्यावतीने सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबवून जनजागृती करण्याचा

•> पान २ वर

## सुहाना खान जमीन खरेदी प्रकरण

# सरकारी जमिनी 'रडार'वर

**। रायगड । प्रतिनिधी ।**
**जिल्ह्यातील सरकारी जमिनींचा भाडेपट्टा प्रकार आता सरळ-सरळ अब्जावधींचा काळाबाजार ठरत असल्याचे शाहरुख खानची लेक सुहाना खान हिच्या जमीन खरेदी प्रकरणावरुन दिसून येते. सरकारने जनहिताच्या नावाखाली दिलेल्या जमिनी आज थेट धनिक आणि सेलिब्रिटींच्या खिशात शिरत आहेत. सामान्य नागरिकांसाठी राखीव सरकारी संपत्तीची ही उघड लूट असून, प्रशासन मात्र डोळ्यावर कातडी ओढून गप्प बसलेलं आहे.**


अलिबाग तालुक्यात थळ येथील सर्व्हे क्र. ३४५/२, क्षेत्रफळ ०.६०.७० हे.आर. ही जमीन १९६८ मध्ये नारायण विश्‍वनाथ खोटे यांना लागवडीसाठी अटींसह देण्यात आली होती. स्पष्ट अट होती की, जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय विक्री, तबादला किंवा गहाण व्यवहार करता येणार नाही. पण, धक्कादायक बाब म्हणजे, या जमिनीवर थेट १२ कोटी ९१ लाख रुपयांचं साठेखत तयार करण्यात आलं आहे. जमीन अजून विकली गेलेली नाही, पण व्यवहाराची पायाभरणी उघडपणे झाली आहे. म्हणजे नियम, कायदे आणि अटी पायदळी तुडवण्यात येऊन थेट करोडोंचे सौदे खुलेआम केले जात आहेत.

सगळ्यात मोठा प्रश्न म्हणजे, जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी नसताना इतक्या मोठ्या रकमेचं साठे खत तयार कसं झालं? असा व्यवहार कोणाच्या वरदहस्ताशिवाय शक्य आहे? आणि गरीब-शेतकऱ्यांसाठी राखीव असलेली सरकारी जमीन धनिक-सेलिब्रिटींच्या खिशात पोहोचतेय, याचं उत्तर कोण देणार?

ॲड. विवेक ठाकूर यांनी या व्यवहाराची औपचारिक तक्रार प्रशासनाकडे दाखल केली आहे. पण, प्रशासनाच्या कामकाजाचा अनुभव सांगतो की, अशा तक्रारी फाईलमध्ये गाडल्या जातात आणि अब्जावधींच्या जमिनींचा काळाबाजार मात्र सुरूच राहतो, अशीदेखील चर्चा आहे. हा प्रकार म्हणजे केवळ सामान्य नागरिकांची फसवणूक नाही, तर सरकारचा महसूल थेट लाटण्याचा खेळ आहे.

### कठोर कारवाई करा

कवडीमोल दराने वाटप केलेल्या जमिनी आज कोट्यवधींना विकल्या जात आहेत. सामान्य नागरिक डोळे भरून बघतोय, सरकारचं सोनं खासगी तिजोरीत जातंय आणि प्रशासन मात्र झोपेचं सोंग घेत आहे. आता तरी सरकार जागं होणार का? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आहे. सरकारी जमिनींच्या या उघडउघड काळाबाजाराला आळा घालायचा असेल तर तातडीने सर्व अशा जमिनींचं फेर सर्वेक्षण व्हायला हवं, महसूल वसुली मोहीम राबवली जावी आणि नियम तोडणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हायला हवी. अन्यथा सरकारी जमिनींची ही लूट पुढे आणखी वेगाने वाढणार आहे आणि सामान्य जनता मात्र कायमची भरडली जाणार आहे.



### शहानिशा होणे गरजेचे

ज्या १०७ जणांना जमिनींचे वाटप करण्यात आले आहे. ती जमीन त्यांच्याच ताब्यात आहे का?, दिलेल्या प्रयोजनासाठीच तिचा वापर केला जात आहे का? याची सरकारी पातळीवर शहानिशा करणे क्रमप्राप्त आहे. त्यामध्ये दोषी आढळल्यास त्या जमिनी सरकारने परत ताब्यात घ्याव्यात. या भाडेपट्ट्यांच्या जमिनींवर बेघरांसाठी घरकुल योजना किंवा म्हाडा, सिडकोच्या योजनेमधून अत्यंत स्वस्त निवासी इमारती उभाराव्यात. यासाठी अशा सरकारी जमिनींसाठी एक निश्‍चित आणि सर्वसमावेशक धोरण सरकारने आखणे गरजेचे आहे, अन्यथा धनिकांकडे अशा जमिनी जातील आणि हे चक्र असेच सुरु राहील.

- **कवडीमोल दराने दिलेल्या जमिनींचे फेरसर्वेक्षण होणे गरजेचे**
- **सरकारचा महसूल लाटण्याचा खेळ**

## वेधक

### शिल्पा शेट्टी-राज कुंद्राच्या अडचणीत वाढ

**मुंबई :** बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा व्यावसायिक पती राज कुंद्रा यांच्याविरूद्ध मुंबई पोलिसांनी लूक आऊट नोटीस काढली आहे. शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रावर जवळपास ६० कोटी रूपयांचा फ्रॉड केल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा फ्रॉड त्यांच्या बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड या आता अस्तित्वात नसलेल्या कंपनीत गुंतवणूक डील संदर्भातील आहे. दरम्यान, व्यावसायिक दीपक कोठारी यांनी राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टीने २०१५ ते २०२३ दरम्यान त्यांच्याकडून जवळपास ६० कोटी रूपये घेतल्याचे सांगितले.

### अपघातात महिला ठार

**म्हसळा :** म्हसळा-श्रीवर्धन रस्त्यावर झालेल्या भीषण अपघात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला असून, एक महिला गंभीर जखमी झाली. हा अपघात शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास वाडंबा फाट्यावर घडला. किशोरी किसन जावळेकर, वय ४२ वर्षे, रा. केरडे ही महिला माहेरहून एसटी बसने परत येत वाडंबा बसथांब्यावर उतरली. त्याचवेळी श्रीवर्धन येथील प्राजक्ता प्रशांत गोवलकर ही महिलादेखील उतरली. या दोघीही रस्ता ओलांडत असताना किशोरी हिला म्हसळाच्या दिशेने येणाऱ्या एमएच ०३ बीसी ९४६२ या भरधाव कारने धडक दिली. गंभीर जखमी झाल्याने त्या जागीच ठार झाल्या.

# जमीन विक्रीतून शेतकऱ्यांची फसवणूक

## । नोटरीच्या माध्यमातून जमिनीची विक्री । करोडोंचा महसूल बुडाला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत येथे पुलाची वाडी येथे कोकण कृषी फलोत्पादन सहकारी संस्था यांच्या माध्यमातून निवृत्त कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिक यांनी गुंतवणूक केली होती. भूखंडाची विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. दरम्यान, ॲग्रो टूरिझमच्या नावाखाली हे सर्व सुरू असून, सदर समितीवरील संचालकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी पुढे आली आहे. या सहकारी सोसायटीने २५५ एकर जमिनीवर सर्व भूखंडांची नोटरीच्या माध्यमातून विक्री केली असून, हजारो भूखंडांची नोंदणी उपनिबंधक कार्यालयात झाली नसल्याने शासनाचा महसूल बुडाला आहे.

### काय आहेत मागण्या?

- **महाराष्ट्र शासनाचा कोट्यवधींचा महसूल लंपास करणारा घोटाळा आहे. समिती बरखास्त करून प्रशासक नेमण्यात यावा.**
- **सर्व व्यवहारांची विशेष चौकशी करून शासनाचा महसूल वसूल करावा.**
- **सदस्यांच्या भूखंड व घरांची कायदेशीर मालकी नियमित करून त्यांचे हक्क संरक्षित करावेत.**
- **ज्येष्ठ नागरिकांवरील अन्याय व त्रास थांबवावा.**

> **सोसायटीमध्ये घरे घेण्यासाठी जमीन खरेदी करणाऱ्या हजारो भूखंडधारकांची फसवणूक झाली आहे. शासनाचा मुद्रांक शुल्क बुडविला असून, संस्थेचे संचालक बरखास्त करून प्रशासक नेमण्यात यावा.**
> **- मनोज चंदन, भूखंडधारक**

कोकणातील मोठा भूखंड घोटाळा समोर आला आहे. कोकण कृषी फलोद्यान सहकारी संस्था (नोंदणीकृत) या संस्थेमध्ये शेकडो ज्येष्ठ नागरिक आणि निवृत्त कुटुंबांसाठी स्कीम जाहीर केली. या फलोत्पादन सोसायटीकडून कार्यरत असलेल्या व्यवस्थापन समितीने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याची घटना पुढे आली आहे. कोकण कृषी फलोत्पादन सामूहिक शेती सहकारी संस्था म्हणून नोंदली गेली होती. संस्थेची नोंद झाली आहे, पण व्यवस्थापन यांच्याकडून फार्महाऊस आणि प्लॉटिंग स्वरूपात सोसायटीमध्ये रूपांतरित केले. पुढे संस्थेने बेकायदेशीरपणे आपल्या मालकीचा २५५ एकर जमिनीवर १३५०० चौरस फूट आकाराचे भूखंड पाडले आणि नंतर त्यांची विक्री केली. त्यासाठी कोणतीही मंजूर योजना नसताना डांबरी रस्ते केले गेले आणि सदस्यांना शेतजमिनीवर शेतघरं बांधायला प्रवृत्त केले.

•> पान २ वर

# मुंबईत बॉम्बस्फोटाची धमकी



- **३४ गाड्यांमध्ये मानवी बॉम्ब ठेवल्याचा संदेश**
- **मुंबईसह राज्यभर पोलीस हाय अलर्टवर**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
मुंबईत उद्याच्या अनंत चतुर्दशीच्या गणपती विसर्जनाची जोरदार तयारी सुरू असतानाच पोलिसांना धमकीचा संदेश आल्याने खळबळ उडाली आहे. शहरातील ३४ वाहनांमध्ये मानवी बॉम्ब ठेवण्यात आले आहेत आणि या स्फोटामुळे संपूर्ण मुंबई हादरून जाईल, अशा धमकीचा संदेशात देण्यात आला आहे. लष्कर-ए-जिहादी नावाच्या एका संघटनेने हा संदेश पाठवल्याचे सांगितले आहे. या घटनेनंतर मुंबई पोलीस पूर्णपणे सतर्क झाले असून, शहरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पोलिसांच्या वाहतूक शाखेला व्हॉट्सॲपवर आलेल्या धमकीच्या संदेशानुसार, मुंबईमध्ये ३४ वेगवेगळ्या गाड्यांमध्ये मानवी बॉम्ब पेरण्यात आले आहेत. यामध्ये १४ पाकिस्तानी दहशतवादी भारतात घुसले असून, हे बॉम्बस्फोट घडवून आणणार आहेत, असेही म्हटले आहे. या स्फोटांसाठी ४०० किलो आरडीएक्सचा वापर केला जाईल, असा दावाही या संदेशात करण्यात आला आहे. हा धमकीचा संदेश मिळाल्यानंतर मुंबई पोलीस तात्काळ सतर्क झाले आहेत. मुंबईसह संपूर्ण राज्यात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. धमकीच्या या संदेशाची मुंबई पोलीस गंभीर दखल घेत असून, सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. या धमकीच्या संदेशामागील सत्यता तपासण्याचे काम सुरू आहे.

•> पान २ वर

# राज्यात पावसाचा जोर वाढणार

## हवामान विभागाचा इशारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
राज्यभरात गेल्या काही दिवसांपासून पावसाने काहीशी विश्रांती घेतल्याचे चित्र असून, आता पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढणार आहे, असा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. राज्यातील काही भागात विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने राज्यात पावसासाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. पुणे, ठाणे, रायगड, घाटमाथा भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

यंदाच्या वर्षी राज्यात समाधानकारक पाऊस झाल्याचे पाहायला मिळत आहे. कोकणाला तर पावसाने अक्षरशः झोडपून काढल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, सर्वत्र चांगला पाऊस झाल्याने राज्यातील बरीचशी धरणे देखील पूर्ण क्षमतेने भरली आहेत. दरम्यान, पुढील काही दिवस राज्यभरात जोरदार पाऊस होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे.




# दि.बा. पाटलांचा सरकारला विसर?

## विमानतळ नामकरणावर मोदी-फडणवीस गप्प

**। उरण । प्रतिनिधी ।**
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाचा मुद्दा म्हणजे फक्त जनतेला झुलवत ठेवण्याचं राजकारण सुरू आहे, असा आरोप होत आहे. लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव या विमानतळाला द्यावे, ही उरणसह रायगड-ठाणे-नवी मुंबईच्या जनतेची दशकांपासूनची ठाम मागणी. पण, गुरुवारी उरण जेएनपीएतील सिंगापूर कंटेनर टर्मिनलचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले. त्यादरम्यान, विमानतळ नामकरणावर एक शब्दही उच्चारला

•> पान २ वर




## कामाच्या तासात वाढ करण्याच्या निर्णयाला विरोध | कामगारांमध्ये असंतोषाचे वातावरण

# बेकारीचे संकट वाढण्याची भीती

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
खासगी क्षेत्रातील उद्योगांमध्ये कामाचे तास वाढविण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. नऊ तासांवरून १२ तास करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. या निर्णयामुळे कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होण्याबरोबरच बेकारी वाढण्याची भीती शेतकरी कामगार पक्षाचे राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक यांनी व्यक्त केली आहे.

राज्य सरकारने खासगी क्षेत्रातील उद्योगांमध्ये नऊ तासांवरून १२ तास करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे पडसाद अलिबागसह रायगड जिल्ह्यात उमटू लागले आहेत. राज्य सरकारने घेतलेला निर्णय चुकीचा आहे. जुलमी, शोषण करणारी भांडवलशाही व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारचा आहे. असंख्य कामगारांनी लढा देऊन कामगार कायदे तयार केले. ते कायदे मोडीत काढून कामगार संघटना, कामगार व त्यांचे कुटुंब उद्ध्वस्त करण्याचा डाव सरकारचा आहे. कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. सरकारच्या या निर्णयाला समस्त कामगारांकडून विरोध दर्शविला जात आहे.



### कामगारांची पिळवणूक

**सरकारचा हा निर्णय मोठ्या उद्योगांचे हित जपणारा आहे. बारा तास काम केल्याने कामगारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होईल. कामगार कपात होईल. पर्यायाने बेकारी वाढेल. आधीच किमान वेतन हे किमान गरजांच्या तुलनेने कमी आहे. त्यात बारा तास काम करावे लागल्यास अधिक कामगारांची पिळवणूक होईल, अशी प्रतिक्रिया प्रदीप नाईक यांनी व्यक्त केली आहे.**

रायगड जिल्ह्यामध्ये सुमारे दोन हजारांहून अधिक उद्योगधंदे आहेत. तळोजा नावाडापासून ते खोपोली, खालापूर,


•> पान २ वर

# महावितरणच्या हलगर्जीपणाचा फटका

- शॉक लागून दुधाळ जनावरे दगावली
- जांभुळपाडा विजयनगर येथील दुर्घटना
- शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान

**। पाली । प्रतिनिधी ।**

**सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा हद्दीत विजयनगर गावाजवळ वीजवाहिनी तुटून विजेचा धक्का बसल्याने दूध व्यावसायिकाच्या तीन म्हशी व एक गाय मरण पावल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. त्यामुळे यात दूध व्यावसायिक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून, सदरची घटना ही केवळ महावितरण कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे घडली असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.**



शुक्रवारी (दि.५) सायंकाळच्या सुमारास सदरची घटना घडली असून, यास सर्वस्वी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी जबाबदार असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेल्या आठ दिवसांपूर्वी विजयनगर येथे विजेच्या खांबावरील वीज प्रवाह चालू असलेली वीजवहिनी तुटून जमिनीवर गवतात पडल्याच्या अवस्थेत स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आली. सदरची बाब तात्काळ नागरिकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना कळवली; परंतु याकडे महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अक्षम्य दुर्लक्ष केल्याने शुक्रवारी (दि.५) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ती म्हशी व एक गाय या दुधाळ जनावरांना तुटलेल्या वीज वाहिनीचा जबर धक्का लागून जागीच मृत्यू झाला. यामध्ये संतोष बबन वाळगुडे यांच्या तीन म्हशी व मंगेश दगडू वालगुडे यांची एक गाय अशा चार दुधाळ जनावरांचा समावेश असून, लाखो रुपयांचा आर्थिक फटका विजयनगर येथील दूध व्यावसायिकांना बसला आहे. तरी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना संबंधित विभागाने तात्काळ आर्थिक मदत करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

> **सदर ठिकाणी विजेच्या खांबावर एलटी वायरचा कंडक्टर तुटल्याने वीज वाहिनी तुटून खाली पडली, त्यामुळे जनावरांना विजेचा धक्का बसून ती मरण पावली. घटनास्थळी उपशाखा अभियंता श्री. भंडारे यांना तात्काळ पाठवून पंचनामा करण्यास सांगितले आहे.**
> **– बालाजी चात्रे, शाखा अभियंता, पाली सुधागड**

> **शेतकऱ्यांच्या नुकसानीस सर्वस्वी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी व त्यांच्याकडून शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरून घेण्यात यावे.**
> **– नरेश गायकवाड, अध्यक्ष, ऑल इंडिया पँथर सेना रायगड**

## माजी आ. सुर्वेंचे गावकरी भाजपावासी

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते तुकाराम सुर्वे यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश झाल्यावर काही दिवसातच सुर्वे यांच्या हुनरवेली येथील ग्रामस्थांनी भाजपमध्ये प्रवेश केला. अगोदर काँग्रेस पक्ष त्यानंतर शिवसेनेत प्रवेश असा राजकीय प्रवास करणाऱ्या सुर्वेंना तत्कालीन आमदार शाम सावंत यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर २००७ झालेल्या पोटनिवडणुकीत शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी श्रीवर्धन मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची संधी दिली व तुकाराम सुर्वे आमदार झाले. २००९ मध्ये त्यांना सुनील तटकरे यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला होता.

# रेवदंडा बाजारपेठेत दिवसाढवळ्या फसवणूक

- व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा बाजारपेठेत मंगळवारी (दि. २) दुपारी उघडपणे फसवणुकीचा प्रकार घडल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दुपारी २.४५ वाजता राहुल इलेक्ट्रॉनिक्स या दुकानात आलेल्या एका ग्राहकाने खोटा मोबाईल मेसेज दाखवून तब्बल ७,५०० रुपयांचा कंपनीचा स्पीकर घेऊन पलायन केले.

''पैसे स्कॅनरवर जात नाहीत, मोबाईल नंबर द्या'' असे सांगून त्या ग्राहकाने संगीता राजेंद्र जैन यांचा नंबर घेतला. लगेचच मोबाईलवर पैसे ट्रान्सफर झाल्याचा खोटा मेसेज दाखवून तो फरार झाला. या घटनेमुळे दुकानाचे मालक राहुल राजेंद्र जैन यांचे आर्थिक नुकसान झाले असून, याबाबतची तक्रार त्यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. महत्त्वाचं म्हणजे, या संशयित व्यक्तीचा चेहरा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला असूनही बाजारपेठेत अशी फसवणूक दिवसाढवळ्या घडणे धक्कादायक आहे. स्थानिक व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, ''बाजारपेठेत पोलीस गस्त नसल्याने गुन्हेगारांचे धाडस वाढले आहे. दिवसाढवळ्या फसवणूक होणे म्हणजे आमच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह आहे.'' व्यापारी वर्गाने पोलीस प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली असून, आरोपीला लवकरात लवकर पकडून कठोर शिक्षा करावी, असा आवाज उठवला आहे. दरम्यान, या घटनेची चर्चा सर्वत्र रंगली असून, व्यापारीवर्गात ''उद्याचा बळी मी तर नाही ना?'' अशी भीती निर्माण झाली आहे.

# उरणमधील पुलावर मृत्यूचे खड्डे

**जेएनपीए, सिडको, सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष**

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील बहुतांश पुलांवर अवजड वाहतुकीमुळे सध्या खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे पुलावरील खड्ड्यात वारंवार अपघाताचे प्रमाण वाढले आहे. मृत्यूचे खड्डे ठरणाऱ्या या गंभीर समस्येकडे जेएनपीए, सिडको आणि सार्वजनिक बांधकाम खात्याच्या प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होताना दिसत आहे. पर्यायाने या खड्ड्यांमुळे कोणाचा जीव जाण्याअगोदर हे खड्डे चांगल्या प्रकारे बुजविण्याची मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.



तालुक्याच्या पूर्व विभागाला पश्चिम विभागाशी जोडण्यासाठी ३० वर्षांपूर्वी खोपटा पूल बांधण्यात आले. मात्र, जेएनपीटीच्या माध्यमातून विकास होत असताना पूर्व विभागाचा विकास होत गेला आणि या परिसरात मोठ मोठे सीएफएस कंटेनर यार्ड तयार झाले. पर्यायाने हा पूल पूर्व भागातील जनतेच्या प्रगतीसाठी लाईफलाईन ठरला. मात्र, वाढत्या छोट्या-मोठ्या प्रकल्पांमुळे वाहनांची वर्दळ वाढत गेली. या वाढत्या वाहनांच्या प्रमाणापेक्षा जास्त अवजड वाहतुकीमुळे येथील खोपटा पुलावर मृत्यूचे खड्डे निर्माण झाले आहे. हे खड्डे एवढे मोठे आहेत की, त्यामुळे अनेक प्रवाशांचे कमरेचे आजार उद्‌भवून वाहनेही खराब झाली आहेत. तसेच या खड्ड्यांमध्ये पाणी साचून खोपटा पूल कमकुवत झाला आहे.

जेएनपीए बंदर आणि सिडको प्रशासनाने देश परदेशात मालाची निर्यात-आयात सुरळीत करण्यासाठी उरण, मुंबई, नवी मुंबई आणि पनवेल शहरांना जोडण्यासाठी उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात उड्डाण पुलाची उभारणी केली आहे. मात्र, जेएनपीए बंदर आणि सिडको प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सध्या पावसाळ्यात नवघर, बोकडविरा, न्हावा शेवा पोलीस ठाणे, करळ, जासई, चिर्ले, पागोटे, धुतूम या परिसरातील पुलावर खड्डे पडले आहेत. त्यामुळे खड्ड्यांतून मार्गक्रमण करणाऱ्या वाहनांना अपघाताला कारणीभूत ठरत आहेत. तरी जेएनपीए बंदर, सिडको आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर पुलाची पाहणी करून पुलावर पावसाचे पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घेऊन पुलावरील खड्डे अद्ययावत बुजविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

## सफाई कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा

**खोपोली :** खोपोली शहरात शास्त्री नगरमधील इतराज कुटुंबाने नेहरू गार्डनमध्ये गणेशमूर्तीचे कृत्रिम तलावात विसर्जन करुन निर्माल्य तेथील कलशात समर्पित केले. विसर्जनानंतर ते आपल्या घरी गेले, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, त्यांनी श्रीगणेशाच्या गळ्यात घातलेली २० ग्रॅमची सोनसाखळी निर्माल्यासोबत गेली. त्यानंतर त्यांनी तातडीने विसर्जन स्थळी जाऊन तेथे उपस्थित खोपोली नगरपालिकेचे आरोग्य विभागाचे मुकादम मंगेश चंदर वाणी यांना ही बाब सांगितली. त्यांनी सफाई कर्मचारी सुनील धाकू गायकवाड यांच्याकरवी निर्माल्य कलशातल्या पिशव्यांची तपासणी करून त्यात भूलचुकीने हारासोबत गेलेली सोनसाखळी शोधून इतराज कुटुंबाच्या हवाली केली.

# पुलाच्या दुरुस्तीसाठी लष्कराची मदत घ्या

- दिलीप जोग यांचे मुख्य सचिव, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रोहा मार्गावरील नांगरवाडी व सुडकोली येथील पूल कमकुवत असल्याने बांधकाम खात्याच्या आदेशानुसार बंद ठेवण्यात आलेली एस.टी. वाहतूक भारतीय सेना दलाच्या अभियांत्रिकी विभागाची मदत घेऊन, तातडीची उपाययोजना करुन सुरु करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिलीप जोग यांनी राज्याचे मुख्य सचिव, जिल्हाधिकारी-रायगड व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या काही वर्षांपासून रायगड जिल्ह्यातील धोकादायक स्थितीत असलेल्या अलिबाग-रोहा मार्गावरील सुडकोली तसेच नांगरवाडी येथील पूल खचल्याने ऐन गौरी गणपती सणांच्या काळात एसटी वाहतूक बंद ठेवण्यात आल्याने याचा दररोज ये-जा करणाऱ्या जनतेच्या दळणवळणावर विपरीत परिणाम झाला असून, शालेय विद्यार्थी, नोकरदार, कामगारांना समस्येला सामोरे जावे लागत आहे.

जिल्ह्यातील व तालुक्यातील असलेल्या या धोकादायक पुलांकडे सार्वजनिक बांधकाम खात्याने सातत्याने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने ऐन सणासुदीच्या काळात येथील जनतेला त्रास सहन करावा लागत असल्याचे बोलले जात आहे. अद्यापही सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नी पुलावरुन वाहतूक सुरु करण्यात अन्य पर्याय शोधण्यात उदासीनता दिसून येत असून, पावसाळ्यानंतर टेंडर्स निघतील, बायपास रस्ते काढले जातील, यात तीन-चार महिन्यांचा कालावधी जाईल.

यासाठी सर्वसामान्य जनतेला होणारा त्रास लक्षात घेऊन संबंधित बांधकाम खात्याने भारतीय सेना दलाच्या अभियांत्रिकी विभागाशी तातडीने संपर्क साधून, मदत घेऊन या पुलावरुन लवकरात लवकर एसटी वाहतूक सुरु करण्यात योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी खड्डे दिलीप जोग यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# पोलीस बंदोबस्तात जनसुनावणी

**टोरंटो वीज प्रकल्पाच्या सुनावणीला विरोध**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात टोरांटो कंपनीचा वीज प्रकल्प येऊ घातला आहे. या प्रकल्पाची पर्यावरणविषयक जनसुनावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने घेतली.दरम्यान या जनसुनावणीत जनतेने चोहो बाजूंनी विरोध दर्शवला असून, पुन्हा सुनावणी घेण्याची मागणी केली आहे. प्रचंड पोलीस बंदोबस्तात रायगड उपउपजिल्हाधिकारी यांनी ही सुनावणी घेतली.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि उप प्रादेशिक कार्यालय रायगड यांच्याकडून पर्यावरणविषयक जनसुनावणी गौरकामत येथे घेण्यात आली. कर्जत तालुक्यामध्ये टोरेंटो पीएचएस तीन प्रायव्हेट लिमिटेडद्वारे प्रस्तावित साई डोंगर एक (३००० मेगावॅट) ऑफ स्ट्रीम ओपन लूप उदचंद जलविद्युत प्रकल्प पीएससी) प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पाची पर्यावरणविषयक जनसुनावणी सर्वे क्रमांक २७ गौरकामत येथे घेण्यात आली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्यासह महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी उपस्थित होते. जनसुनावणीसाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मोठा गदारोळ या जनसुनावणीमध्ये दिसून आला. त्यामुळे बंदोबस्तात असलेले कर्जतचे पोलिस निरीक्षक संदीप भोसले हे स्वतः जनतेत उभे राहून शांतता बाळगण्याची सूचना करीत होते. यावेळी शेतकऱ्यांना आपले मनोगत व्यक्त करण्याची संधी देण्यात आली व त्यांचे मत मांडण्याची त्यांना पूर्णपणे मुभा देण्यात आली होती. यावेळी जिथे प्रोजेक्ट होणार आहे, तेथील शेतकऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात असे अनेक शेतकऱ्यांनी आपले मत मांडले आणि संपूर्ण शेतकऱ्यांना ही माहिती पोहोचली नसल्याने शेतकरी यांनी जनसुनावणी पुन्हा घ्या, अशी मागणी केली.

पान १ वरून

## बाप्पा निघाले गावाला!

प्रयत्न आला आहे. त्यात झाडे लावा झाडे जगवा, मुलगी शिकली प्रगती झाली असे अनेक संदेश उपक्रमातून देण्यात आले. तसेच काही मंडळांमार्फत चांद्रयान, देशभक्तीचे देखावे उभे करण्यात आले होते. लोकगीत असलेले बाल्या नृत्यांचे सादरीकरण, भजन, कीर्तनदेखील या कालावधीत करण्यात आले. त्यामुळे दहा दिवस वातावरण भक्तीमय झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले. मनोभावे सेवा केल्यानंतर अनंत चतुर्दशीच्या दिवशी शनिवारी (दि.६) बाप्पाला वाजत गाजत निरोप देण्यात येणार आहे. ढोल-ताशांच्या गजरासह पारंपरिक वाद्यांच्या तालावर नाचत सायंकाळी चारनंतर जिल्ह्यातील अलिबागसह अनेक भागात मिरवणूक काढण्यात येणार आहे.

गणेशमूर्तींचे विसर्जन व मिरवणूक सोहळा आनंदात व शांततेत व्हावे यासाठी रायगड पोलिसांमार्फत ग्रामीण भागासह शहरी भागात कडेकोट बंदोबस्त ठेवला जाणार आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपविभागीय अधिकारी सात, पोलीस निरीक्षक २९, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक १२८, पोलीस अंमलदार एक हजार ९००, होमगार्ड ५००, राज्य राखीव पोलीस दलाचे पथक तैनात करण्यात येणार आहे. गर्दीमध्ये कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी साध्या वेशात पोलीस नागरिकांमध्ये सामील केले जाणार आहे.

## जमीन विक्रीतून शेतकऱ्यांची फसवणूक

मात्र, जमिनीचे नोंदणीकृत कागद न देता केवळ शेअर सर्टिफिकेट देण्यात आले. परंतु, जमिनीचा ७/१२ उतारा संस्थेच्या नावावरच ठेवला गेला.

कोकण कृषी फलोत्पादन सहकारी सोसायटीकडून शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि निवृत्त कर्मचारी असून, आपल्या सोसायटीमध्ये सदस्य झालेल्या भूखंडधारकांना जमिनीची मालकी दिली नाही. तसेच सर्व भूखंड विक्री आणि खरेदी व्यवहार करताना त्यांची उपनिबंधक कार्यालयात नोंदणी केली नाही. उलट, केवळ ५०० रुपयांच्या मुद्रांक शुल्क पेपरवर नोटरी अफिडेविट करून घेण्यात आले. त्यातून सरकारचा स्टॅम्प ड्युटी आणि रजिस्ट्रेशन टाळल्यामुळे सरकारला १०० कोटींपेक्षा जास्त महसूल तोटा झाला आहे. तहसीलदारांचे कर आकारणीबद्दल नोटीस आल्या; परंतु त्या नोटीस सोसायटी व्यवस्थापन यांनी दडवून ठेवल्या. महसुली न्यायालयीन वादातील ३२ग जमीनही बेकायदेशीररित्या ताबा कब्जात घेत कोणतीही परवानगी न घेता त्या जमिनीची विक्री केली आहे. या फसवणुकीमुळे बहुतेक ज्येष्ठ व निवृत्त नागरिकांचे आयुष्य उद्‌ध्वस्त झाले आहे. अनेकांनी शहरातील घरे विकून येथे स्थायिक होण्याचे स्वप्न पाहिले होते, पण आज ते कायद्याच्या कचाट्यात सापडले आहेत.

## दि.बा. पाटलांचा सरकारला विसर?

गेला नाही. त्यामुळे दि.बांच्या नावाचा सरकारला विसर पडल्याची चर्चा आहे.

जनतेची मागणी दुर्लक्षित करणं म्हणजे दि.बा. पाटलांचा आणि स्थानिकांचा थेट अपमान आहे. मराठा आरक्षणासाठी हजारोंनी एकजुटीने रस्त्यावर उतरून सरकारला हादरवले. पण, आपल्या समाजाने दि.बां.च्या नावासाठी तितकाच लढा दिला का? नाही! म्हणूनच सरकारला टाळाटाळ करणं सोपं जातंय. आपण उठलो नाही, तर उद्या या विमानतळाला कुणा उद्योगपतीचं नाव मिळेल आणि जनता बघत राहील, असे बोलले जात आहे. त्यात भर म्हणजे प्रकल्पग्रस्तांच्या रोजगाराचा प्रश्न अद्याप जिवंत आहे. विमानतळावर स्थानिकांना नोकरी मिळावी म्हणून प्रशिक्षण केंद्राची मागणी होतेय, पण सत्ताधारी बहिरे-आंधळे बनले आहेत. हे सगळं म्हणजे सरळसरळ जनतेवर अन्याय आहे, असा आरोप करण्यात येत आहे. दि.बा. पाटलांच्या नावासाठी आणि स्थानिक रोजगारासाठी आता एकजूट होऊन रस्त्यावर उतरलंच पाहिजे. अन्यथा 'करू करू' म्हणत सरकार दुसरंच नाव लादेल आणि आपण मुकाट पाहात राहू, अशी चर्चा आहे.

## बेकारीचे संकट वाढण्याची भीती

पाताळगंगा, नागोठणे, थळ येथील आरसीएफ, उसर येथील गेल, वडखळ, साळाव येथील जेएसडब्ल्यू, नागोठणे येथील रिलायन्स, रसायनीमधील एचपी, रोहा धाटाव, महाड एमआयडीसी, रोहा अशा अनेक ठिकाणी वेगवेगळे प्रकल्प, उद्योगधंदे आहेत. या प्रकल्पांमध्ये सुमारे तीन लाखांहून अधिक कामगार आहेत. या प्रकल्पांमध्ये कंत्राटी कामगारांची संख्या मोठ्या संख्येने आहे. आठ ते नऊ तास कामगार काम करीत आहेत. सरकारच्या या निर्णयाबाबत रायगड जिल्ह्यात कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. सरकारच्या या निर्णयाविरोधात कामगार व कामगार संघटना रस्त्यावर उतरण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

बारा तास काम केल्याने कामगारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होईल. कामगार कपात होईल. पर्यायाने बेकारी वाढेल. आधीच किमान वेतन हे किमान गरजांच्या तुलनेने कमी आहे. त्यात बारा तास काम करावे लागल्यास अधिक कामगारांची पिळवणूक होईल, अशी प्रतिक्रिया प्रदीप नाईक यांनी व्यक्त केली आहे.

सरकारचा हा निर्णय मोठ्या उद्योगांचे हित जपणारा आहे. या निर्णयामुळे कामगार भरती बंद होणार आहे. कामगार निवृत्त झाल्यास त्यांच्या मुलांना शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी मिळणे कठीण होणार आहे. कामगार कपातीच्या धोरणाला बळकटीकरण देण्याचा प्रयत्न आहे. संघटना, कामगार व त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक कणा मोडीत काढण्याचा प्रयत्न आहे. कामगार संघटनेमार्फत या निर्णयाला विरोध केला जाणार आहे. तसेच शेतकरी कामगार पक्षाच्या मार्फतही बैठक घेऊन पुढील कार्यवाही केली जाणार आहे. सरकारला लेखी निवेदन देऊन हा निर्णय मागे घेण्यास भाग पाडणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश इंटक प्रणित कामगार संघटना उपाध्यक्ष तथा शेकाप तालुका कामगार आघाडी प्रमुख विकास चवकर यांनी सांगितले.

## मुंबईत बॉम्बस्फोटाची धमकी

यापूर्वी, मुंबईतील एका हॉटेलला ईमेलद्वारे बॉम्बची धमकी मिळाली. मुंबईतील वरळी येथील 'फोर सीझन्स' हॉटेलला एका अज्ञात व्यक्तीने धमकीचा ईमेल पाठवला होता. हॉटेल प्रशासनाने तात्काळ मुंबई पोलीस नियंत्रण कक्षाला मेलबद्दल माहिती दिली. ईमेलमध्ये तामिळनाडू पोलिसांसाठी एक संघ स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. 'फोर सीझन्स', मुंबई (हॉटेल) च्या ३ व्हीआयपी खोल्यांचा उल्लेख करून ईमेलद्वारे सात आयईडी आणि आयईडी स्फोटाच्या धमक्या देण्यात आल्या.

# डॉ. नेल्सन मंडेला आश्रमशाळेत भटके विमुक्त दिन



**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागसेन एज्युकेशन सोसायटी अँड बुद्धसेन कल्चरल ट्रस्ट मुंबई द्वारा संचलित, नागोठणे येथील डॉ. नेल्सन मंडेला आश्रम शाळेच्या वतीने ३१ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेला भटके विमुक्त दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ३५ वर्षांची शैक्षणिक वाटचाल असलेल्या या निवासी आश्रमशाळेत दिवसभर विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. जी के. डोंगरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा घेण्यात आल्या. सुट्टी असूनही प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या रायगड जिल्ह्याच्या इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी मोनिका काळे, मुख्याध्यापक नवनाथ डोंगरगावकर, नागोठणे ग्रामपंचायत सदस्य प्रकाश कांबळे आदींसह शाळेचे माजी विद्यार्थी, शासकीय कर्मचारी व आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष डॉ. जी.के. डोंगरगावकर यांनी शाळेसाठी तीन एकर जागेची आवश्यकता असूनही शासन दखल घेत नसल्याबद्दल खंत व्यक्त केली. अन्य मान्यवरांनीही मार्गदर्शन केले. शेवटी सर्वांनी आश्रमशाळेतील उपस्थित आजी व माजी विद्यार्थ्यांसोबत स्नेहभोजन घेतल्यानंतर या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## सोनूबाई भोसले यांचे निधन

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्याजवळील आमडोशी गावातील रहिवासी आणि गावातील वारकरी संप्रदाय व महिला मंडळाच्या आधारस्तंभ सोनाबाई धोंडू भोसले उर्फ आक्का (८२) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले.



नागोठण्यातील मायलक्ष्मी नर्सिंग होमचे संचालक डॉ. सुनील पाटील यांच्या त्यामानलेल्या बहीण होत्या. दिवंगत सोनूबाई भोसले यांच्या पार्थिवावर आमडोशी येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आमडोशी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत सोनूबाई भोसले यांचे दशक्रिया विधी बुधवार, दि. १० सप्टेंबर रोजी आमडोशी येथील श्री माणकेश्वर मंदिराजवळील तलावावर, तर उत्तरकार्य शनिवार, दि. १३ सप्टेंबर रोजी आमडोशी येथील त्यांच्या निवासस्थानी होणार आहे.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे गणेगाव चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.मयुर हेमंत माने यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे आर प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ३४ | २/अ | ०.२२.०० | ०.४६ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, बक्षीस, दान, जप्ती, लीज, कुळ, बयाणापावती, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि.रायगड. मो.नं.७७९८४३३८८८

सही /-
**अ‍ॅड. कैलास अनंत बासरे**

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
**YADAVRAO TASGAONKAR COLLEGE OF ENGINEERING AND MANAGEMENT**
Approved by AICTE & DTE, Affiliated to University of Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytcem.com, principal.ytcem@tasgaonkartech.com

**ADMISSION NOTIFICATION against Cap Vacancy (ACAP)**

**Applications are invited for Admission to First Year Bachelor of Engineering Against Cap Vacancy (ACAP) for various courses for academic year 2025-26.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 0322019110 | 58 |
| 2 | Computer Engineering | 0322024510 | 20 |
| 3 | ENTC Engineering | 0322037210 | 22 |
| 4 | Information Technology | 0322024610 | 19 |
| 5 | Mechanical Engineering | 0322061210 | 58 |
| 6 | Artificial Intelligence & Machine Learning | 0322092110 | 14 |
| 7 | Cyber Security | 0322025210 | 17 |

The schedule of admission procedure is as follows,
1) Issue of application form at Office: **09.00 am to 4.00 pm from 08th of September 2025 to 11th of August 2025.**
2) Submission of Completely filled application form: **10.00 am to 4.00 pm from 08th of September 2025 to 11th of September 2025.**
3) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **03.00 pm on 12th September 2025.**
4) Sale of Admission form & Information Brochure: **09.00 am to 03.00 pm from 13th of September 2025 to 15th of September 2025.**
5) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **10.00 am to 05.00 pm from 13th of September 2025 to 15th of September 2025.**
6) Cost of Information Brochure with Admission form: **INR 200/- only**.

For any queries contact to **8149679293 / 9665050111 / 8087828332**

Sd/
Principal
Yadavrao Tasgaonkar College of Engineering and Management

## निवडक



### प्रभाग रचना आराखड्यावर सुनावणी

**पेण** : निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनांचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे अध्यादेश निघाल्यानंतर पेण नगरपालिकेने २०११ आणि २०१७ च्या प्रभाग रचनेचा आधार घेत २०२५ साठी १२ प्रभागांचा प्रारूप आराखडा तयार केला. या प्रारूप आराखडयावर पेण शहरातून एकूण १० हरकती घेण्यात आल्या होत्या. या सुनावणीसाठी संतोष श्रृगांरपुरे, जितेंद्र ठाकूर, वसुधा पाटील, निवृत्ती पाटील, अभिराज कडू, आकाश शहा, रफिक झटाम, कृष्णा भोईर, संतोष मंदा लक्ष्मण पाटील, संदिप सुर्वे, छाया काईनकर, विजय अवास्कार, प्रदिप मोने, तथा आम्ही पेणकर विकास आघाडीचे सदस्य उपस्थित होते. आकाश शहा यांनी प्रभाग क्र. १२ संदर्भात निवृत्ती पाटील यांनी प्रभाग क्र. ९ संदर्भात वसुधा पाटील यांनी प्रभाग क्र. ९ संदर्भात विजय अवास्कर यांनी प्रभाग क्र. १ आणि ८ संदर्भात कृष्णा भोईर यांनी प्रभाग क्र. ७ संदर्भात तसेच रफिक झटाम यांनी प्रभाग क्र. ७ संदर्भात संदिप सुर्वे यांनी प्रभाग क्र. ६ आणि १२ संदर्भात छाया काईनकर यांनी प्रभाग क्र. ६ संदर्भात आणि जितेंद्र ठाकूर यांनी प्रभाग क्र. ७, ११, १२ संदर्भात आपल्या हरकती नोंदविल्या. हरकती नोंदविताना अधिकारी आणि हरकतदार यांच्यामध्ये शाब्दिक चकमकीदेखील उडाल्या.



### निसर्गाशी नाळ जुळवून घ्या : गावडे

**रोहा** : कोकणी रान माणूस प्रसाद गावडे यांची मुलाखतिचा कार्यक्रम पार पडला. ही मुलाखत तमाम रोहेकरांसाठी अतिशय सुंदर, विचारप्रवर्तक आणि प्रेरणादायी ठरली.प्रसाद गावडे यांनी आपल्या अनुभवातून पारंपारिक शेतीचे महत्व तसेच इको-टुरिझमच्या माध्यमातून तरुणांना कोकणाकडे वळवण्याचा प्रयत्न केला.याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करत निसर्गाशी नाळ जुळवून ठेवण्याची गरज आहे.असे मौलिक विचार प्रसाद गावडे यांनी नियोजित कार्यक्रमाच्या अनुषंगाने व्यक्त केले. रोहा सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टच्या वतीने बुधवार (ता.३) रोजी भाटे सार्वजनिक हॉल येथे आयोजित विशेष कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.नियोजित कार्यक्रम प्रसंगी आपले विचार मांडत असताना प्रसाद गावडे यांच्या प्रत्येक विचारातून निसर्गप्रेम, परंपरेबद्दलची जाणीव आणि पुढील पिढ्यांसाठी काहीतरी सकारात्मक उभारण्याची तळमळ स्पष्ट दिसून आली. त्यांच्या जीवन प्रवासातून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. या मुलाखतीची धुरा कुणाल साळुंखे यांनी अतिशय छान रितीने पार पाडली. विचारपूर्वक घेतलेल्या प्रश्नांमुळे संवाद अधिक रंजक व ज्ञानवर्धक झाला. त्यामुळे हा कार्यक्रम आणखी खुलून रोचक झाला.



### चोऱ्या रोखण्यासाठी वनविभाग सज्ज

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील वन संपदेचा चोरटी वाहतूक होऊ नये यासाठी वन विभाग सतर्क आहे.वन विभागाच्या वतीने गणेशोत्सव काळात रात्रीच्या वेळी गस्त घालण्यात येत असून कर्जत पश्चिम वन विभागाच्या माध्यमातून चोरटी वन वाहतूक रोखण्यात काही प्रमाणात यश आले आहे. जिल्हा उपवन संरक्षक राहुल पाटील यांच्या सूचनेने संपूर्ण रायगड जिल्ह्यात भरारी पथके तयार करण्यात आली आहेत. त्या पथकांचे माध्यमातून वन संपदा चोरून नेणाऱ्यांना चाप लावण्याचा राहुल पाटील यांचा प्रयत्न आहे.त्यानुसार कर्जत तालुक्यात कर्जत पूर्व, कर्जत पश्चिम आणि माथेरान वन अधिकारी यांच्या माध्यमातून वनोपज केंद्र आणि मुख्य रस्ते या ठिकाणी गणेशोत्सव काळात भरारी पथके यांच्या कडून रात्रीच्या वेळी गस्त घालण्यात येत आहे.२६ ऑगस्ट ते आठ सप्टेंबर या कालावधीत अशी गस्त घातली जात आहे. जिल्हा उपवन राहुल पाटील उपवनसंरक्षक अलिबाग आणि सहाय्यक वनसंरक्षक पनवेल सागर माळी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत तालुक्यात कर्जत पश्चिम वन विभाग यांच्या माध्यमातून गस्त घालण्यात येत आहे.

# खिचडीला महागाईचा तडका

## ■ प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना; तुटपुंजा अनुदानाचा बसणार फटका

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांना दररोज गरम, शिजवलेला पौष्टिक आहार मिळणे बंधनकारक आहे. या योजनेतून महाराष्ट्रात सुमारे १.२ कोटी विद्यार्थी लाभ घेतात, असे राज्य शिक्षण विभागाच्या अद्ययावत आकडेवारीत स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, महागाईच्या वाढत्या झटक्यात सरकारकडून दिले जाणारे अनुदान तुटपुंजे ठरत असून योजना अंमलबजावणीत गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत.**

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिवस फक्त ७ रुपये, तर उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी ९.७० रुपये इतकीच रक्कम मंजूर केली जाते. या रकमेतून धान्य, डाळ, भाज्या, तेल, मसाले, गॅस आणि वाहतूक खर्च भागवणे जवळपास अशक्य असल्याने शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्या हवालदिल झाल्या आहेत.

मानव संसाधन विकास मंत्रालयाने २०२२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दररोज १०५ ग्रॅम धान्य, २० ग्रॅम डाळी, ५० ग्रॅम भाज्या आणि आवश्यक तेल-मसाले, तर सहावी ते आठवीसाठी १५० ग्रॅम धान्य, ३० ग्रॅम डाळी व ७५ ग्रॅम भाज्या देणे बंधनकारक आहे. आहारात कॅलरी, प्रोटीन व सूक्ष्म पोषकांचे प्रमाण निश्चित



करण्यात आलेले आहे. मात्र, प्रत्यक्ष परिस्थितीत बाजारभाव वाढल्याने या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे शक्य होत नाही. गॅस सिलिंडरपासून भाज्यांच्या दरापर्यंत सर्वच खर्च वाढल्याने शिक्षकांना विद्यार्थ्यांना योग्य आहार देताना तोटा सहन करावा लागत आहे. प्रतिदिन सात रुपयांत एका मुलाला पौष्टिक खिचडी शिजवणे ही वस्तुतः तडजोड आहे. सरकारकडून मिळणारी रक्कम खर्चाचा केवळ एक भाग भागवते. उर्वरित खर्च मुख्याध्यापक, शिक्षक किंवा गावकऱ्यांच्या मदतीने उचलावा लागतो. यामुळे योजनाचा मूळ हेतू कुपोषण निर्मूलन असून धोक्यात आला आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना ही केवळ जेवणाची योजना नसून विद्यार्थ्यांचे आरोग्य, उपस्थिती व शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा महत्त्वाचा उपक्रम आहे. राज्य सरकारच्या अधिकृत अहवालानुसार, या योजनेतून ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी शाळेकडे आकर्षित होतात. मात्र, निधीअभावी अनेक ठिकाणी आहाराची गुणवत्ता कमी झाली असून काही शाळांमध्ये फक्त डाळ-भात किंवा साधी खिचडी पुरवण्याची वेळ येते.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, महागाईचा दर लक्षात घेऊन अनुदानात दुपटीने वाढ करण्याची वेळ आली आहे. अन्यथा विद्यार्थ्यांना मिळणारा पोषण शक्तीचा आहार ही योजना कुपोषणावरील प्रभावी शस्त्र ठरण्याऐवजी केवळ तडजोड ठरेल.

### अजगराला सर्पमित्राने दिले जीवदान

**सुधागड-पाली** : सुधागड तालुक्यातील नवघर येथे दिलीप पाटील यांच्या फार्महाऊसमध्ये सात फूट लांब अजगर शिरला होता. या अजगराने दोन कोंबड्या खाऊन फस्त करून तो कोंबड्या ठेवलेल्या खोलीमध्ये होता. या अजगराला सर्पमित्र तेजस विरकर यांनी पकडून सुखरूप जंगलात सोडले. अजगराला पाहून येथील लोक घाबरले होते. मात्र सर्पमित्र तेथे जाताच त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. येथे अजगर आल्याची माहिती ॲड. अमोल कांबळे यांनी फोन करुन सर्पमित्रांना दिली. तसेच अजगराला सुरक्षित अधिवासात सोडण्यासाठी सर्पमित्र तेजस विरकर यांच्या सोबत श्रवण किळंजे हे होते. मानवी वस्तीमध्ये साप आल्यास कोणीही घाबरून न जातात, तसेच सापाला कोणतीही दुखापत न करता व सापाला न मारता जवळच्या सर्पमित्राला बोलवावे असे तेजस विरकर यांनी सांगितले.

# अपघातांवर सुवर्ण नियमांचा उतारा

## रायगड जिल्हा वाहतूक शाखेचा नाविन्य उपक्रम

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड वाहतूक शाखेने दहा सुवर्ण नियम सुरू केले आहेत. बेशिस्त चालकांना शिस्त लावण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आला आहे. या नियमांतून अपघात टाळण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हे नियम वाहनचालकांना वरदान ठरणार आहेत.

रायगड औद्योगिक जिल्हा म्हणून नावारूपाला येऊ लागला आहे. जिल्ह्यात पर्यटनही दिवसेंदिवस वाढत आहेत. अवजड वाहनांसह दुचाकी व अन्य वाहनांची संख्याही प्रचंड वाढली आहे. वाहनांची वर्दळ वाढल्याने वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी वाहतूक पोलिसांना वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम हाती घ्यावे लागतात. काहीं विरोधात दंडात्मक कारवाई तर काहींना प्रबोधनात्मक संदेश देऊन वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले जात आहे.

वाहतूक शाखेने बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी एक नाविन्य उपक्रम हाती घेतला आहे. दहा सुवर्ण नियम वाहन चालकांसाठी जनजागृती म्हणून लागू केले आहे. महामार्गासह रस्त्यावर ठिकठिकाणी हे दहा नियम फलकांद्वारे लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न जिल्हा वाहतूक शाखेने केला आहे. फलकाद्वारे दहा नियमांची माहिती दिली जात आहे. त्यामध्ये दुचाकी वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करावा.चारचाकी वाहन चालविताना सिट बेल्टचा वापर करावा. वेग मर्यादेपेक्षा अतिवेगात वाहन चालवू नये.मद्य प्राशन करून वाहन चालवू नये.वाहन चालविताना लेन कटींग करू नये.पादचाऱ्यांनी नेहमी फुटपाथचा वापर करावा. वाहन चालविताना मोबाईलचा वापर करू नये. रस्त्यावर धोकादायकरित्या वाहन चालवू नये. पादचाऱ्यांनी झेब्रा क्रॉसिंगच्या ठिकाणी रस्ता ओलांडावा. वाहन चालविताना पादचाऱ्यांना प्राधान्य द्यावा या दहा नियमांचा समावेश आहे.

### लाडक्या बहिणींचा लाभ तात्पुरता बंद

**रायगड** : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी अर्ज केलेला आहे अशा पैकी राज्यस्तरावर करण्यात आलेल्या छाननीमध्ये अपात्र आढळलेल्या लाभार्थ्यांचे पडताळणी करण्यासाठी संबधित लाभार्थ्यांचे लाभ देणे तात्पुरते थांबविण्यात आले आहे. लाभ थांबविण्यात आलेल्या लाभार्थ्यांमध्ये आधारकार्डप्रमाणे २१ वर्षे वयापेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या महिला लाभार्थ्यांचा समावेश आहे. तर रेशनकार्डनुसार ज्या कुटुंबात दोन पेक्षा जास्त महिलांना लाभ मिळत आहे अशा कुटूंबात महिलांचा समावेश आहे.

### गढूळ पाण्यामुळे रोगराईची भीती

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

गेली अनेक दिवस झाले मुरुडकरांना गढूळ पाणी पुरवठा होत आहे शहरात ताप खोकला सर्दी अशे आजार वाढल्याने सुजाण मुरुडकरांनी नगरपालिकेत जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला व निवेदन दिले. अलंकापुरी येथील फिल्ट्रेशन प्लांट ला भेट दिली असता गेली कित्येक महिने तो प्लांट बंद आहे अशी माहिती नगरपालिका अधिकारी ह्यांच्याकडून मिळाली. म्हणजे कित्येक महिने मुरुडकरांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. सुजाण मुरुडकरांनी आवाज उठवला म्हणून ही सद्यस्थिती लक्षात आली. आणि तातडीने स्वच्छ पाणीपुरवठा करून द्या असे निवेदन दिले.

सर्व मुरुडकारांना विनंती आहे कि आपण सर्वांनी मोठ्या प्रमाणात जनआंदोलन केले पाहिजे तरच प्रशासन काहीतरी ठोस उपाययोजना करेल नाहीतर आपल्याला रोजच दूषित पाणी प्यावे लागेल. बाजारातील हितेंद्र पंड्या यांच्या परिसरातील लाईन चांगली असताना बदलण्यात आली. पूर्वी नगरसेवक होते त्यावेळी तक्रार येताच स्वतः नगरसेवक संदीप पाटील, बाबा दांडेकर, प्रमोद भायदे धावत असत परंतु आज प्रशासन असल्यामुळे पाणीपुरवठा राम भरोसे झाली आहे याकडे लक्ष कोण देणार?असा सवाल उपस्थित होत आहे.

नागरिकांनी शेवटची संधी नगरपालिकेला दिली आहे, जर पाणीपुरोवठा सुरळीत झाला नाही तर आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.

### वाचनालयाचे उद्घाटन

**पाली** : रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर येथील विद्यार्थी आधुनिक वाचनालयात ज्ञानकण गिरवणार आहेत. ग्रामयुक्ती संस्थेच्या वतीने बांधकाम करण्यात आलेल्या वाचनालयाचे नुकतेच मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी नवघर ग्रामपंचायत सरपंच माई चव्हाण, उपसरपंच संजय मोरे, डी. सी. चव्हाण, ग्राम युक्ती संस्थेचे संचालक राम चव्हाण, वैभव येसने, राकेश जाधव, ज्ञानेश्वर सुतार, रविंद्र जाधव, अनिल राणे, किशोर दळवी, अनिल गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शिक्षक, व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सन्मान

## चोंढी- किहीम येथील स.म. वडके विद्यालयातर्फे शिक्षक दिन साजरा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शुक्रवारी (दि.५) शिक्षक दिन साजरा करण्यात आला. चोंढी - किहीम येथील लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या स.म.वडके विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे आदर्श शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष रविंद्र उर्फ काका ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.



यावेळी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग मराठी माध्यम शिक्षिका संजीवनी भोईर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक रविंद्र वाघमारे, शिक्षिका सुलभा पेढवी, प्री प्रायमरी ते माध्यमिक इंग्रजी माध्यम विभागाच्या शिक्षिका प्रतीक्षा पाटील, सिनियर कॉलेजच्या प्राध्यापिका हर्षदा कवळे, पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग मराठी व इंग्रजी माध्यमच्या सेविका शुभांगी भोईर, माध्यमिक, शिपाई सुनिल थळे, कनिष्ठ लिपीक शंकर नाईक यांचा गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे खजिनदार राजेंद्र शिंदे, ज्येष्ठ संचालक सुनिल थळे, जगन्नाथ महाले, किरण ठाकूर, मनोहर म्हात्रे, उपमुख्याध्यापिका नम्रता म्हात्रे,पर्यवेक्षिका स्वागता पाटील, प्राथमिक विभाग मुख्याध्यापक संदीप पाटील, माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यम मुख्याध्यापिकाघरत व इंग्रजी माध्यम प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका पावशे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैलेश म्हात्रे, जुईली पेढवी यांनी केले असून प्रास्ताविक मुख्याध्यापिक सुवेगा पाटील व शैलेश तिर्लोटकर यांनी आभार व्यक्त केले.

### कौस्तुभचे एसइटी परीक्षेत यश

**तळा** : जी.एम. वेदक सायन्स कॉलेज, तळा येथील रसायनशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक कौस्तुभ रिसबुड यांनी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राज्य पात्रता परीक्षामध्ये १४४ गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले आहे. कौस्तुभ रिसबुड यांनी २०१९ पासून एसइटी परीक्षेची सातत्यपूर्ण तयारी सुरू ठेवली होती. सात वेळा परीक्षेला सामोरे जात असताना, सहा वेळा केवळ कट ऑफच्या खाली राहावे लागले होते. सातव्या प्रयत्नात त्यांनी अपार मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर अखेर हे यश प्राप्त केले.

# मानसी म्हात्रे धावल्या अपघातग्रस्तांच्या मदतीला

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दुचाकी अपघातातील जखमींच्या मदतीला शेकापच्या राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे धावून आल्या. त्यांनी त्यांच्या गाडीतून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात नेले. त्यानंतर त्यांना त्यांच्या घरी पाठविण्यासाठी गाडीची व्यवस्थादेखील करून दिली. जखमी झालेली व्यक्ती मदतीसाठी हात करीत होते. परंतु कोणीही



मदत केली नाही. मात्र मानसी म्हात्रे यांनी केलेल्या मदतीमुळे माणूकीचे दर्शन घडून आले.

रात्रीच्या सुमारास घडलेल्या अपघाताने पुन्हा एकदा रस्त्यांवरील खड्ड्यांचा गंभीर प्रश्न समोर आला आहे.

पेण - अलिबाग मार्गावरून प्रवास करीत असताना रात्री आठ ते साडेआठ वाजण्याच्या सुमारास शहाबाज जवळ आल्यावर खड्ड्यांमुळे दुचाकीचा अपघात झाला. या अपघातामध्ये दुचाकी वरील दोघेजण गंभीर जखमी झाले होते. त्यातही परिस्थितीत जखमी मदतीसाठी हात करीत होते. ही बाब शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्या निदर्शनास आली. त्यांची गाडी बाजूला थांबवून माणुसकी दाखवत त्या जखमींच्या मदतीला धावून गेल्या. आपल्या गाडीमध्ये जखमींना बसवून पेझारी येथे सरकारी दवाखान्यात आणले. त्यांच्यावर उपचार होईपर्यंत थांबल्या. उपचार झालेल्या जखमींना त्यांच्या उरण या गावी वाहनाने पाठविण्याची सोय शेकापचे अनिल पाटील यांच्या मदतीने केली.

### श्रीवर्धन बोर्लीपंचतन रस्ता हरवला झाडीत

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन ते बोर्लीपंचतन मार्गावरील हुनरवेली ते वाकळघर फाटा या रस्त्यावर दुतर्फा झाडे वाढली आहे.पावसाळी दिवसात वाढलेली झाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळीच तोडण्यात आली नाहीत. त्यामुळे या रस्त्यावरून वाहने नेणे चालकांना धोकादायक वाटायला लागले आहे.

श्रीवर्धन ते बोर्लीपंचतनया मार्गावर अनेक ठिकाणी वळणे व तीव्र उतार आहेत.या मार्गावरील चार किलोमीटर अंतराचा हुनरवेली ते वाकळघर फाटा हा रस्ता एकीकडे डोंगर व दुसऱ्या बाजूला दरी असल्याने वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक मानला जातो. श्रीवर्धन ते बोर्लीपंचतन येथे नोकरीनिमित्त ये-जा करणारे दुचाकीस्वार, एसटी बसेसची वाहतूक, पर्यटकांची वाहने यामुळे श्रीवर्धन बोर्लीपंचतन मार्गावर सतत रहदारी असते.

डोंगर रस्ता असल्याने पावसाळी चार महिन्यांत रस्त्याच्या दुतर्फा रानटी झाडी, वेली सदरच्या मार्गावर उगवली आहेत.

पनवेल महानगरपालिका प्रभाग रचना जाहीर | किरकोळ बदल वगळता वॉर्ड जैसे थे

# इच्छुकांच्या आशा झाल्या पल्लवित

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल ग्रामीण महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभाग प्रारूप नागरिकांसाठी जाहीर करण्यात आले. किरकोळ बदल वगळता २०१७ प्रमाणे वॉर्ड कायम ठेवण्यात आल्याने मागील काही वर्षांपासून निवडणुकीची तयारी करणाऱ्या इच्छुकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. पालिका निवडणुकीत उतरण्यासाठी प्रभागात केलेली काम आणि वाढवलेला जनसंपर्क आपल्याला नक्कीच फायद्याचा ठरेल असा विश्वास इच्छुकांना आहे.



२०१६ साली घोषित पनवेल पालिकेत पनवेल नगरपरिषदेचा पूर्वीचा भाग, सिडको वसाहत आणि २९ महसुली गावांचा समावेश करण्यात आला आहे. ११० किलोमीटर क्षेत्रफळ असणाऱ्या पनवेल महानगरपालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक २०१७ सा पार पडली. त्यावेळी २०११ च्या जनगणनेनुसार प्रभाग रचना जाहीर करण्यात आली होती. समाविष्ट गाव आणि खारघर असे १ ते ६ अशी प्रभागांची संख्या आहे. कळंबोली बसाहती ७,८,९ आणि १० असे वॉर्ड आहेत. आसूड गाय, वलवती, टेंभोडे, खिडूकपाडा या गावांचा समावेश करण्यात आला. १ते ३ क्रमांकाच्या प्रभागात विशेष करून कामोठेचा भाग वेतो. त्याचबरोचर १४ मध्ये खांदागाचे तसेच पनवेलच्या काही परिसराचा समावेश करण्यात आला आहे १५ मध्ये संपूर्ण खांदा वसाहत असून १६, १७ वार्डमध्ये नवीन पनवेल समाविष्ट आहे. १८ आणि १९ या प्रभागात संपूर्ण पनवेल शहर सामावून घेण्यात आलेले आहेत. प्रभाग क्रमांक वीसमध्ये तक्का, काळुंद्रे गाव येते. पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करून निवडणूक आयोगाला पाठवण्यात आले होते. आयोगाच्या सूचनेनुसार पनवेल करता हे प्रारूप जाहीर करण्यात आले. हे करत असताना २०११ के जनगणना गृहीत धरून लोकसंख्येचा आधार घेण्यात आला, त्यामुळे प्रभागामध्ये फारसे बदल करण्यात आले नाही पनवेल महानगरपालिकेचे एक दोन लीन आणि १४ ते २० असे जवळपास नऊ प्रभागांमध्ये सूक्ष्म बदल करण्यात आले.

### परिस्थितीत बदल

**२०१६ साली घोषित पनवेल पालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक २०१७ साली पार पडली होती. पालिकेची पहिलीच निवडणूक असल्याने त्या वेळची परस्थिती वेगळी होती. राजकीय पक्षांनी युती आघाडी करत निवडणुकीत उतरवलेल्या उमेदवारांची पाटी त्या वेळी कोरी असल्याने मतदारांनी देखील पक्ष पाहून नवख्या असलेल्या उमेदवारांच्या पारड्यात आपली मत टाकली होती. आता मात्र परस्थिती बदलली आहे.२०१७ साली पहिल्या निवडणुकीत निवडून आलेले नगरसेवक आणि विरोधात उभे राहणार असलेले इच्छुक यांचे भविष्य अवलंबुन आहे**

पोयनाड आणि अलिबाग सोलर ऑफिसकरिता excel, word आणि संगणकाच ज्ञान असलेले स्टाफ हवेत. आकर्षक सॅलरी १५,००० ते २०,०००. संपर्क- ८४८३९९९२२९, ९०२१४०८५६७

# उत्तरेतील हाहाकार

उत्तर भारतात पावसाने कहर केला आहे. हिमाचल, उत्तराखंड, पंजाब, काश्मीर, दिल्ली या राज्यांमध्ये ठिकठिकाणी पूर, भूस्खलन झाले असून आतापर्यंत जवळपास साडेतीनशे लोकांचा बळी गेला आहे. सर्वोच्च न्यायालयानेही याची दखल घेतली व राष्ट्रीय आपत्ती निवारण प्राधिकरणाला नोटीस बजावली. यमुना, रावी, बियाससारख्या नद्या धोक्याच्या पातळीवर पोचल्या असून काही भागात छोटी धरणे फुटून हाहाकार माजला आहे. जम्मू-श्रीनगर या राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी दरडी कोसळल्याने व रस्तेच वाहून गेल्याने २६ ऑगस्टपासून हा रस्ता बंद आहे. जम्मू भागातील बहुतांश रस्तेही नऊ दिवसांपासून बंद आहेत. जम्मू-काश्मीरला यंदा बसलेला हा दुसरा पुराचा तडाखा आहे. यापूर्वी ऑगस्टमध्ये एकदा जम्मूमध्ये असाच प्रचंड पाऊस व दुर्घटना झाल्या होत्या. वैष्णोदेवीला जाणाऱ्या मार्गावर काही दिवसांपूर्वी बरेच यात्रेकरू दगावले होते. आता कटराजवळ पुन्हा अशीच हानी झाली आहे. हिमाचल प्रदेशात तर यंदा दरडी कोसळण्याचा विक्रम झाला आहे. राज्यातले तेराशे रस्ते बंद असून आतापर्यंत अचानक पूर येण्याच्या ९५, ढगफुटीच्या ४५ आणि दरड कोसळण्याच्या १२७ मोठ्या घटना घडल्या आहेत. सुमारे चार हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. उत्तराखंडमध्येही ५४ रस्ते बंद आहेत. खुद्द राजधानी दिल्लीमध्ये अभूतपूर्व पूरस्थिती निर्माण झाली असून दहा हजार लोकांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले आहे. देशाचे धान्याचे कोठार मानल्या जाणाऱ्या पंजाबला कित्येक दशकांमध्ये पहिल्यांदाच प्रचंड पुराचा तडाखा बसला आहे. रावी, बियास व सतलज या तीनही नद्या उफाणल्या आहेत. भारत व पाकिस्तान सीमेवरच्या पंजाब व जम्मू प्रांतातील सीमा सुरक्षा दलाच्या ९० चौक्या तसेच ११० किलोमीटरपर्यंतचे लोखंडी कुंपणही वाहून गेले आहे. आतापर्यंत ३७ जणांचा मृत्यू झाला असून चार लाख लोकांना याचा तडाखा बसला आहे. जवळपास दोन लाख हेक्टरवरची पिके नष्ट झाली असून खरिपातील भात पिकाला मोठा फटका बसला आहे. अर्थातच याचे उत्पादन या हंगामात घटण्याची व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

## तिप्पट पाऊस

या प्रदेशात गेल्या चौदा दिवसात विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. एरवी या भागात या काळात सरासरी ७५ मिलीमीटर पाऊस पडतो. पण तो आता तिप्पट म्हणजे २०० मिलीमीटर झाला. आपल्याकडे कोकणात इतका पाऊस होणे सामान्य असले तरी उत्तर भारतात तो असाधारण आहे. हा सर्व पठारी व मैदानी प्रदेश असून एकाएकी पडलेले इतके पाणी वाहून जाण्यासाठी जागा नाही. शिवाय, अचानक ढगफुटीसारख्या प्रचंड पावसाच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास उसंतच मिळत नाही. त्यातच विकासाच्या नावाखाली लक्षावधी झाडांची कत्तल झालेली असल्याने पाण्याला रोखून धरणारा अवरोध नाहीसा झाला आहे. जागोजागी इमारती, उड्डाणपूल इत्यादींची बांधकामे झाल्याने पाणी वाहून जाऊ शकत नाही व साठून राहते. गेल्या काही वर्षांमध्ये हे प्रमाण वाढत चालले आहे. १९५० ते २०२४ या ७४ वर्षांच्या काळात देशात ३२५ मोठे पूर आले व त्यात ८१ हजार लोक मेले. ९२ कोटी लोकांचा त्याचा फटका बसला व दीड कोटी लोकांची घरे उद्ध्वस्त झाली असे आकडे सांगतात. अत्यंत थोड्या वेळात प्रचंड पावसाच्या घटना अलिकडे सर्वत्र वाढल्या आहेत. काही विशिष्ट भागांमध्ये उष्णतामान प्रचंड वाढते. रस्त्यावरची वाहतूक, प्रदूषण, प्रचंड बांधकामे इत्यादींमुळे आपल्याकडेही शहरी भागात इतर ठिकाणांपेक्षा अधिक तापमान असल्याचे आपल्याला जाणवत असतेच. उत्तराखंड व हिमाचलसारख्या प्रांतांमध्ये पर्यटनाच्या नावाखाली डोंगराळ भागात वाटेल तसे रस्ते, हॉटेल्स व घरे बांधण्यात आली आहेत. त्यासाठी प्रचंड खोदकाम व तोडकाम झाले आहे. नद्यांचे प्रवाह वळवले आहेत. तसेच झाडेही तोडली आहेत. यामुळे वर हिमालयातून येणारे पाणी अडवण्यासाठी अडथळेच शिल्लक राहिलेले नाहीत. त्यातून भूस्खलन व दरडी कोसळण्याचे प्रकार घडत आहेत. याबाबत पर्यावरण जाणकारांनी वारंवार इशारे दिले आहेत. मात्र त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले जाते. मध्यंतरी जोशीमठसारख्या भागात पूर्ण गावच खचले होते. सर्व इमारती जमिनीत धसल्या होत्या वा त्यांना भेगा गेल्या होत्या.

## अंदाधुंद विकास जबाबदार

या घटनांवर तात्पुरती कारवाई केली जाते. पण काहीच दिवसात त्यांच्यावर पडदा पडतो. यामुळे येणाऱ्या काळात अशा अधिकाधिक भयंकर घटना घडणार आहेत. आज जे हिमालयात घडते आहे तेच उद्या सह्याद्रीत होणार आहे. आज रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गात विकासाच्या नावाखाली प्रचंड कापाकापी चालू आहे. त्याचा परिणाम दर पावसाळ्यात दिसतो आहे. कालपरवाच गगनबावडा घाटात दरड कोसळल्याने तो बंद करण्यात आला आहे. अणुस्कुरा घाट तर कायमच धोक्याच्या रेषेआत असतो. इकडे खंडाळा घाटातही ज्या भयंकर वेगाने आणखी मोठे रस्ते, बोगदे व पूल उभारले जात आहेत ते भविष्यातील अरिष्टाला आमंत्रण देणारे आहे. मुंबई ते पुणे हे अंतर कमी करण्यासाठी सध्या मिसिंग लिंक नावाखाली एक मोठा बोगदा खणला जात आहे. याचे परिणाम काय होतील हे कोणी सांगू शकत नाही. तिकडे वाढवण बंदराला मुख्य रस्त्यांना जोडण्यासाठी लाखो झाडांची व डोंगरांची कत्तल होणार आहे. त्याने हा पर्यावरणदृष्ट्या नाजूक इलाका धोक्यात येणार आहे. शक्तिपीठ मार्गामुळे कोल्हापूर भागातही हेच होणार आहे. पण याचा विचार करण्याचा अवसरही राज्यकर्ते मिळू देत नाहीत. आंदोलने दडपली जातात. पैशांच्या आमिषापुढे लोक टिकाव धरू शकत नाहीत. उत्तरेत नेमके हेच होत आहे. उत्तराखंड व हिमाचलचे सर्व अर्थकारणच आता पर्यटनावर चालू आहे. त्यामुळे ते विकासाला नाही म्हणू शकत नाहीत. शिवाय एकदा हे गेट खुले केलेले असल्याने ते आता बंद करणेही कठीण आहे. हे कमी म्हणून की काय केंद्र सरकार तेथे अधिकाधिक उद्योगांना तसेच जलविद्युत प्रकल्पांना परवानगी देत आहे. तिकडे अरुणाचल प्रदेशामध्येही प्रचंड वृक्षतोड करून एका महाकाय धरणाचे काम रेटले जात आहे. यामध्ये सामान्य नागरिकाला काहीच बोलण्याला संधी नाही. जागतिक तापमानवाढीमुळे हिमालयातील बर्फ झपाट्याने वितळते आहे. त्यामुळे गंगोत्री, यमुनोत्रीसारख्या हिमनद्यांमधील बर्फ संपत चालले आहे. त्यांचे पाणी होऊन वरच्या पठाराच्या भागात असलेली पाण्याची तळी विस्तारत चालली आहेत. अशी सुमारे १४३५ तळी असून त्यांचा आकार बर्फ वितळण्यामुळे दरवर्षी बेसुमार वाढत चालला आहे. या भागात जराही पाऊस झाला की हे पाणी एखाद्या धबधब्यासारखे खाली कोसळते आहे. मधल्या भागातील झाडी व डोंगर तोडलेले असल्याने हे पाणी खाली नागरी वस्त्यांवर कोसळते आहे वा त्यांच्यामुळे पंजाबच्या नद्यांना अचानक पूर येत आहेत. याचा तातडीने गंभीर विचार करणे आवश्यक आहे.

विचार

# उपराष्ट्रपतीपदासाठी प्रतिष्ठा पणाला

***उपराष्ट्रपती हे केवळ एक महत्त्वाचे संवैधानिक पद नाही, तर त्यांच्यावर राज्यसभा चालवण्याची जबाबदारी असते. अशा परिस्थितीत, राजकीय कारणांमुळे सत्ताधारी पक्षासाठी या पदाचे महत्त्व वाढते. म्हणूनच या निवडणुकीचे महत्त्वही खूप वाढले आहे. भाजपप्रणीत आघाडीचा उमेदवार सहज विजयी होणार असला, तरी 'इंडिया' आघाडीने या निवडणुकीत रंगत आणली आहे. नेमके काय घडते आहे पडद्यामागे?***





**प्रमोद मुजुमदार**

गेल्या महिन्यात जगदीप धनखड यांच्या अचानक राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या उपराष्ट्रपतिपदासाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. सत्ताधारी पक्ष आणि विरोधकांनीही आपापले उमेदवार निश्चित केले आहेत. भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना उमेदवारी दिली आहे, तर विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीने सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी.सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी दिली आहे. ते आंध्र प्रदेशचे आहेत, तर राधाकृष्णन तामिळनाडूचे आहेत. दक्षिण विरुद्ध दक्षिण अशी ही लढत अनेक निकषांवर मनोरंजक ठरणार आहे. संवैधानिक व्यवस्थेत आणि आदर्श लोकशाही रचनेत, उपराष्ट्रपतींनी राजकीयदृष्ट्या तटस्थ राहणे अपेक्षित असते. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यासारख्या पदांची शपथदेखील या अर्थाने वेगळी आहे. ती संविधानाप्रती निष्ठा यासारख्या इतर पैलूंसह 'संविधानाचे रक्षण' करण्याच्या मुद्द्यावरही भर देते.

माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या समस्येमुळे पद सोडल्याचे सांगण्यात आले; परंतु त्यानंतरच्या घटनांवरून दिसून आले की त्यांनी अचानक राजीनामा देण्यामागे इतर काही कारणे होती. सार्वजनिक जीवनातील धनखड यांची सक्रियता खूपच मर्यादित झाल्यामुळे हे प्रकरण सांगितले गेले तितके सोपे नव्हते. विरोधी पक्षांनी धनखड यांच्या सार्वजनिक जीवनापासून अचानक दूर जाण्यावर प्रश्न उपस्थित केले. आता हे नाकारणे कठीण आहे की सत्ताधारी पक्षासोबतची अस्वस्थ राजकीय समीकरणे धनखड यांच्या राजीनाम्याचे कारण बनली. धनखड आणि सरकारमधील अविश्वासाची दरी इतकी रुंद झाली की पुन्हा कधीही भरून निघू शकणार नाही. दोन्ही गटांच्या उमेदवारांकडे पाहिल्यास प्रत्येक पक्षाने अतिशय सावध पावले उचलली आहेत. धनखड यांचा भाजपच्या मूळ विचारसरणीशी फारसा खोल संबंध नव्हता आणि ते इतर पक्षांमधून भाजपमध्ये आले आणि पक्षाने आपल्या परंपरेविरुद्ध त्यांना एका सर्वोच्च संवैधानिक पदावर नियुक्त केले. त्यांच्या अनुभवातून धडा घेत या वेळी भाजपने मूळ विचारधारा असलेल्या राधाकृष्णन यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आहेत. त्यांना दीर्घ राजकीय अनुभव आहे. ते भाजपसाठी तुलनेने ओसाड राजकीय भूमी असलेल्या तामिळनाडूमधून पक्षाचे खासदार राहिले आहेत. प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी चांगले काम केले आहे. केरळमध्ये निवडणुकीची जबाबदारीही सांभाळली. ते झारखंड आणि नंतर महाराष्ट्राचे राज्यपाल होते. त्यांच्या माध्यमातून भाजप अनेक लक्ष्यांवर मात करण्याचा प्रयत्न करत आहे. पुढील वर्षी तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. यामुळे पक्षाला राजकीय संदेशही मिळेल.

तमिळनाडूतील सत्ताधारी द्रमुक केंद्र सरकारबद्दल खूपच आक्रमक आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण, 'नीट' परीक्षा, हिंदी भाषा आणि आर्थिक संसाधने आणि संभाव्य लोकसभा सीमांकन या मुद्द्यांवरून केंद्र आणि भाजपला कोंडीत पकडण्याची एकही संधी द्रमुक सरकारने सोडलेली नाही. सीमांकनाच्या मुद्द्यावर दक्षिणेकडील इतर राज्यांनाही एकत्र आणण्याचे प्रयत्न केले गेले. अशा परिस्थितीत राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपती बनवून भाजप अशा हल्ल्यांची धार बोथट करण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपची ही रणनीती ओळखून विरोधी 'इंडिया' आघाडीनेही दक्षिण भारतातून उमेदवार उभा केला. याद्वारे त्यांनी दुहेरी रणनीती तयार केली आहे. एक म्हणजे दक्षिण विरुद्ध दक्षिण असा सामना योजणे आणि तमिळ विरुद्ध तेलुगू ओळखीद्वारे 'एनडीए'चा सर्वात मोठा मित्र असलल्या तेलुगु देसम पक्षाच्या मतदारांमध्ये तेलुगु अस्मिता जागी करून मतांची बेगमी करण्याचा प्रयत्न करणे. यामुळे राज्यसभेत 'एनडीए'ला अनेकदा पाठिंबा देणाऱ्या जगनमोहन रेड्डी यांच्या पक्षासाठीही पेच निर्माण होऊ शकतो. विरोधी गटाला चंद्राबाबू नायडू आणि रेड्डी यांच्याकडून पाठिंब्याचे कोणतेही आश्वासन मिळाले नसले, तरी या दोघांना आपल्या खासदारांना सांभाळण्याची कसरत करावी लागेल. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या विधानांवरून हे स्पष्ट होते की विरोधी पक्ष तेलुगु ओळखीचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न करतील. तथापि त्यांनी तेलुगु अस्मिता जागवण्याचा प्रयत्न केल्यास तमिळी अस्मिता पुढे येऊ शकते. त्याचा फटका विरोधकांच्या उमेदवारांना बसू शकतो.

या शह-काटशहांमध्ये द्रमुकचे प्रमुख आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांची कोंडी होऊ शकते. या निवडणुकीद्वारे विरोधी पक्ष गेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर उदयाला आलेल्या सरकारच्या कमकुवत बिंदूला दाबण्याचा प्रयत्न करत आहेत. ही कमकुवतता म्हणजे संसदेत भाजपचा कमी झालेला पाया. मागील उपराष्ट्रपती निवडणुकीत लोकसभेत भाजपचे स्वतःचे ३०३ खासदार होते; परंतु २०२४ च्या निवडणुकीनंतर ही संख्या २४० पर्यंत कमी झाली. दोनदा पूर्ण बहुमताने राज्य केल्यानंतर भाजपला आघाडीतील मित्रपक्षांवर अवलंबून राहून सरकार चालवावे लागत आहे. म्हणूनच रेड्डी यांच्या माध्यमातून भाजपच्या दक्षिणेकडील मित्रपक्षांच्या मतात फूट पडते का, याची चाचपणी विरोधी पक्ष करत आहेत. असे असले, तरी राधाकृष्णन यांच्या उपराष्ट्रपती होण्याच्या मार्गात विशेष काटे नाहीत. सरकारला त्यांच्या निवडीबद्दल विश्वास आहे आणि आकडेवारीदेखील त्यांच्या बाजूने आहे. तथापि, निवडणुकीनंतर, नवीन उपराष्ट्रपतींना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागेल. यामध्ये सर्वात मोठे आव्हान म्हणजे निवडणूक आयोगासह सर्व मुद्द्यांवर सरकारविरुद्ध आक्रमक असलेल्या वरिष्ठ सभागृहात विरोधकांना सोबत घेऊन कारभार करण्याची कसरत त्यांना करावी लागेल.

पुढील काही दिवस दक्षिणेतील राजकारणासाठी कठीण असणार आहेत. 'एनडीए'ने राधाकृष्णन यांच्या उमेदवारीद्वारे तमिळ कार्ड खेळून स्टॅलिन यांना अडकवले आहे, तर विरोधी गटाने गैरराजकीय चेहऱ्याद्वारे सर्वांना खूश करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या स्थानिक असण्याने आंध्र प्रदेशमधील पक्षांना अडचणीत आणले आहे. आंध्रचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आणि आंध्र प्रदेशच्या असलेल्या रेड्डी यांची निवड करावी, की 'एनडीए'चे उमेदवार राधाकृष्णन यांची निवड करावी असा पेच निर्माण झाला आहे. भूमिपुत्राला डावलल्याची किंमत मोजायची की 'एनडीए'चा उमेदवार निवडून द्यायचा असा पेच त्यांच्यापुढे आहे. अशीच परिस्थिती जगन मोहन रेड्डी यांच्यासाठी आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीची संपूर्ण लढाई तमिळ विरुद्ध तेलुगु अशी झाली आहे. 'इंडिया' आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांची स्वच्छ प्रतिमा आहे. ते दोन्ही राज्यांमधील प्रभावशाली रेड्डी समुदायातून येतात. अशा परिस्थितीत तेलंगणामध्ये केसीआर यांच्या बीआरएस आणि आंध्रमध्ये जगनमोहन यांच्यासोबत चंद्राबाबू नायडू रेड्डींच्या मतांच्या नाराजीचा धोका पत्करतील का हे पाहावे लागेल. तेलुगु देसम पक्षाच्या नेतृत्वाने आधीच 'एनडीए' उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला आहे. 'टीडीपी'चे खासदार 'एनडीए'च्या सूचनांचे पालन करतील का, हा आता प्रश्न आहे. भाजपची आघाडी असूनही, विरोधकांनी रेड्डी यांना उमेदवारी देऊन उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची लढाई आणखी रंगतदार केली आहे.

'बीजेडी'ने उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी आपले पत्ते उघड केलेले नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः नवीन पटनायक यांच्याशी चर्चा केली. काँग्रेसने एकाच वेळी अनेक लक्ष्यांवर निशाणा साधला. आंध्र आणि तेलंगणामध्ये रेड्डी मतदारांची निर्णायक भूमिका चंद्राबाबू नायडूंना अडचणीत आणू शकते. आंध्र प्रदेशमध्ये काँग्रेसने नायडूंसह जगनमोहन यांना अडचणीत आणले आहे. अशा परिस्थितीत एका बाणाने दोन पक्षी मारले आहेत. तेलंगणामध्ये उपराष्ट्रपती निवडणुकीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही होणार आहेत. तिथे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी सर्वांकडून पाठिंबा मागून पहिले पाऊल उचलले आहे. गेल्या वर्षी आंध्र प्रदेशमध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये जगनमोहन यांच्या पक्षाने रेड्डी समाजातील नऊजणांना तिकीट दिले होते तर 'टीडीपी' आघाडीने २९ जणांना उमेदवारी दिली होती. आंध्रमध्ये रेड्डी समाजाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. रेड्डी तेथील उच्च जातीचे घटक आहेत. म्हणूनच राधाकृष्णन यांचे पारडे जड असले, तरी स्पर्धा दक्षिणेकडे वळली आहे, असे म्हणावेसे वाटते.

चर्चा आजची

# शिक्षकांचा सन्मान होणे गरजेचे

**प्रमोद जाधव**

आपल्या कौशल्यातून सहजसोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम शिक्षक करतात. हजारो विद्यार्थ्यांना अध्यापनाच्या माध्यमातून घडविण्याबरोबरच समाज परिवर्तनाचे काम शिक्षकांच्या मार्फत होत आहे. मुलांसाठी एक रोल मॉडेल म्हणून शिक्षक ठरतात. मात्र त्याच आदर्शवत शिक्षकांचा सन्मान करण्यास जिल्हा परिषद शिक्षण विभाग उदासीन ठरत आहे. राजकीय राजवटीत सुरु झालेली आदर्श शिक्षक पुरस्काराची परंपरा प्रशासकीय राजवटीत लोप पावली आहे. शैक्षणिकबरोबरच अशैक्षणिक कामे करून शासनाच्या योजनांची अंमलबजावणी शिक्षक करतात. मात्र त्याच शासनाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून आदर्शवत काम करणाऱ्या शिक्षकांचे कौतूक करण्याचा कार्यक्रम घेतला जात नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे. कागदोपत्री पुरस्कार जाहीर करण्यापेक्षा त्याचवेळी शिक्षकांचा सन्मान होणे गरजेचे आहे. याचा विचार जिल्हा परिषद प्रशासनाने करणे आवश्यक आहे.

रायगड जिल्ह्यात तीन हजारहून अधिक शाळा असून त्यात दोन हजार ५०१ जिल्हा परिषद शाळा, या शाळांमध्ये पाच हजार ८८८ शिक्षक असून ८७ हजार ९२ विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेत आहे. या विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम शिक्षक करतात. शासनाच्या वेगवेगळ्या शैक्षणिक व अशैक्षणिक योजनांचे काम शिक्षक करतात. डिजीटल शिक्षण देण्याबरोबरच खेळता खेळता शिक्षण यावरही अनेक शिक्षक भर देत आहेत. निवडणूकीच्या कालावधीत मतदान केंद्रातही आपले कर्तव्य बजावतात. जिल्ह्यातील दूर्गम भागात काही सुविधा नसतानादेखील त्या शाळेत जाण्यासाठी दोन ते तीन किलो मीटरचा प्रवास करत शिक्षक डोंगरभागातील शाळांमध्ये जातात. तेथील विद्यार्थ्यांना चांगले ज्ञान मिळावे, यासाठी शिक्षक मेहनत घेतात. आपल्या कौशल्यातून विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम केले जाते. समाज परिवर्तनाचे कामही शिक्षकांकडून झाले आहे. त्यामुळे शिक्षकांचा आदर्श घेण्यासारखा कायम राहिला आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी खेळाबरोबरच अभ्यासातदेखील उत्तम असल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्याचे खरे श्रेय शिक्षकांना जाते.

आदर्शवत काम करणाऱ्या शिक्षकांचा रायगड जिल्हा परिषदेमार्फत दरवर्षी शिक्षक दिनाच्या दिवशी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव केला जातो.या पुरस्कारामुळे शिक्षकांना एक प्रेरणा मिळते. शिक्षकांच्या कुटूंबियांसोबत हा सन्मान केला जात असल्याने त्यांच्या कुटूंबियामध्ये एक वेगळा आनंद निर्माण होतो. हा पुरस्कार म्हणजे आदर्शवत शिक्षकांसाठी नवी उर्जा देणारे आहे. सन्मानपत्र देऊन हा गौरव केला जातो. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या या पुरस्काराचे महत्व वाढले आहे. रायगड जिल्हा परिषदेमार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाची ही परंपरा गेल्या अनेक वर्षापासून सूरू आहे.

मात्र जिल्हा परिषद सदस्य पदांचा कार्यकाल संपल्यानंतर जिल्हयात २१ मार्च २०२२ पासून जिल्हा परिषदेवर प्रशासकीय राजवट सूरू झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन अधिकारी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा कारभार पहात आहे.उच्च शिक्षित अधिकारी वेगवेगळ्या विभागात आहेत. शासनाच्या शैक्षणिक योजनांसह अशैक्षणिक योजनांची अंमलबजावणी शिक्षकांकडून करून घेण्याचे काम जिल्हा परिषद प्रशासाकडून कायमच केले जाते. त्या योजनांची अंमलबजावणी करण्याचे काम शिक्षक करतात. परंतु आदर्शवत काम करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी प्रशासनाला वेळ नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

दरवर्षी आदर्श शिक्षकांचा पाच सप्टेंबरला सन्मान केला जातो. परंतू प्रशासकीय राजवट सुरु झाल्यापासून आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळाच झाला नसल्याची बाब समोर आली आहे. राजकीय राजवट संपून प्रशासकीय राजवट सुरु आहे. प्रशासनामार्फत जिल्हा परिषदेचा कारभार चालविला जात आहे. तरी देखील गेल्या तीन वर्षापासून आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम प्रशासन राबवू शकले नाही.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी जिल्हाभरातील १७ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. त्यामध्ये अलिबाग तालुक्यातील मनोहर पाटील यांची जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून, पेण तालुका किशोर पाटील, पनवेल तालुका योगिनी वैदू, कर्जत संज्योती कांबरी, खालापूर तालुका किर्ती धारणे, उरण तालुका अजित जोशी, सुधागड तालुका वृषाली गुरव, रोहा तालुका प्रसाद साळवी, महाड तालुका वसंत साळुंखे, श्रीवर्धन तालुका सीमा चव्हाण व नारायण खोपटकर, म्हसळा तालुका शशिकांत भिंगारदेव, पोलादपूर तालुका विजय पवार, माणगाव सुजाता मालोरे व परेश अंधेरे, तळा तालुका उल्का मोडकर, मुरुड तालुका हेमकांत गोयजी यांचा समावेश आहे. शिक्षण विभागाने हा पुरस्कार वितरण सोहळा घेणे आवश्यक होते. यंदाही पुरस्कार जाहीर करून दिखावा करण्याचे काम शिक्षण विभागाने केले. हा सोहळा त्याच वेळी झाल्यास त्याचा आनंद असतो. परंतु प्रशासनाची मानसिकता दिसून येत नाही, असे चित्र आहे. शिक्षकांचा सन्मान होणे गरजेचे आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने याबाबत दखल घेणे आवश्यक आहे.

लोकसंसद

# आत्मनिर्भर व आर्थिक प्रगतीचा केंद्रबिंदू सेमी कंडक्टर

२ सप्टेंबर या दिवशी दिल्ली येथे सेमी कॉम इंडिया २०२५ या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन झाले या ३ दिवसाच्या परिषदेत वीस हजार ७५० प्रतिनिधी सहभागी झाले होते. तसेच ४८ देशांचे २५०० प्रतिनिधीनी या परिषदेत उपस्थित उपस्थिती लावली आहे. भारत आणि वैश्विक सेमीकंडक्टर उद्योग संघाच्या संयुक्त विद्यमानाने ही परिषद आयोजित केली होती. सेमीकंडक्टरच्या संशोधनावर आधारित इतक्या व्यापक प्रमाणावर आयोजित करण्यात आलेली ही जगातील सर्वात मोठी परिषद ठरू शकेल. अवकाश किंवा संरक्षण क्षेत्रातील उपकरणांमध्ये वापरण्याच्या दृष्टीने भारतीय तंत्रज्ञानांनी प्रतिकूल परिस्थितीतही काम करू शकेल अशी ही स्वदेशी बनावटीची चिप सिद्ध केली आहे. सेमीकंडक्टरची गरज केवळ व्यावसायिक क्षेत्रातच नव्हे तर प्रत्येक देशात त्यांची प्रशासकीय व्यवस्था, घरगुती उपकरणे, संरक्षण व्यवस्था यामधील सर्व यंत्र सेमीकंडक्टर द्वारे चालतात त्यामुळे येत्या काळात सेमीकंडक्टरची निर्मिती म्हणजे जागतिक व्यापाराचे मुख्य केंद्र ठरणार आहे. सध्या स्थितीत जगात वर्षाला सेमीकंडक्टरची उलाढाल ५०० अरब डॉलर इतकी आहे. अमेरिका, तैवान, जपान, चीन आणि युरोपमधील काही देश हेच सेमीकंडक्टरच्या निर्मितीमध्ये आहे. त्यातही प्रगत सेमीकंडक्टरच्या निर्मितीमध्ये तैवान आणि दक्षिण कोरिया या दोन देशांची ओळख आहे. जगात पुरवठा होत असलेल्या सेमीकंडक्टर पैकी ६० टक्क्याहून अधिक सेमीकंडक्टरचा पुरवठा तैवान मधून होत आहे. अन्य देशाच्या तुलनेत सेमीकंडक्टरच्या निर्मितीमध्ये भारत बाल्यावस्थेत आहे. वर्ष २०२१ मध्ये भारताने सेमीकंडक्टरच्या निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले तेव्हा ७६ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक यामध्ये केली होती. वर्ष २०२६ पर्यंत भारतात सेमीकंडक्टरची उलाढाल १०० बिलियन डॉलर अधिक होण्याची तर वर्ष २०३० पर्यंत ही उलाढाल ३०० बिलियन डॉलर्सच्या घरात पोचण्याचे अनुमान लावले जात आहे. सेमीकण्डक्टर क्षेत्रात उतरल्यापासून साडेतीन वर्षांच्या कालावधीत गुजरात, आसाम, उत्तर प्रदेश, पंजाब, ओडीसा आणि आंध्र प्रदेश या राज्यात सेमीकंडक्टर निर्मितीचे प्रकल्प चालू झाले आहे. भारताला आत्मनिर्भर होण्यासाठी हे क्रांतिकारक पाऊल ठरणार आहे. काही वर्षांपूर्वी तेलाचे साठे असलेले आखाती देश सर्वाधिक आर्थिक लाभ प्राप्त करत होते मात्र सध्या स्थिती पाहता भविष्यात ही जागा सेमीकंडक्टर निर्मिती करणारे देश घेतील यात शंका नाही.

**– लीना मकरंद गाडगीळ पनवेल**

दिनविशेष

# स्त्री कलाकाराचा पहिला चेहरा - कमलाबाई गोखले

आज मराठी, हिंदी आणि इतर भारतीय भाषांमधील चित्रपट, नाटक यांमध्ये स्त्री कलाकार मध्यवर्ती भूमिका निभावताना सहज दिसतात, पण स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांनी चित्रपट, नाटक यांमध्ये काम करणे तुच्छ मानले जायचे. परंतु, याच काळात जिथे रंगभूमीवर स्त्रियांच्या भूमिका पुरुष साकारत असत. अशा काळात रंगभूमीची प्रदीर्घ सेवा करणाऱ्या, स्वतःच्या कर्तृत्वाचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविणाऱ्या, रंगभूमीवरच्या पहिल्या स्त्री कलाकार आणि भारतीय चित्रपटातील पहिली बालनटी म्हणजेच कमलाबाई गोखले. एवढ्या मोठ्या चित्रपट सृष्टीत पहिली हिरोईन हि मराठी होती. कमलाबाई दिसायला अतिशय सुंदर होत्या. संगीताची उत्तम जाण, आवाज खणखणीत असलेल्या, लहानपणापासूनच नाटकात कामे करीत. अर्थार्जनासाठी फिरत्या नाटक कंपनीत नोकरी धरणाऱ्या कमलाबाईंच्या आई दुर्गाबाई, अभिनयाबरोबर उत्तम पेंटिंग करत. गाणे म्हणण्याबरोबर बीन, दिलरुबा, सतारही वाजवित असत. त्यामुळे कमलाबाईंवर संगीताचेही संस्कार झालेले होत होते. अचानक कमलाबाईना चित्रपटात काम करण्याची अभूतपूर्व संधी मिळाली. कमलाबाईंचे वडील आनंद नानोजकर दादासाहेब फाळके यांचे जवळचे मित्र. भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी चित्रपट तंत्र अवगत नसलेल्या काळात अत्यंत परिश्रम घेऊन 'राजा हरिश्चंद्र' या पहिल्या भारतीय चित्रपटाची निर्मिती केली. या यशस्वी निर्मितीनंतर १९१४ मध्ये त्यांनी 'भस्मासुर मोहिनी' आणि 'सत्यवान सावित्री' या दोन चित्रपटांची निर्मिती केली.

२० व्या शतकाच्या आरंभी भारतात चित्रपट निर्मितीला प्रारंभ झाला. मात्र, चित्रपटांपेक्षाही तो काळ नाटकांचाच होता. दरम्यान, संगीत नाटकांतील महत्त्वपूर्ण किर्लोस्कर कंपनी बंद पडल्याने कमलाबाई कामत यांचे पती रघुनाथराव गोखले यांनी चित्ताकर्षक नाटक मंडळीची स्थापना केली. त्यामुळे रंगभूमीवर पुढे गद्य नाटकं सादर होऊ लागली. या नाटकांमध्ये कमलाबाईंनी भूमिका साकारल्या.

यादरम्यान वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षीच अल्पशा आजाराने रघुनाथराव गोखले यांचे निधन झाले. कमलाबाईंना तीन अपत्ये होती. मधुसूदन उर्फ लालजी, चंद्रकांत आणि सूर्यकांत. रघुनाथरावांच्या निधनानंतर नाटक कंपनी चालवणे अशक्य झाले. परिणामी कंपनी बंद पडली. मात्र, या कठीण काळात खचून न जाता कमलाबाई वेगवेगळ्या नाटक कंपन्यांकडे कामे मिळवण्याचा प्रयत्न करू लागल्या. आई दुर्गाबाईंसह तीन मुलं, दीर रामभाऊ यांची जबाबदारी त्यांच्यावर होती. कामाच्या शोधात असताना एके दिवशी त्यांना मिरजेच्या तवन्नापा चिवटे यांच्या मनोहर स्त्री संगीत मंडळी या कंपनीत काम मिळालं. सौंदर्य, आवाज, अभिनय आणि संगीत या सर्वच बाबतीत प्रविण असलेल्या कमलाबाईंना स्त्री नाटक कंपनीत पुरुष पात्रांच्या भूमिका पदरी पडल्या. कमलाबाईंनी 'मानापमान' मधील धैर्यधर, 'संशयकल्लोळ' मध्ये अश्विन शेठ, ङ्गसौभद्रफ मध्ये कृष्ण या प्रमुख पुरुष भूमिका शिताफीने रंगवल्या. पुरुषांनी स्त्रियांची भूमिका पार पाडण्याच्या त्या काळात प्रवाहाच्या विरुद्ध जात स्त्री कलाकाराने पुरुष पात्र रंगवणे धैर्याची बाब होती. तब्बल २०० हून अधिक नाटकं, मूकपट त्यासोबतच कारकिर्दीत ३५ हून अधिक चित्रपटांमध्ये कमलाबाईंनी साकारलेल्या सर्वच भूमिकांमुळे त्या चित्रपट, नाटक रसिकांच्या कायमच लक्षात राहतात. जवळपास ४० वर्ष या क्षेत्रासाठी योगदान दिल्याबद्दल वयाच्या ७० व्या वर्षी दिलीपकुमार यांच्या हस्ते कमलाबाईंचा सत्कार करण्यात आला. आपल्या अभिनयाच्या कलेने रंगभूमीसह चित्रपटात अष्टपैलू कामगिरी बजावलेल्या कमलाबाई गोखले यांनी १८ मे १९९७ रोजी अखेरचा श्वास घेतला.


## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ सप्टेंबर

१) श्री.सिद्धनाथ काशिनाथ पाटील वरसोली,अलिबाग, ६-९-१९५३

२) श्री.सतिश काशिनाथ पाटील पाटीवाडी, अलिबाग, ६-९-१९५५

## सुवर्णकण



अध्यात्म ज्ञानाचा विषय कळायला फारच अवघड पण एकदा तो कळला. की आपले थोटांड आपण झटकून देऊ शकतो आणि बुद्धीच्या निश्चयाने आपण आपल्या ध्येयाकडे वाटचाल करू शकतो आपले अवधान ढळू देता कामा नये आणि आळस कंटाळा झटकून टाकून द्यायला शिकले पाहिजे.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


## निराधार योजना समितीची स्थापना

**रत्नागिरी :** संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत प्राप्त होणारे अर्ज छाननी करुन निर्णय घेण्यासाठी रत्नागिरी तालुका पातळी संजय गांधी निराधार समिती स्थापन करण्यात आली आहे. पालकमंत्री यांनी शिफारस केलेली संबंधित तालुक्यातील स्वप्नील मयेकर हे या समितीचे अध्यक्ष असून मागासवर्गीय अशासकीय प्रतिनिधी सुनील जाधव, अपर्णा बोरकर, इतर मागासवर्गीय नामदेव चौघुले, रुपेश पेडणेकर, मिलिंद खानविलकर, श्रीकांत राऊत, सुशांत पाटकर, प्रतीक देसाई, अशासकीय प्रतिनिधी राजेश साळवी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी हे सदस्य असून नायब तहसीलदार समितीचे सदस्य सचिव असणार आहेत.

## वळणांमुळे प्रवासाला धोका

**राजापूर :** गेल्या काही वर्षामध्ये अणुस्कुरा घाटमार्गामध्ये पावसाळ्यामध्ये सातत्याने दरडी आणि माती कोसळण्याचे प्रकार घडत आहेत. नागमोड्या वळणांच्या या रस्त्यामध्ये अनेक ठिकाणी उंचच्या डोंगर, उभ्या रेषेतील दरडी, मोठमोठ्या दगडी ठिकठिकाणी कधीही खाली कोसळण्याच्या स्थितीमध्ये आहेत. त्यामध्ये विशेषतः घाटमाथ्यावरील सुमारे तीन किमीच्या परिसरातील दरडी अधिक धोकादायक स्थितीमध्ये आहेत. पावसाने थोडा जोर धरताच धोकादायक स्थितीमध्ये उभ्या असलेल्या दरडी, मोठमोठ्या दगडी घसरून रस्त्यामध्ये येतात. त्यामुळे अणुस्कुरा घाटमार्ग धोकादायक ठरत आहे.

## आरोग्य शिबीर

**चिपळूण :** ग्रामीण भागातील लोकांच्या सेवा करण्यामध्ये खूपच धन्यता वाटते. त्यांच्या सेवेतच खरा आनंद व परमार्थ मिळतो, असे प्रतिपादन आयुर्वेदिक आधार चॅरिटेबल ट्रस्ट चिपळूण अध्यक्षा डॉ.वर्षा कुडचडकर यांनी सांगितले. जांभराई चौथा टप्पा परिसर गाव कोळकेवाडी येथे प्रयोग भूमी शिक्षण केंद्र व आयुर्वेदिक आधार चॅरिटेबल ट्रस्ट चिपळूण यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी चंद्रशेखर कुडचडकर, संचित कुडचडकर, श्रुती हळदणकर, आकांक्षा खोडदे, सचिन वाशीवावे, प्रियंका वाशीवावे, संदीप शिवगण आदी उपस्थित होते.

# चिपळूण घुसमटले वाहतूक कोंडीत



### वाहतूक कोंडीची ठिकाणे

बहादूरशेख नाका, शिवाजीनगर बसस्थानक, जिप्सी कॉर्नर, मेहता पेट्रोलपंप परिसर, चिंचनाका, शिवनदी पूल, पालिका परिसर, भाजीमंडई परिसर, गांधीचौक, क्वालिटी बेकरी परिसर, पानगल्ली परिसर, गुहागरनाका परिसर, भेंडीनाका, नाईक कंपनी पूल, गुहागर बायपास प्रवेशद्वार. याठिकाणी मुख्यत्वे वाहतुकीची कोंडी होते.

## ● नागरिकांसह वाहनचालकांना मनस्ताप

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूण शहरात वाहतूककोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, सर्वसामान्य नागरिकांसह वाहनचालकांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर बेशिस्त उभी केली जाणारी वाहने, फेरीवाल्यांची गर्दी आणि अवजड वाहनांची बाजारपेठेत होणारी वर्दळ यामुळे वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. वाहतूक शाखेकडून काही प्रमाणात नियोजन करण्यात आले असले तरी, पोलीस कर्मचारी थोड्या वेळासाठी हटल्यावर वाहनचालक पुन्हा बेशिस्तपणे वाहने उभी करत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, चिपळूणच्या प्रवेशद्वारापासूनच म्हणजे बहादूरशेख नाक्यापासून वाहतूककोंडीची समस्या निर्माण होते. ग्रामीण भागातून शहरात येण्यासाठी जे जोडरस्ते आहेत त्या प्रत्येक जोडरस्त्यावर वाहतूककोंडीचा त्रास आहे. आधीच अस्ताव्यस्त असलेली वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. बाजारात पावलापावलांवर वाहतूककोंडी दिसून येत असून, नागरिकांना गाडीतच बराच वेळ थांबावे लागत आहे. बेशिस्त पार्किंग, फेरीवाल्यांची अरुंद रस्ते आहेत. त्यावर नियोजनाशिवाय चारचाकींची पार्किंग, दुचाकींची रांग तसेच कुठलाही धाक नसलेले फेरीवाल्यामुळे वाहतुकीची समस्या गंभीर झाली आहे. बाजारातील मुख्य रस्त्यांवर वाहनांची मनालायेईल तशी उभी केलेली रांग ही समस्येची मुख्य कारणे ठरत आहेत. त्यामुळे अडकलेल्या वाहनांतून हॉर्नचा कर्कश आवाज नागरिकांच्या त्रासात अधिक भर घालत आहे. सामान्य नागरिकांनी पालिका प्रशासन आणि पोलिस विभागाकडे तातडीने कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई, फेरीवाल्यांवर नियंत्रण आणि अवजड वाहनांना बाजारात प्रवेशबंदी ही मागणी जोर धरत आहे अन्यथा वाहतूककोंडीचा प्रश्न अधिकच बळावेल, असा इशारा प्रवाशांनी दिला आहे.

## तीन महिन्यांत ९९ टक्के पाऊस

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात तीन महिन्यात पावसाने दमदार हजेरी लावली. १ जून ते ३ सप्टेंबर या कालावधीत २९ हजार ८६२.७६ मि.मी पावसाची नोंद झाली असून ९९ टक्के इतका पाऊस झाला आहे. खेड, चिपळुण, राजापूर तालुक्यांनी पावसाचे शतक पूर्ण केले आहे. गतवर्षी याच कालावधीत १०९.९१ टक्के इतका पाऊस झाला होता तसेच ९ तालुक्यांने पावसाचे शतक पार केले होते. गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी पावसाने दमदार हजेरी लावली असून पर्जन्यमानचा जो फरक होता कमी झाला असून लवकरच गतवर्षाच्या तुलने एवढा किंवा जास्त पडण्याची शक्यता आहे.

# चिखलोली धरणाचे पाणी दूषित

**। ठाणे । प्रतिनिधी ।**



शहराच्या पूर्व भागातील तब्बल पन्नास हजार पेक्षा जास्त लोकवस्तीला पाणी पुरवठा करणाऱ्या चिखलोली धरणामध्ये आनंदनगर एमआयडीसीमधील केमिकल कंपन्यांचे केमिकल वेस्ट थेट धरणामध्ये सोडले जात असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. असे असतानाही आपल्या डोळ्यावर झापड लावलेल्या यंत्रणेला याचे काहीच सोयर सुतक नसल्याने सर्व सामान्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. चिखलोली धरणालागत असलेल्या एका रासायनिक कंपनीतील केमिकल वेस्ट थेट धरणात सोडलेजात असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. इतकेच नाही तर धरणांतील मासे देखील मृत अवस्थेत पडल्याने हे मासे पाण्यावर तरंगताना दिसत आहेत. लघुपाठ बंधारे विभागाचे नियम धाब्यावर बसवत धरण क्षेत्रापर्यंत अतिक्रमण आणि काही कंपन्यांनी आपली हद्द वाढवली आहे. त्यामुळे अनेक रासायनिक कंपन्यांकडून धरणात रसायनाच्या गोण्या टाकणे, रसायनयुक्त पाणी सोडण्याचे जीवघेणे प्रकार यापूर्वी समोर आले आहेत. हे कमीवकी काय पुन्हा एकदा धरणाला लागून असलेल्या जांभिवली, ठाकूरपाडा येथील एका रासायनिक कंपनीतून रासायनिक वेस्ट सोडले जात असल्याचे समोर आले आहे.

## विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**दोडामार्ग:** गणेश विसर्जनस्थळी साफसफाई करताना विद्युतभारित वाहिन्यांचा धक्का बसल्याने एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. सूर्याजी कुबल (वय २५) असे मृत युवकाचे नाव असून सोबत असलेले गावचे भरत गवस (३२) हे विजेच्या धक्क्याने जखमी झाले आहेत. तो झाडाझुडपांची सफाई करताना सूर्याजी याचा नकळत विद्युतभारित तारांना संपर्क झाला. याच वेळी भरत गवस यांनाही विजेचा धक्का बसला. पायात चप्पल असल्यामुळे ते दूर फेकले गेले, तर सूर्याजीचा जागीच मृत्यू झाला. सूर्याजी याच्या पश्चात आई-वडील, दोन भाऊ, भावजय असा परिवार आहे.

## मत्स्य हंगामात मलपी ट्रॉलर्सची घुसखोरी



**। मालवण । प्रतिनिधी।**

मासेमारीचा नवा हंगाम सुरू होऊन महिना ही उलटलेला नाही तोच मलपीतील शेकडो ट्रॉलर्सनी मालवण समुद्रात घुसखोरी सुरू केली आहे. यामुळे स्थानिक मच्छिमारांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. जर सरकार ही घुसखोरी थांबवू शकत नसेल, तर आता आम्हालाच समुद्रात उतरून संघर्ष करावा लागेल, असा इशारा मच्छिमार नेते बाबी जोगी यांनी दिला आहे. १ ऑगस्टपासून मासेमारी हा बंदीचा कालावधी संपून नवीन हंगाम सुरू झाला आहे. मलपीमधील शेकडो ट्रॉलर्सनी किनारपट्टीच्या जवळ म्हणजेच दहा वावाच्या आत घुसखोरी केली आहे. कायद्यानुसार या भागात पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या लहान बोटींनाच परवानगी असते. मात्र, मोठमोठे ट्रॉलर्स या नियमांचे उल्लंघन करत मोठ्या प्रमाणात मासेमारी करत आहेत. ज्यामुळे स्थानिक मच्छिमारांच्या रोजगारावर परिणाम होत आहे.

# कॅनल दुरुस्तीमुळे गावकऱ्यांचा संताप

**। कासा । प्रतिनिधी ।**



डहाणू तालुक्यातील कासा परिसरात पाटबंधारे विभागामार्फत सुरू असलेल्या कॅनल दुरुस्तीच्या कामामुळे स्थानिक नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. दुरुस्तीकरिता आणलेल्या जेसीबी, पोकलॅन, ट्रकसारख्या जड वाहनांमुळे गावोगावी नव्याने तयार झालेले पक्के रस्ते उखडून खराब झाले आहेत. स्थानिकांची तक्रार आहे की, अनेक गावांमध्ये कॅनलच हाच मुख्य रस्ता असल्याने दुरुस्तीकरिता उपसलेली माती रस्त्याच्या कडेवर फेकण्यात आली. त्यामुळे मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून, मातीचे ढिगारे व खडी यामुळे रस्ते पूर्णपणे चिखलमय झाले आहेत. चिखल व खड्ड्यांमुळे वाहनांना प्रवास करणे कठीण झाले असून अनेक ठिकाणी पायी चालणे सुद्धा अशक्य झाले असून, शालेय मुलांनाही मोठे हाल सहन करावे लागत आहेत. दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनधारकांना रोज अपघाताचा धोका आहे. तर कॅनल बांधकामाच्या माती व दगड रस्त्यावर टाकल्याने रस्त्यालगतच्या शेतकऱ्यांचेही नुकसान झाले आहे. मातीचे ढिगारे रस्त्यावर सोडून दिल्याने शेतीकडे जाणारे मार्ग बंद झाले असून, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात पोहोचता येत नाही. वाघाडी, सोनाळे, सारणी, आदी गावांतील रहिवासी या गैरसोयींमुळे संतप्त झाले आहेत. पाटबंधारे विभागाने काम करताना गावकऱ्यांच्या अडचणींकडे डोळेझाक केली आहे.

# त्र्यंबकेश्वर घाटाची खड्ड्यांमुळे चाळण

**। ठाणे । प्रतिनिधी ।**



पालघर जिल्ह्यातील प्रमुख रस्त्यांची सुद्धा अक्षरशः चाळण झाल्याने खड्डे बुजविणे किंवा घाटातील वळण घेताना मोठ्या अपघातांची शक्यता आता वाढली आहे. मोखाडा ते त्र्यंबकेश्वर घाटात तर रस्त्यांच्या दोन्ही कडा साईटपट्ट्या वाहून गेल्याने दोन गाड्या पास होणे सुद्धा जिकरीचे बनले आहे. अशावेळी ट्रॅफिक थांबून वाहनांची मागेपुढे हालचाल करून गाड्या पास कराव्या लागत आहेत. तर काही ठिकाणी रस्त्यांच्या मधोमध मोठे खड्डे झाल्याने अनेक वाहनांचे नुकसान सुद्धा झाले आहे. असे असताना सुद्धा राष्ट्रीय महामार्ग विभाग याकडे ढुंकूनही बघायला तयार नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

पालघर ते मनोर, पालघर ते घोडबंदर, मोखाडा ते त्र्यंबकेश्वर ते नाशिक विक्रमगड ते चारोटी, चारोळी ते जव्हार म्हणजे आजघडीला पालघर मुख्यालयात जाताना तुम्ही कोणत्याही मार्गाने जाल तरीही तुम्हाला या खड्ड्यांचा सामना करावाच लागतो. खोडाळा त्र्यंबकेश्वर राज्यमार्ग खचून झालाय पोकळ झाला आहे. दरम्यान या रस्त्यांना कोणी वाली आहे की नाही, असाच प्रश्न सध्या निर्माण होत आहे. जिल्ह्यातील वाडा ते भिवंडी रस्त्याबाबत आजवर अनेक आंदोलने झाली. मात्र त्या रस्त्याचा शाश्वत विकास अद्याप झालेला नाही. तसेच जिल्ह्यातील संपूर्ण मुख्य रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे.

## सेवा पंधरवडा १७ सप्टेंबरपासून सुरु

**। रत्नागिरी । प्रतिनिधी।**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर पर्यंतच्या कालावधीमध्ये सेवा पंधरवडा राज्यात साजरा केला जाणार आहे. महसूल मंत्र्यांनी आज व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केले. दर शनिवार व रविवार व शासकीय सुट्या वगळून संच वाटप करण्यात येईल.

### सुधारणा न झाल्यास आंदोलन इशारा | २५ लाखांच्या बँक गॅरंटीची अट

# समुद्रातील मासेमारीवर खासगी कंपन्यांचा शिरकाव

**। भाईंदर । प्रतिनिधी ।**



केंद्रीय मत्स्यव्यवसाय विभागाने १ ऑगस्ट २०२५ रोजी गाईडलाईन्स फॉर सस्टेनेबल हर्नेसिंग ऑफ फिशरीज इन दि हाय सीज बाय इंडियन फ्लॅगड फिशिंग वेसेल्स, २०२५ प्रारूप मसुदा प्रसिद्ध केला. त्यावर ३० ऑगस्टपर्यंत सूचना व हरकती मागविल्या होत्या. या मसुद्याद्वारे भारतीय जलधीक्षेत्राबाहेर मासेमारी करण्यासाठी लेटर ऑफ थॉरिटी देण्याची तरतूद करण्यात आली असून त्यासाठी प्रत्येक मासेमारी बोटीकरिता २५ लाख रुपयांची बँक गॅरंटी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे भारतीय जलधी क्षेत्रात मुख्यत्वे मोठ्या खासगी कंपन्यांनाच प्रवेश मिळेल आणि पारंपारिक मच्छिमार वंचित राहतील, असा दावा अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र दामोदर तांडेल यांनी केला आहे. समितीने प्रारूप मसुद्यावर दाखल केलेल्या हरकती, सूचनांमध्ये भारतीय जलधी क्षेत्रातील खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी मच्छिमार सहकारी संस्था व पारंपरिक मच्छिमारांनाच प्राधान्यक्रमाने अधिकार देण्यात यावा, अशी सूचना केली आहे. तसेच या क्षेत्रातील प्रवेशासाठी बंधनकारक करण्यात आलेल्या लेटर ऑफ ऑथॉरिटी अंतर्गत २५ लाखांच्या बँक गॅरंटीची अट पारंपरिक मच्छिमारांसाठी लागू करू नये. एकूण लेटर ऑफ ऑथोरिटीपैकी २५ टक्के एलओए पारंपरिक मच्छिमारांसाठी राखीव ठेवावे व त्याच्या अर्ज शुल्कावर ७५ टक्के अनुदान देण्यात यावे. खोल समुद्रातील सुरक्षितता, शीतसाखळी, इंधन पुरवठा व मदर वेस्सेल चालविण्यासाठी राज्यस्तरीय मच्छिमार सहकारी संस्थांना परवानगी द्यावी आदी सूचना समितीने विभागाला केल्या आहेत.

> **“ अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती केंद्रीय मत्स्यव्यवसाय विभागाने प्रसिद्ध केलेला मसुदा पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांच्या विरोधात आहे. त्यात सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**
> **-संजय कोळी,सरचिटणीस**
> **-अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती. ”**

# निवडक

## ‘एआय’चा प्रशासन वापर करणार’



**ओरोस :** प्रशासकीय कारभारात ‘एआय’चा वापर करणारा सिंधुदुर्ग हा राज्यातील पहिला जिल्हा आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून जिल्हा प्रशासनाचा कारभार अधिक गतिमान करण्याचा आपला प्रयत्न असेल. तसेच सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा असल्याने जिल्ह्यात पर्यटनावर आधारित पथदर्शी प्रकल्प राबविण्यास प्राधान्य देण्यात येईल. प्रलंबित विकासकामांना गती देऊन प्रशासन लोकाभिमुख पद्धतीने चालविण्यात येईल, असे धोडमिसे यांनी सांगितले. सिंधुदुर्गच्या नूतन जिल्हाधिकारी म्हणून तृप्ती धोडमिसे यांनी पदभार स्वीकारल्या. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. अति. जिल्हाधिकारी शुभांगी साठे, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे व अन्य उपस्थित होते. जिल्ह्याचे सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक वैशिष्ट्य लक्षात घेऊन जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. प्रशासन आणि लोकसहभाग या दोन्हींचा समन्वय साधूनच जिल्ह्याच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करता येईल असे त्यांनी सांगितले.



## कोकणात बीपीएम पदवी अभ्यासक्रम सुरु

**रत्नागिरी :** मुंबई विद्यापीठ संलग्नित बीपीए म्हणजेच बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्टस् हा व्यावसायिक अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठांमध्ये सर्वप्रथम रत्नागिरी येथील गोगटे-जोगळेकर महाविद्यालय यांनी सुरू केला आहे. कलेच्या व्यावसायिक शिक्षणाबरोबरच आर्टस्, कॉमर्सचे करिअरसाठी आवश्यक असणारे विषय घेऊन पदवी घेणारे पहिले महाविद्यालय मुंबई विद्यापीठात ठरले असून प्रवेशाला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. आता मुंबईसह विविध विद्यापीठात जाऊन नाट्यशास्त्र, ललित कला विभागात शिक्षण घेण्याची गरज नाही. हल्ली करिअरची व्याख्या बदलत चाललेली आहे. करिअर फक्त पैसे कमवायला नव्हे, तर आपल्या आवडत्या क्षेत्रात काम करून त्यातून उत्पन्न मिळवणे हे महत्त्वाचे आहे. म्हणून आधी कोणत्या क्षेत्रात काम करायला आवडेल हे ठरवून कोर्स निवडला तर अडचण येणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना नाटक, डान्स, संगीतमध्ये आवड आहे त्यांना बीपीए हा कोर्स करिअरसाठी सर्वोत्तम आहे.



## कडवईत ग्रामस्थांचे मृत्यूनंतरही हाल

**आरवली :** संगमेश्वर तालुक्यातील कडवई येथील वाणीवाडी बाजारपेठ येथील स्मशानभूमीकडे जाण्यासाठी मार्गच नसल्याने येथील ग्रामस्थांना अंत्यविधी करताना अक्षरशः मृत्यूशी सामना करावा लागत आहे. गेली सत्तर वर्षे ही पारंपरिक स्मशानभूमी विकासापासून वंचित राहिली असल्याने येथील ग्रामस्थ आत्ता रस्त्यावर उतरण्याचा तयारीत असल्याचे समजते..कडवई वाणीवाडी, बाजारपेठ तसेच समर्थनगर या भागातील लोकांना अंत्यविधीसाठी कडवई-तुरळ मार्गालगत नदीपलीकडे स्मशानभूमी आहे. सत्तर वर्षांपासून येथील ग्रामस्थ या पारंपरिक स्मशानभूमीत अंत्यविधी करत आहेत. मात्र या स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने फार मोठी अडचण होत आहे. पावसाळ्यामध्ये तर मोठ्या पाण्यातून कसरत करत मृतदेह न्यावे लागत आहे.



## बुलेट ट्रेन प्रकल्प गरिबांच्या मुळावर

**पालघर :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामानिमित्ताने करण्यात येणार्या स्फोटामुळे जलसार गावातील अनेक घरांचे पाया खचले आहेत. घरांना तडे ही गेले आहेत. या बाधित नागरिकांना योग्य ती नुकसान भरपाई न दिल्यास बुलेट ट्रेनच्या बोगद्यासमोरच आंदोलन करण्याच्या इशारा मेघराज मित्र मंडळाचे तेजस पाटील यांनी दिला आहे. यामुळे श्रीमंतांसाठीचा प्रकल्प गरिबांच्या मात्र मुळावर आल्याचे यातून दिसून येत आहे. यामुळे सरकार तुमची बुलेट ट्रेन लोकांच्या घरावरून जाणार का असाही उपरोधिक सवाल आता विचारला जात आहे..मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामानिमित्ताने जलसार येथे असलेल्या मेघराज या पाचशे वर्षे जुन्या देवस्थान असलेल्या डोंगराला बोगदा खोदण्याचे बुलेट ट्रेनच्या मार्गाचे काम सुरू आहे. या कामानिमित्ताने एल अँड टी कंपनीकडून स्फोट घडवून काम सुरू आहे. मात्र हे स्फोट करताना आजूबाजूच्या गावातील लोकांना विश्वासात घेऊन त्याची कल्पना देणे आवश्यक असताना त्यांनी तसे न करता हे स्फोट सुरूच ठेवले त्यामुळे घरांना भिंतीवर भेगा पडल्या तसेच घरांचे पाया कमकुवत झाले.

## नारळ लागवडीची माहिती

**रत्नागिरी :** शाश्वत नारळ उत्पादन आणि प्रक्रिया उद्योग हे अर्थक्रांती घडवतील त्यासाठी नारळ लागवडीला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन भाट्ये नारळ संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. किरण मालशे यांनी केले.डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठाअंतर्गत भाट्ये येथील प्रादेशिक नारळ संशोधन केंद्रात जागतिक नारळ दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यानिमित्त केंद्राच्या प्रक्षेत्रावर सुधारित नारळ जातींच्या रोपांची लागवड मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. या वेळी कृषी विज्ञान केंद्र, लांजा प्रमुख डॉ. आनंद हणमंते, उपविभागीय कृषी अधिकारी, रत्नागिरीचे फिरोज शेख, तालुका कृषी अधिकारी राजापूरचे सपकाळ, मंडळ कृषी अधिकारी, मासाळ, नारळ उद्योजक तुषार आग्रे आदी मान्यवर तसेच केंद्रावरील शास्त्रज्ञ डॉ. किरण मालशे व डॉ. संतोष वानखेडे उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमात नारळ लागवडीची माहिती डॉ. मालशे यांनी दिली तर डॉ. वानखेडे यांनी पिकसंरक्षणाबाबत माहिती दिली. या प्रसंगी शेतकऱ्यांनीही आपले अनुभव कथन केले. त्यानंतर प्रक्षेत्र भेट घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# सीताराम कान्हेकर यांचे निधन



**खांब** : रोहा तालुक्यातील देवकान्हे गावचे रहिवासी असणारे तथा कृषीनिष्ठ शेतकरी सीताराम सखाराम कान्हेकर यांचे २६ ऑगस्ट रोजी निधन झाले. निधनसमयी ते ८२ वर्षांचे होते. सीताराम कान्हेकर यांनी आपल्या हयातीत शेतजमिनी व बागायतीला विशेष प्राधान्य देऊन अपार मेहनत घेऊन समाजासमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला होता. त्यांच्या निधनाबद्दल समाजातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार असून, त्यांचे अंतिम धार्मिकविधी रविवार, दि.७ सप्टेंबर रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे वाळवटी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट नं. २३६ एकूण क्षेत्र ००-२४-००, आकार ४.२१ लागवड गवतपड, इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विश्वास बाळाराम येलवे, श्री. विलास बाळाराम येलवे, श्रीम. मीना बाळाराम येलवे, श्रीम. रोशनी बाळाराम येलवे व श्रीम. ज्योती बाळाराम येलवे सर्व राहणार मु. वाळवटी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड. यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकान सोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा बयाणा पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्युपत्रांकित दान, जप्ती लीन, लीज, बक्षिसी ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाराहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक ०५/०९/२०२५

सही/-
**ॲड.अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०५ (पाच) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| कांतीराम काशिनाथ बोडके | १७ | ६ | ०-४५-० | ० | ४१ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :-०६/०९/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल १) श्रीम. दिलशाद बेगुम मोहम्मद शफी शेख २) श्री. मोहम्मद जावेद मोहम्मद शफी शेख ३) श्री. मोहम्मद रफीक मोहम्मद शफी शेख यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत त्यांचे मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.उस्मान हायतुल्ला खान<br>२) श्री.रफिक हायतुल्ला खान | ८२ | १७/अ | ०-१५-०० | ०-४४ |

सदरील जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत तद्‌भुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : नेरळ
दि. ०४/०९/२०२५

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
**ॲड.साकीब अशरफ पानसरे**
ऑफीस - शॉप नं. ३८, पहिला मजला,
बी-विंग, तुलसी सेंटर पॉईंट, रेल्वे स्टेशन जवळ,
खांडा, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो. ८०८७७७०५२५/९०११५००२३५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमच्या अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे चेवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्रीकांत विनायक कुलकर्णी | २१ | २ | ०-१२-० | १ | ०६ |
| | २२ | २ ड | १-३३-० | ० | ८१ |
| | २२ | २ ई | ०-३६-० | ० | २५ |
| | २९ | ० | ०-१०-९० | ० | ४१ |
| | ३० | ० | ०-४०-५० | १ | ८१ |
| | ३४ | १ | ०-९६-० | ० | ८४ |
| | एकुण क्षेत्र हे-३, आर-२८, पॉ-०४ मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :-०६/०९/२०२५


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- *PHARMACIST REQUIRED*
अलिबागमध्ये कामाला फार्मसिस्ट पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क करा - ९३७०६५३०५८

- अलिबाग, श्रीबाग येथे घरकाम व जेवणासाठी बाई पाहिजे आहे. पगार : रू.८,०००/- संपर्क : ९३७२४८०५५४

- मेडिकल एजन्सीमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत शैक्षणिक पात्रता - १० वी व १० वीच्या पुढे
मो नं. ९५०३३५५८८६/८६९८१३४६८९ तसेच मालाच्या डिलीव्हरी साठी ड्रायव्हर पाहिजे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## जाहीर नोटीस

दिनांक ०५/०९/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे आवळस, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्रीमती बेबीबाई शिवराम विश्वासे | ७/२/ब | ०-६७-३० पैकी ०-४७-०० | ६-४७ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.मातोश्री निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र.०९८८१५७९५५५

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ऋतुजा अजित निगुडकर<br>सृष्टी अजित निगुडकर | ५ | ११ | ०-०२-०० | ०.०२ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक :
०६/०९/२०२५

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी.निगुडकर**
पत्ता: कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.:९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## महाराष्ट्र शासन राजपत्र

सत्यमेव जयते

**असाधारण भाग चार-ब**

वर्ष ११, अंक १२० (२) मंगळवार, ऑगस्ट २६, २०२५ /भाद्रपद ४, शके १९४७ (पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३०५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २६ ऑगस्ट २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३ (भाग-१)/रस्ते- ८. - ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) च्या कलम १५ (२) नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन अधिसूचना क्र. खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/ रस्ते-८, दिनांक १३ मार्च, २०२४ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे : -

**उक्त अधिसूचनेला जोडलेली अनुसूची :-**

**(i) पृष्ठ क्र. ९ वरील, अ.क्र. ३४ च्या नोंदीनंतर, खालील नोंदी समाविष्ट केल्या जातील.**

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ अ | रांजणखार डावली | ३५/१ | ०.१११५ |
| | रांजणखार डावली | ३५/२ | ०.२९८२ |
| | रांजणखार डावली | ३५/३ | ०.१९७८ |
| | रांजणखार डावली | ३५/४ | ०.०३७९ |
| | रांजणखार डावली | ३५/५ | ०.०३७१ |

**(ii) पृष्ठ क्र. १७ वरील, (अ) अ.क्र. ९३ च्या नोंदीनंतर खालील नोंदी समाविष्ट केल्या जातील.**

| | | | |
|---|---|---|---|
| ९३ अ | चौल | २७२१ | ०.११०६ |

(ब) अ.क्र. ९४ च्या नोंदीनंतर खालील नोंदी समाविष्ट केल्या जातील.

| | | | |
|---|---|---|---|
| ९४ अ | आगरकोट | नाला, लागु नंबर ३७ | ०.०८१५ |

(iii) पृष्ठ क्र. २७ वरील, अ.क्र. २७ च्या नोंदीनंतर, खालील नोंदी समाविष्ट केल्या जातील.

| | | | |
|---|---|---|---|
| २७ अ | टोकेखार | ३२ | ०.१५४२ |

**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/१३९/११७८/२०२५**

## उप विभागीय अधिकारी, माणगांव विभाग माणगांव यांजकडून शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/कोशिंबळे त. निजामपूर/एसआर-९५/२०१२ दुरुस्ती, उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/एसआर-९५/२०१२ दिनांक २६/०४/२०१६, २८/०९/२०१७, २४/०८/२०१८ व २४/०५/२०२२ अन्वये मौजे - कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता. माणगांव, जिल्हा-रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (१) ची अधिसूचना स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१६ ते २०२२ रोजी प्रसिध्द झालेल्या आहेत;

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसुचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०२०/प्र.क्र.४६/ उद्योग-१४ दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ अन्वये मौजे-कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता.माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील काही सर्व्हे नंबर मधील हिस्से व क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार ब पृष्ठ क्रमांक ०३ ते ०४ मध्ये दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी जाहिर केले आहे;

त्याअर्थी, स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१६ ते २०२२ मध्ये प्रसिध्द झालेल्या कलम ३२ (१) ची अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**

**पाणसई औद्योगिक क्षेत्र**

**जिल्हा-रायगड, ता. माणगांव, गांव- कोशिंबळे तर्फे निजामपूर**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व्हे नंबर/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर) | सर्व्हे नंबर/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| १ | ८ | ०.३०३० | १ | ८ | ०.३३०० |
| ३७ | ४ पै | ०.०१२० | ३७ | ४ | ०.०१३० |
| ४८ | ८ | ०.७४०० | ४८ | ८ | ०.८४०० |
| ५० | ६ | ०.९३०० | ५० | ६ | १.०९०० |
| ५० | ११ | ०.४५०० | ५० | ११ | ०.१८०० |
| ५० | १२ पै | ०.१८०० | ५० | १२ | ०.४५०० |

ठिकाण - माणगांव
दिनांक २८/०८/२०२५

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग माणगांव**

**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/१४१/११८४/२०२५**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस सदर नोटिसीद्वारे कळिवण्यात येते कि, माझ्या अशिलांच्या सूचनेवरून, मी, **स्मिता हेमंत मोडक** यांच्या खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या स्थावर मिळकतीबाबत हक्क व अधिकारांची चौकशी आणि पडताळणी करीत आहे.

खालील नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा अथवा कोणत्याही बँक आणि / किंवा वित्तीय संस्था आणि / किंवा प्राधिकरण यांचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेपट्टा, पोट- भाडेपट्टा, अभिहस्तांतरण, वाटप, पोटगी, मृत्यूपत्र, अख्त्यारपत्र, बोजा, लिन, एकाधिकार, करार, हक्कसोड, वारसा, उत्तराधिकार, सुविधाधिकार, न्यास, कुळाने, भाडे व पोट-भाडेदारी, भोगवटा, कब्जा, कुटुंब व्यवस्था / तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार / करारनामे, भागिदारी, विकास अधिकार, प्रकल्प व्यवस्थापन करारनामा, विकास व्यवस्थापन करारनामा, हक्कविलेख दस्तऐवज अनामत करण्याचे ज्ञापन, किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही दावे, आक्षेप, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, शेअर आणि / किंवा मागणी असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना या जाहीर सुचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून २१ (एकवीस ) दिवसांच्या आत त्याच्या दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा माझे अशिल सदर मालमत्तेमधील असे अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि / किंवा मागणी यांचा अधित्याग, परित्याग, अधित्यजन आणि / किंवा परीत्यजन करण्यात आल्याचे आणि / किंवा सोडून देण्यात आल्याचे गृहीत धरून मालमत्तेच्या प्रस्तावित खरेदीची कार्यवाही करतील आणि सदर मालमत्तेच्या संबंधातील अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि / किंवा मागणी अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल.

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट**
**(मिळकतीचे वर्णन )**

| अ. क्र. | मौजे | भूमापण क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर. ) | आकार (रु. पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | बेलकडे, ता.अलीबाग, जि. रायगड | ३८७/१ | क्षेत्र ०.३९.९० पो. ख. ०.०३.१० एकूण ०.४२.१० | ४.१८ | स्मिता हेमंत मोडक |
| २. | बेलकडे, ता.अलीबाग, जि. रायगड | ३८७/३ | क्षेत्र ०.४२.१० पो. ख. ०.०३.०० एकूण ०.४५.१० | ५.२९ | स्मिता हेमंत मोडक |
| ३. | बेलकडे, ता.अलीबाग, जि. रायगड | ४७६/१ | क्षेत्र ०.३७.०० पो. ख. ०.०३.०० एकूण ०.४०.०० | २.०० | स्मिता हेमंत मोडक |
| ४. | बेलकडे, ता.अलीबाग, जि. रायगड | ४७६/२ | क्षेत्र ०.५९.०० पो. ख. ०.०४.०० एकूण ०.६३.०० | ३.१३ | स्मिता हेमंत मोडक |

**अलिबाग**
**दिनांक : ०६/०९/२०२५**

**ॲड. जान्हवी कृष्णा शिंदे**
ऑफिस क्र. ३१८, तिसरा मजला,
प्लॅटिनम टेक्नो पार्क, प्लॉट क्र. १७ व १८,
सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई - ४००७०३
मो.: ८९५६३ ८३७७८


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहिर समन्स

दिवाणी अ ९ म
समन्स (दिवाणी व्यवहार संहिता,
नियमक्रम ५ नियम १.५) अनुसूची एक

**अलिबाग येथील मा. एस.एन. नाईक, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांच्या न्यायालयात**

नियमीत दिवाणी दावा ४०/२००८
ने.ता. १६/०९/२०२५ निशाणी क्र. – २२३/ड

श्री. रमेश हिरानंद कुंदनमल ... वादी
विरुध्द
श्रीमती. पार्वती शंकर म्हात्रे ... प्र.वादी

प्रति,
प्र.वादी २/३ – सौ. अर्चना आनंद म्हात्रे / श्रीमती अर्चना सूर्यकांत पाटील
५ – श्रीमती कुसुम / आशा आत्माराम पाटील
७ – श्रीमती लिलाबाई / वर्षा वसंत घरत
८ – श्रीमती केसर / दर्शना दीनानाथ वाकडे
१०/२ – सौ. निकिता संजय पाटील
१२ – श्रीमती नंदा सुभाष म्हात्रे
१५ – श्री. सुरेश हरिश्चंद्र म्हात्रे
रा. कोलगांव, ता. अलिबाग, जि. रायगड

ज्याअर्थी, उपरिनामित वादी यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे.

त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी **दिनांक १६/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर येऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निदेश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काऊंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काऊंटर क्लेम) पुष्ट्यर्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही इस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बचावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर अलिबाग**

(शिक्का)

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व स्तर, अलिबाग–रायगड**



# सोडा 'बिंजे इटिंग'

मुलांनो, 'बिंजे इटिंग' म्हणजे उगाचच खात राहणं. 'बिंजे इटिंग' हा एक आजार आहे. पोटभर खाणं गरजेचं असतं. पण पोट भरल्यानंतरही खावंसं वाटलं तर ते बिंजे इटिंगचं लक्षण असू शकतं. आता या बिंजे इंटिंगची समस्या सोडवण्यासाठी काही उपाय करता येतील. चला तर मग याबाबत माहिती घेऊ.

थोड्या वेळानंतर खाण्यासाठी अन्न लपवून किंवा साठवून ठेवणं, पोट भरलेलं असतानाही खात राहणं, जेवणाच्या ठरलेल्या वेळा नसणं, दिवसभर चरत बसणं, सगळ्यांसमोर नेहमीप्रमाणे खाणं पण एकटं असताना भरपूर आणि बकाबक खाणं, खाणं थांबवता न येणं, खूप कमी वेळात भरपूर खाणं ही बिंजे इटिंगची लक्षणं आहेत.

ही समस्या सोडवण्यासाठी खाण्याचा मोह टाळायला हवा. म्हणजे बघा, आपल्याला वेफर्स, पिझ्झा, बर्गर, फ्रेंच फ्राईज, चॉकलेट, केक असं जंक फूड आवडतं. हेच पदार्थ जास्त खाल्ले जातात. त्यामुळे हे पदार्थ खाण्यावर नियंत्रण ठेवायला हवं. अन्नाशी तुमचं नातं निर्माण व्हायला हवं. अन्न आरोग्यासाठी गरजेचं आहे हे लक्षात ठेवा. आपल्या भावनिक गरजा पूर्ण करण्यासाठी खाऊ नका. शरीराला पोषक घटक मिळवून देण्यासाठी खायला हवं हे नेहमी लक्षात ठेवा.

हेल्थवेल्थ

दोस्तांनो, भूक फक्त शारीरिक नसते तर ती भावनिकही असते. म्हणजे आपल्याला उगाचच खावंसं वाटतं. नुकतंच जेवण झाल्यानंतरही गोड खावंसं वाटतं. पण शरीराला या खाण्याची गरज नसते. त्यामुळे गोड खावंसं वाटलं तरी ते टाळायला हवं. अजिबात उपाशी राहू नका. उपाशी राहिल्यामुळे जास्त खाल्लं जातं. खाण्यापिण्याच्या वेळा ठरवा. त्याच वेळी खा. खाण्याच्या वेळा टाळल्यामुळे जंक फूड खावंसं वाटतं. आहारात पोषक पदार्थांचा समावेश करा. फळं, सुकामेवा असे आरोग्यदायी पदार्थ खा.

# आकाशाचा डोळा: ड्रोन कॅमेरा

ड्रोन म्हणजे यूएवी म्हणजेच अनमॅनड एरियल व्हेईकल. ड्रोनला उडता रोबोट असंही म्हणता येईल. आपण हा रोबोट रिमोट कंट्रोलद्वारे नियंत्रित करू शकतो. ज्या ठिकाणी माणूस पोचणे अवघड आहे त्या ठिकाणी ड्रोन सेट केला जातो. क्वाडकोप्टर हे ड्रोनचं अगदी प्राथमिक स्वरूपाचं डिझाईन आहे. १९२० साली ह्या प्रकारचा ड्रोन सर्वात प्रथम उडवण्यात आला.बदलत्या टेक्नॉलॉजीमुळे यात अनेक सुधारणा झाल्या. सेन्सर आणि कॅमेरा मध्ये सुधारणा होत गेली. ड्रोनची बॅटरी आणि त्याचं वजन यावर त्याचं आकाशात उडत राहणं अवलंबून असतं. ड्रोन हेलिकॉप्टरसारखा हवेत उडवला जातो आणि रिमोटने नियंत्रित केला जातो. त्याच्या कॅमेरामुळे जमिनीवरच्या दृश्यांचे शूटिंग स्पष्ट आणि नीट केले जाते. अनेक रिसर्च आणि



रेस्क्यू ऑपरेशनमध्ये ड्रोनचा वापर केला जातो. ट्रॅफिक नियंत्रित करण्यासाठी, हवामानाचा अंदाज घेण्यासाठी ड्रोनचा उपयोग केला जातो. आकाशातून फोटोग्राफी करण्यासाठी तसंच खेळाच्या सामन्यांचं प्रक्षेपण करण्यासाठीदेखील ड्रोनचा वापर केला जातो. अलीकडे शेतीच्या विविध कामांमध्ये ड्रोनचा उपयोग केला जाऊ लागला आहे.

जाणून घ्या

मिलिटरीमध्ये ड्रोनचा वापर दिवसेंदिवस वाढू लागला आहे. हेरगिरीसाठी वापरण्यात येणारे ड्रोनआजच्या जगातले सर्वात प्रगत तंत्रज्ञान आहे. हवाई दलाच्या गोरगोन सेन्सर असलेले रीपर प्रकारचे ड्रोन १२ कोंनांमधून चार किलोमीटर क्षेत्रावर लक्ष ठेवते. तर पेंटोगोनच्या एका संस्थेतर्फे विकसित केलेली आरगस इमेजिंग सिस्टीम वीसहजार फूट उंचीवरून सहा इंचाच्या वस्तूचेसुद्धा फोटो काढू शकतात. ड्रोन हे नव्या युगाचे नवे तंत्रज्ञान जर योग्य रीतीने वापरले गेले तर वरदान ठरेल यात काही शंका नाही. नुकत्याच पाकिस्तानवर केलेल्या कारवाईत भारतीय हवाई दलाच्या ड्रोन्सने महत्वाची कामगिरी बजावली हे तर तुम्हाला माहीत आहेच.




## ओळखा पाहू

जिज्ञासा

१)छत्तीसगड राज्याचा प्रसिद्ध नृत्यप्रकार कोणता?
२) उरूग्वेचं चलन कोणतं?
३) मंगोलियाची राजधानी कोणती?
४) २०२२ चा फुटबॉल विश्वचषक कोणत्या देशात आयोजित करण्यात आला होता?
५) हल्दिया बंदर कोणत्या राज्यात आहे?
६) पुलित्झर पारितोषिक कोणत्या देशातर्फे दिलं जातं?
७) ईझार चषक कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
८) रणजी करंडक कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
९) भारतातली पहिली महिला बँक कोणती?
१०) सार्वजनिक ठिकाणी वायफाय सुविधा उपलब्ध करून देणारं भारतातलं पहिलं शहर कोणतं?

उत्तर : १) पंथी नृत्य २) पेसो ३) उलानबाटार ४) कतार ५) पश्चिम बंगाल ६) अमेरिका ७) हॉकी ८) क्रिकेट ९) भारतीय महिला बँक १०) बंगळुरू



# आधुनिक काळातलं ऑफिस मॅनेजमेंट

दोस्तांनो, उद्योग-व्यवसायाच्या पद्धती बदलल्या आहेत. सगळं कसं आधुनिक झालं आहे. आजघडीला उद्योजक तंत्रज्ञानाची मदत घेतात. म्हणूनच आधुनिक कार्यालयाचं म्हणजे ऑफिसचं व्यवस्थापन हे किचकट काम होऊन बसलं आहे. ऑफिसचं व्यवस्थापन आता सोपं राहिलेलं नाही. एक व्यवस्थापक कंपनी आणि ग्राहकांमधला दुवा बनतो. तुम्हीही आधुनिक ऑफिस मॅनेजमेंटच्या क्षेत्रात करिअर करू शकता. या क्षेत्राबद्दलचं हे मार्गदर्शन...

- 'मॉडर्न ऑफिस मॅनेजमेंट अँड सेक्रेटरियल प्रॅक्टिस'सारखे अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही पुढे जाऊ शकता. यासोबतच 'मॉडर्न ऑफिस मॅनेजमेंट', 'मॉडर्न ऑफिस प्रॅक्टिस' या विषयांमध्ये डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. बारावीनंतर या अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो. पदवी पूर्ण करण्याआधीही तुम्ही हे अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. पदवी पूर्ण केल्यानंतर 'मॉडर्न ऑफिस मॅनेजमेंट' हा विषय घेऊन एमबीएही करता येतं.

कोण होणार?

- या क्षेत्रात येण्यासाठी तुमच्याकडे संवादकौशल्य आणि चटपटीतपणा असायला हवा. इंग्रजीसह हिंदी आणि स्थानिक भाषेवर प्रभुत्व असल्यास लाभ होऊ शकतो. हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर छोट्या कंपनीपासून सुरूवात करता येईल. अनुभव मिळाल्यानंतर मोठ्या, बहुराष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरी मिळू शकते.
- जनरल किंवा असिस्टंट मॅनेजरच्या पदापासून या क्षेत्रातल्या करिअरला सुरूवात करता येते. पुढे 'एक्झिक्युटिव्ह असिस्टंट' म्हणूनही तुम्ही काम करू शकता.

# पहिलावाहिला टेक्स्ट मेसेज

दोस्तांनो, मोबाईल क्रांतीमुळे टेक्स्ट मेसेज सर्रास पाठवले जातात. या संदेशांचं काहीच अप्रूप राहिलेलं नाही. पण कधीतरी पहिला टेक्स्ट मेसेज पाठवण्यात आला होता. त्यावेळी या मेसेजबद्दल प्रचंड कुतुहल असणार हे नक्की! चला तर मग या पहिल्या टेक्स्ट मेसेजविषयी जाणून घेऊ.




पहिलावाहिला टेक्स्ट मेसेज २७ वर्षांपूर्वी म्हणजे १९९२ मध्ये पाठवण्यात आला होता. ३ डिसेंबर १९९२ या दिवशी हा मेसेज पाठवण्यात आला. त्यामुळे तांत्रिक दृष्ट्या विचार केला तर टेक्स्ट मेसेजने २७ वर्षं पूर्ण केली आहेत. इंग्लंडमधल्या एका इंजिनिअरने 'मेरी ख्रिसमस' हा संदेश पाठवला होता. नील पॅपवर्थ असं या इंजिनिअरचं नाव. त्याने हा मेसेज रिचर्ड जार्व्हिस यांच्या मोबाईलवर पाठवला. जार्व्हिस हे त्यावेळी व्होडाफोन यूकेचे अध्यक्ष होते.

जाणून घ्या

आज आपल्या मोबाईलला की बोर्ड असतो. पण त्यावेळी या की बोर्डचा शोध लागला नव्हता. म्हणजे त्यावेळी मोबाईलला की बोर्ड नसायचा. त्यामुळे पॅपवर्थने कॉम्प्युटरवर हा मेसेज टाईप केला. रिचर्ड ख्रिसमस पार्टीला गेले असताना त्यांच्या मोबाईलवर हा संदेश झळकला. आज आपण अगदी सहज मेसेज पाठवू शकतो. ९० सेकंद म्हणजे दीड मिनिटांमध्ये मेसेजला प्रतिसाद दिला जातो पण २७ वर्षांपूर्वी मेसेज पाठवणं सोपं नव्हतं हेच खरं!

# हिऱ्यांची राजधानी सुरत

दोस्तांनो, सुरत हे गुजरात राज्यातलं प्रमुख शहर आहे. सुरत हे हिरे व्यापाराचं केंद्र बनून गेलं आहे. इथे कापड उद्योगही मोठ्या प्रमाणावर आहे. सुरतला 'हिऱ्यांची राजधानी' असं म्हटलं जातं. जवळपास ९५ टक्के हिऱ्यांना सुरतमध्येच पैलू पाडले जातात. सुरत हे देशातलं आठव्या क्रमांकाचं सर्वात मोठं शहर आहे. या शहराची लोकसंख्या ४५ लाखांच्या घरात आहे. सुरतमध्ये सर्वाधिक पूल आहेत. म्हणूनच सुरतला उड्डाणपूल म्हणजेच फ्लायओव्हर्सचं शहर असंही म्हटलं जातं.

सुरतमधून कापडाची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जाते. लग्नप्रसंगी सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या कापडाची निर्मिती सुरतमध्येच होते. इथे कापडाची खूप मोठी बाजारपेठ आहे. जिलबी, फाफडा, थेपला, ढोकळा, सुरती उंदियो, बटाटा पुरी हे खाद्यपदार्थ सुरतची ओळख आहे. सुरतमध्ये कापड गिरण्या आहेत. तसंच इथलं रेशीमही खूप प्रसिद्ध आहे. सुरत शहरात समुद्रकिनारेही आहेत. दुमास, दांडी आणि सुवाली हे इथले प्रसिद्ध समुद्रकिनारे आहेत. दुमास समुद्रकिनाऱ्यावरची वाळू काळ्या रंगाची आहे.



सफर शहरांची

# जपानचं वेगळेपण

जपान हा देश ६८०० लहान लहान बेटांपासून बनलेला आहे. इथले लोक अत्यंत मेहनती म्हणून ओळखले जातात. जपानला उगवत्या सूर्याचा देश म्हटलं जातं. जपानमध्ये दरवर्षी सुमारे ४००० भूकंप होतात. म्हणजे प्रत्येक दिवशी इथं ४ भूकंप होतात. एवढे भूकंप होत असूनही जपांची अर्थव्यवस्था अत्यंत बळकट आहे. जपानचं वैशिष्ट्य म्हणजे मुलं दहा वर्षाची होईपर्यंत त्यांना इथं कोणतीही परीक्षा द्यावी लागत नाही. इथं शाळेत आल्यावर मुलं आणि शिक्षक एकत्र येऊन आपापले वर्ग स्वच्छ करतात. जपानच्या लोकांचं जगण्याचं सरासरी वय ८२ वर्ष आहे. संपूर्ण जगात हे वय सर्वात जास्त मानलं जातं. जपानमध्ये १०० वर्षापेक्षा जास्त वय असणारे ५०००० पेक्षा जास्त लोक आहेत. सुमो हा जपानचा अतिशय लोकप्रिय खेळ आहे. त्याखालोखाल जपानी लोकांना बेसबॉल हा खेळ आवडतो. जपानमध्ये नवीन वर्षाचा उत्सव साजरा करताना तिथल्या मंदिरांमध्ये १०८ घंटा वाजवल्या जातात. काळी मांजर जपानमध्ये लकी समजली जाते. जपानमध्ये ५५ लाख व्हेंडिंग मशीन्स आहेत आणि त्यातून केळी , नूडल्स आणि अंडी पुरवली जातात. जपान हा जगातला एकमेव देश आहे की ज्यावर अणुबॉम्ब टाकला गेला. हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांवर लिटिल बॉय आणि फॅट मॅन हे अणुबॉम्ब टाकण्यात आले होते. पण त्या धक्क्यातून सावरून जपान आज अत्यंत प्रगत देश म्हणून ठामपणे उभा आहे.

सफर देशांची



# यम्मी फ्रूट कस्टर्ड


छोट्या दोस्तांनो, घरात सगळ्यांना आवडेल आणि करायला एकदम सोपा असा पदार्थ म्हणजे फ्रूट कस्टर्ड.

**साहित्य** : कस्टर्ड पावडर, १ लीटर दूध, साखर , फळं . सफरचंद, डाळिंब, द्राक्ष, चिक्कू आणि तुमच्या आवडीची फळं घेऊ शकता.

**कृती** : सर्व फळं साली आणि बिया काढून चिरून घ्या. गार होण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवा. एक वाटी दुधात कस्टर्ड पावडर मिसळून घ्या अगदी एकजीव होऊ द्या. नंतर उरलेलं दूध तापवा. चांगलं उकळू द्या. मग कस्टर्ड मिसळलेलं दूध गरम दुधात घालून तापवत रहा. गॅस बंद करा. दूध गार झाले की फ्रिजमध्ये ठेवा. ३ ते ४ तासांनी दूध थंड झाले की चिरलेली फळं त्यात मिक्स करा. आरोग्यदायी आणि स्वादिष्ट फ्रूट कस्टर्ड तयार.

रात्री घरातले सगळे गप्पा मारत बसले की मस्तपैकी बाउलमध्ये घालून सगळ्यांना सर्व्ह करा.

खादाडी




ठिपके जुळवा



दोस्त हे मस्त


## पांढरा हत्ती



मुलांनो, पांढरा शुभ्र हत्ती असतो. या हत्तीला 'अल्बिनो' असंही म्हणतात. पांढरा हत्ती ही दुर्मिळ प्रजाती आहे. त्यांची संख्या खूप कमी आहे. थायलंडमध्ये पांढरे हत्ती मोठ्या संख्येने आढळतात. म्हणून या देशाला 'पांढऱ्या हत्तींची भूमी' असं म्हटलं जातं. या हत्तींच्या त्वचेचा रंग लांबून पांढरा शुभ्र दिसत असला तरी त्याला लालसर राखाडी झाक असते. हे हत्ती भिजल्यावर त्यांची त्वचा गुलाबी रंगाची दिसू लागते. हत्ती हा बौद्ध धर्माचं प्रतीक मानला जातो. या हत्तींचा वापर राजेशाही समारंभांमध्ये केला जातो.

खादाडी

## चाकलेट करमल्स



चॉकलेट कोणाला आवडत नाही.चॉकलेटपासून मस्तपैकी 'चॉकलेट कॅरॅमल' हा पदार्थ तयार करता येईल. यासाठी एक चमचा बटर, एक कप साखर, पाऊण कप कॉर्न सिरप, चॉकलेटचे तुकडे (हे चॉकलेट गोड नसावं) दीड कप क्रीम हे साहित्य घ्या. एक ॲल्युमिनियम फॉईल घ्या. ही फॉईल पॅनवर पसरा. त्यावर बटर लावा आणि थोडा वेळ बाजूला ठेवा. आता एका सॉसपॅनमध्ये साखर, कॉर्न सीरप आणि चॉकलेट घाला. हे सगळं मिश्रण उकळा. यात अर्धा कप क्रीम घालून शिजवून घ्या. हे मिश्रण सतत हलवत रहा. आता त्यात अर्धा कप क्रीम घाला. आता हे सर्व मिश्रण ॲल्युमिनियम फॉईल लावलेल्या पॅनमध्ये घाला. साधारण पाच तास किंवा रात्रभर थांबा. आता चॉकलेट कॅरॅमल तयार आहे. या चॉकलेटच्या छोट्या वड्या करा. मित्रमैत्रिणींना खायला द्या.

स्टडी टिप्स

## मित्रमैत्रिणींसोबत सोडवा गणितं

मुलांनो, गणिताची भीती वाटत असेल तर काळजी करू नका. गणिताची आवड असणाऱ्या मित्रमैत्रिणींसोबत अभ्यास करा. एकत्र गणितं सोडवल्याने तुमची भीती कमी होईल. आपणही गणितं सोडवू शकतो, हा आत्मविश्वास मिळेल. गणिताची भीती घालवण्याचा हा खूप चांगला उपाय आहे. मित्रमैत्रिणींसोबत अभ्यास करताना तुम्हाला मजाही येईल आणि गणितंही झटपट सुटतील.



योगा टाईम


## पोटाच्या समस्या सोडवणारं उत्तान पादासन

दोस्तांनो, अधूनमधून तुमचं पोट दुखतं का, अपचनामुळे खूप त्रास होतो का, पोटाच्या समस्या दूर करण्यासाठी काही योगासनं करता येतील. उत्तान पादासन हे असंच एक योगासन आहे. या आसनामुळे पोटाला आराम मिळतो. पचनसंस्थेचं कार्य सुधारतं. यामुळे अन्न लवकर पचतं.



# कलासक्त

# महाकवी गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर



**एकदा जोराचे वादळ आले. वादळाने आसमंत दुमदुमले. सोसाट्याच्या वाऱ्याने पालापाचोळा गोलगोल फिरत होता. जोराचा पाऊस पडत होता. गुरूदेव त्या वादळात जमिनीवर मोकळ्या जागी मातीत बसले. त्यांनी आपल्या केसांच्या जटा सोडल्या. निसर्गाशी एकरूप झाले. वादळाबरोबर रवींद्रनाथही डोलू लागले. निसर्गाशी एकरूप झाले गुरूदेव समाधी लागली. वादळ शमले तसे गुरूदेव शांत झाले. ज्यांना गुरुदेव असे ही संबोधले जाते, हे एक ब्राह्मो पंथीय, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगीतकार, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी यांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात एक आमूलाग्र बदल घडून आला. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेलविजेते गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर यांचा ७ ऑगस्ट हा स्मृतिदिन.**

श्रीराम शेटये

बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रवींद्रोत्तर अशी विभागणी करण्यात येते; यावरून बंगाली साहित्यावरील रवींद्रनाथांचा प्रभाव लक्षात यावा. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहाला १९१२ या वर्षी साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले. त्यानंतर कोणत्याही भारतीय लेखकास हा मान मिळालेला नाही. यावरूनच रवींद्रनाथ टागोर यांचे मोठेपण सिद्ध होते. गुरुदेव टागोर यांना चित्रकला, शिक्षण आदी क्षेत्रांतही चांगली गती होती, जाण होती आणि त्या त्या क्षेत्रामध्ये त्यांनी भरीव कार्येही केली. टागोर यांनी काव्यप्रकार हाताळण्याबरोबरच 'नौकाडूबी', 'गोटा' यांसारख्या कादंबऱ्या, ग्रंथ, नाट्यलेखन, साहित्यशास्त्र, भाषाशास्त्र, भौतिकशास्त्र आदी. विषयांतही त्यांनी व्यापक लेखन व ग्रंथनिर्मितीही केली.

कोलकात्याच्या जोराशंका ठाकूर बाडी येथे रवींद्रनाथ टागोर (टोपणनाव : रवि) यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी झाला वडील देवेंद्रनाथ टागोर (१८१७–१९०५) व आई शारदा देवी (१८३०–१८७५) यांच्या १४ अपत्यांमध्ये रवींद्रनाथ हे १३ वे होते. ११ व्या वर्षी मुंज झाल्यावर रवींद्रनाथांनी वडीलांसोबत १४ फेब्रु. १८७३ रोजी भारतभ्रमणार्थ कलकत्ता सोडले. या भ्रमंतीत त्यांनी विविध जागा पाहिल्या. यात होते वडिलांची शांतिनिकेतन मालमत्ता (जेथे आजचे विश्वभारती विद्यापीठ आहे), अमृतसर व हिमालयातील थंड हवेचे ठिकाण डलहौसी इत्यादी. येथे रवींद्रनाथांनी विविध व्यक्तींची आत्मचरित्रे वाचली. इतिहास, खगोलशास्त्र, विज्ञान, कालिदासाचे काव्य व संस्कृत आदींचे अध्ययन केले. १८७७ साली प्रकाशित झालेल्या रचनांमुळे रवींद्रनाथ प्रथम लोकांसमोर आले. यात होत्या मैथिली कवी विद्यापतीप्रवर्तित शैलीत रचलेल्या काही दीर्घ कविता. विनोदाने रवींद्रनाथांनी प्रथम ह्या भानुसिंह नामक वैष्णव कवीने १७ व्या शतकात रचलेल्या व नंतर गहाळ झालेल्या रचना आहेत, असा आविर्भाव केला व नंतर त्यांचे कवित्व मान्य केले. याच काळात त्यांनी संध्या – संगित (१८८२), बंगाली भाषेतील पहिली लघुकथा "भिकारिणी" व सुप्रसिद्ध कविता "निर्झरेर स्वप्नभंग" आदी रचना लिहिल्या.

कोलकात्याच्या पिराली ब्राह्मण कुटुंबात जन्म झालेल्या रवींद्रनाथांनी प्रथम कविता वयाच्या ८ व्या वर्षी लिहिली. वयाच्या १६व्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपणनावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या.

शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांग्लादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे पृथ्वीवरील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला.

बॅरिस्टर होण्यासाठी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवीशिवाय ते बंगालला परतले. ९–नोव्हे.–१८८३ रोजी त्यांनी मृणालिनी–देवी(जन्मनावः भाबतारिणी १८७३–१९००)यांच्याशी विवाह केला. या विवाहापासून त्यांना पाच अपत्ये (पैकी दोघांचा बालमृत्यु) झाली. १८९० साली रवींद्रनाथांनी सध्याच्या बांग्लादेशातील सियाल्दा येथील ठाकूर घराण्याची मालमत्ता सांभाळण्यास सुरुवात केली. त्यांची पत्नी व मुले १८९८ साली येथे त्यांच्या सोबत आली. या काळात ते जमिनदार बाबु या नावाने ओळखल्या जात होते. हा काळ रवींद्रनाथांचा "साधना काळ" म्हणून ओळखला जातो. गल्पगुच्छ (मराठी अर्थ : कथा–गुच्छ) नावाचा ८४ कथा असलेली तीन खंडी रचना सिद्ध केली. आवेग व विरोधाभासयुक्त असे ग्रामीण बंगालचे सुरेख चित्र यात रवींद्रनाथांनी रेखाटले आहे.

**शांतिनिकेतन (१९०१ – १९३२)**

१९०१ साली रवींद्रनाथ सियाल्दा सोडून शांतिनिकेतन येथे राहण्यास आले. उद्देश होता एका आश्रमाची स्थापना. या आश्रमात त्यांनी एका प्रार्थना–गृहाची, प्रयोग–शील शाळेची, बागबगिचा व ग्रंथालयाची स्थापना केली. रवींद्रनाथांच्या पत्नीचा व दोन मुलांचा मृत्यु येथेच झाला. त्यांच्या वडिलांचे देहावसान १९–जाने–१९०५ ला घडले व वारसदार म्हणून त्यांना नियमित मासिक उत्पन्न मिळू लागले. याशिवाय त्यांना त्रिपुराचे महाराजांकडून आर्थिक साहाय्य, कौंटुबिक दागदागिने व पुरी,ओरिसा येथिल बंगला विकून काही प्राप्ती झाली. या काळात त्यांचे साहित्य बंगाली व विदेशी वाचकांचे आधिकाधिक लक्ष खेचु लागले होते. नैवेद्य (१९०१) व खेया (१९०६) या रचना या काळात प्रकाशित झाल्या. याशिवाय कवितांचा या नावाने अनुवाद करणेही सुरु होते. १४ नोव्हेंबर १९१३ रोजी स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार प्राप्त झाल्याची बातमी रविंद्रनाथांना समजली. गीतांजली या रचनेबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रविंद्रनाथांनीच केले होते. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने "सर" ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली.

१९२१ साली रविंद्रनाथ व कृषी–अर्थतज्ञ लिओनार्ड के एल्महिर्स्ट यांनी शांतिनिकेतनजवळील सुरुल येथे एका ग्रामीण पुनर्निर्माण संस्थेची स्थापना केली. याच संस्थेचे रवीन्द्रनाथांनी पुढे "श्री–निकेतन" असे नामकरण केले. श्री–निकेतनच्या माध्यमातून महात्मा गांधींच्या प्रतिकात्मक स्वराज्य चळवळीला पर्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. ज्ञानसंवर्धनातून अज्ञानी व असहाय्य ग्रामीण भागाची सुटका होईल या उद्देशाने त्यांनी विविध देशातील विद्वान, दाते व अधिका–यांस या उपक्रमात सहभागी करुन घेतले. १९३० सालापासून त्यांनी भारतातील पराकोटीच्या जातीयेतेविरुद्ध प्रचार सुरु केला. नाट्य–कविता यांद्वारे जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. केरळच्या गुरुवायुर मंदिरात दलितांना प्रवेश देण्यासाठी त्यांनी आवाहन केले.

रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रविंद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत.

**रविंद्रनाथ अनुवादित तुकारामांचे अभंग.**

कारवार येथील सृष्टीसौन्दर्यामुळे रवींद्रनाथांना आपल्या पहिल्या नाटकाची प्रेरणा मिळाली छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. रविंद्रनाथांचा नेता व क्रांतीकारक या रुपात भारतीय स्वातंत्र्य संग्रामात थेट सहभाग नव्हता म्हणून व त्यांच्या संस्कृतीपिपासू वृत्तीमुळे त्यांच्यावर महाराष्टात टीका झाली होती. रविंद्रनाथांच्या व्यक्तीमत्वाने काही महाराष्ट्रीयही प्रभावित झाले होते. रविंद्रसाहित्य मुळ बंगालीतून वाचण्याच्या इच्छेने पु.ल.देशपांडे यांनी बंगाली भाषा शिकली. मराठी व कानडी भाषेत लेखण केलेले व कानडी भाषेतील आधुनिक साहित्यातील सर्वश्रेष्ठ कवी व जन्माने महाराष्ट्रीय असलेल्या द.रा.बेन्द्रे यांच्या साहित्यावरही रविंद्रनाथांचा प्रभाव आहे.

पारंपारिक हैदा कोरिवकाम शैलीतील बंगाली लिपीतील रवींद्रनाथांची आद्याक्षरे "र–ठ" रवींद्रनाथ स्वतःची हस्तलिखिते अनेकदा अशा कलेने सजवत असत.

संगीत, साहित्य, तत्वज्ञान, चित्रकला, नृत्य, शिक्षण अशा बहुविध क्षेत्रात रविंद्रनाथांनी संचार केला. संख्या व दर्जा या दोन्ही कसोट्यांवर रविंद्रनाथांची निर्मिती उतरते.

रविंद्रनाथांच्या बहुमुखी निर्मितीत कविता जरी प्रमुख असली तरी त्यांनी कादंबऱ्या, निबंध, लघुकथा, प्रवासवर्णने, नाटके अशा बहुविध साहित्याची निर्मिती केली. यमकयुक्तता, आशावाद व गेयता ही त्यांच्या कृतींची प्रमुख वैशिष्ट्ये. कवितेनंतर रविंद्रनाथांची लघुकथा प्रमुख रचना मानली जाते. रविंद्रनाथ हे बंगाली भाषेतील आद्य लघुकथाकार. सामान्य माणसांचे जीवन हा त्यांच्या कथांचे कथाबीज आहे.

**काव्य** : १५–१६ व्या शतकातील वैष्णव रचनांचा रवींद्रनाथांवर प्रभाव होता. भारतीय परंपरेतील 'ऋषी' संकल्पनेचा ही रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव दिसून येतो. गावोगावी गीत गात फिरणाऱ्या फकिरसदृश 'बाऊल' कलाकारांची ग्रामीण बंगालमध्ये परंपरा आहे. बाऊल स्वतःस कोणत्याही एका धर्माचे मानत नाहीत. त्यांच्या गीतांत हिंदू, मुस्लिम अशा दोन्ही धर्मांची शिकवण दिसून येते. पारंपारिक रवींद्रनाथांनी या परंपरेस बुद्धीजीवी वर्तुळात पूर्वी नसलेली प्रतिष्ठा दिली. त्यांची बाऊल परंपरेच्या अभ्यासाने त्यांच्या स्वतःच्या काव्यकृतीस नवा आयाम मिळाला. 'मनेर मानुष' (मनातील माणूस) आणि 'जीवन देवता' ही दोन रुपके टागोरांच्या कवितेत बऱ्याचदा दिसतात.

**गीतांजलीतील चौथ्या कवितेचे (शीर्षकः प्रार्थना) मराठी भाषांतर**

**विपत्तीमध्ये तू माझे रक्षण कर**
**ही माझी प्रार्थना नाही;**
**विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये**
**एवढीच माझी इच्छा।**
**दु:खतापाने व्यथित झालेल्या माझ्या मनाचे**
**तू सांत्वन करावेस अशी**
**माझी अपेक्षा नाही.**
**दु:खावर जय मिळवता यावा**
**एवढीच माझी इच्छा ।**
**जगात माझे नुकसान झाले**
**केवळ फसवणूक वाट्याला आली;**
**तर माझे मन खंबीर व्हावे**
**एवढीच माझी इच्छा ।**
**माझे तारण तू करावेस वा मला तारावेस ही**
**माझी प्रार्थना नाही.**
**तरुन जाण्याचे सामर्थ्य माझ्यात असावे**
**एवढीच माझी इच्छा ।**
**माझे ओझे हलके करुन**
**तू माझे स्वांत्वन केले नाहीस तरी माझी तक्रार**
**नाही**
**ते ओझे वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी**
**एवढीच माझी इच्छा ।**
**सुखाच्या दिवसांत नतमस्तक होऊन**
**मी तुझा चेहरा ओळखावा**
**दु:खांच्या रात्री जेव्हा,**
**सारे जग फसवणूक करील,**

तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात शंका मात्र निर्माण होऊ नये, एवढीच माझी इच्छा ।

**कादंबऱ्या व इतर साहित्य** : रवींद्रनाथांनी 'चतुरंग', 'शेषेर कबिता' (शेवटच्या कविता), 'चार अध्याय', 'नौका डुबी', 'घरे बाईरे' या सारख्या ४ लघुकांदबऱ्या व ८ कादंबऱ्या लिहिल्या. 'चतुरंग' ही सचिश नावाच्या परस्परविरोधी संकल्पनांत अडकलेल्या पात्राची कहाणी आहे. धार्मिक गूढतेतून आयुष्याचा अर्थ शोधणाऱ्या कथानायकाचा अंती होणारा भ्रमनिरास टागोरांनी या कादंबरीतून मांडला आहे. गोरा कांदबरीतील मुख्य पात्र पारंपारिक हिंदू सनातनी मताचे समर्थक आहे. ह्या गौरवर्णीय पात्र व इतर पात्रातील संवादातून ही कांदबरी उलगडत जाते. सनातनी गोऱ्याच्या विचारामुळे त्याचे सनातनी वडिल प्रभावित होत नाहीत. धर्मांधता ही श्रद्धेमुळे नव्हे तर व्यक्तीच्या उग्र प्रकृतीने बनते असे टागोर या कादंबरीतून सांगतात. 'शेषेर कबिता' (शेवटच्या कविता) ही कवितेने नटलेली कादंबरी. 'रवींद्रनाथ ठाकूर' या स्वतःचेच नाव सांगणाऱ्या 'प्रसिद्ध कवी'वर टागोर त्रयस्थपणे यातून टीका करतात. 'चार अध्याय' ही रवींद्रनाथांची शेवटची कांदबरी. 'राष्ट्रभक्ती' म्हणजे काय?, राष्ट्र कसे बनते?, केवळ घोषणाबाजी, कठोर शिस्त यातून खरे स्वातंत्र्य शक्य आहे काय? अशा प्रश्नांचा धांडोळा ही कादंबरी घेते.

**रवींद्रसंगीत** : रवींद्रनाथांनी रचलेल्या व चाल दिलेल्या जवळपास २२३० गीतांना एकत्रितपणे रवींद्रसंगीत (बंगाली : असे संबोधले जाते. गगनेर खाले रबि चन्द्र दीपक ज्बले हे रवींद्रनाथांनी रचलेले पहिले व हे नूतन देखा दिक आरो बारो हे शेवटचे गीत मानन्यात येते. भारत व बांग्लादेश यांची राष्ट्रगीते असलेल्या जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना मूलतः रवींद्रसंगीताचा हिस्सा आहेत. सांगितिकदृष्ट्या अभिजात भारतीय संगीत, बंगाली लोकसंगीत व अभिजात पाश्चात्य संगीत ह्या रवींद्रसंगीताच्या प्रेरणा मानल्या जातात. अभिजात भारतीय संगीतातील ठुमरी शैलीचा रवींद्रसंगीतावर मुख्य प्रभाव आहे. ही गीते रवींद्रनाथांच्या स्वतःचे तत्वचिंतन दाखवत असली तरी त्यावर वैष्णव व उपनिषदीय तत्वज्ञानाचीही झलकही दिसते. रवींद्रसंगीतातील गीते ही विविध रागांमध्ये बांधण्यात आली असून रागाचा व गीताचा भाव यात सुसंगती असते. अनेक गीतांमध्ये विविध रागांना एकत्र बांधून नवसृजन केलेले दिसते. अभिजात भारतीय संगीतातून प्रेरणा घेतलेल्या रवींद्रसंगीत हे नंतर अनेक अभिजात भारतीय संगीताच्या गायकवादकांचे प्रेरणास्त्रोत ठरले. रवींद्रसंगीताने प्रभावित गायक–वादकात विलायत खान (सतार), अमजद अली खान (सरोद) आदींचा समावेश आहे.

**चित्रकला** : वयाच्या ६० व्या वर्षी रवींद्रनाथांनी चित्रे काढण्यास सुरुवात केली. द. फ्रान्स मधील कलाकारांच्या प्रेरणेवरुन त्यांच्या चित्रांची पॅरिस मधील पहिल्या प्रदर्शनासह युरोपभर अनेक प्रदर्शने झाली. आयुष्याच्या या काळात रवींद्रनाथांना रंगांधळेपणाचा त्रास सुरु झाला होता. सौंदर्यदृष्टी व रंगछटांमध्ये रवींद्रनाथांच्या चित्रशैलीची स्वतःची वैशिष्ट्ये आहेत. रवींद्रनाथांनी रचनेत वेगवेगळ्या शैलींचे अनुसरण केले. यात उत्तर आयर्लंडमधील मलनगान कारागिरीपासून कॅनडाच्या हैदा कोरिवकाम प्रकारापर्यंतच्या चित्र व शिल्पकलेतील शैली येतात. आपल्या कृतींची हस्तलिखितेही अनेकदा रवींद्रनाथांनी कलाकारीने सजवली आहेत.

**नाट्य** : वयाच्या विसाव्या रवींद्रनाथांनी 'वाल्मिकी प्रतिभा' नावाचे पहिले नृत्य–नाट्य लिहिले. यात भजनांच्या स्वरुपात असलेले पारंपारिक बंगाली कीर्तन व युरोपीय गीत–शैलींचा संमिश्र वापर केला आहे.ऐहिक सुखोपभोगांपासून पारमार्थिकाकडे हा विषय डाकघर नावाच्या नाटकात रवींद्रनाथांनी हाताळला आहे. 'अभिनयापेक्षा भावनांवर भर' असे रवींद्रनाथ स्वतःच्या नाटकांचे वर्णन करतात. 'चंडालिका', 'विसर्जन', 'चित्रगंदा', 'राजा', 'मायार खेला' ही रवींद्रनाथांची इतर नाटके. नाटकांसोबत टागोरांच्या 'नृत्य–नाटिका' विशेष प्रसिद्ध आहेत. मणिपुरी शैलीच्या अभिजात नृत्य शैलींचा टागोरांनी वापर केला आहे.

**लघु कथा** : 'गल्पगुच्छ'(कथागुच्छ) नावाचा रवींद्रनाथांचा ८४ लघुकथांचा ३ खंडी संग्रह प्रसिद्ध आहे. आजूबाजूचा परिसर, आधुनिक कल्पना व बौद्धिक कूटप्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न टागोर यांतून करतात. 'काबुलीवाला' या सुप्रसिद्ध प्रथमपुरुषी कथेत दूरदेशी असलेल्या आपल्या मुलीची आठवण कशी येत राहते हे अफगाण फळवाल्याच्या तोंडून टागोर सांगतात.

**राजकीय मते** : चरखा–पंथी असे संबोधून त्यांनी तत्कालिन स्वदेशी चळवळीची खिल्ली उडवली होती. ब्रिटिश साम्राज्यवादापेक्षाही 'सामाजिक अनारोग्य' त्यांना मोठा शत्रु वाटत असे. स्वयंसहायता व सर्वसामान्यांचा बौद्धिक उद्धार आदींवर त्यांचा जास्त भर होता. आंधळ्या क्रांतीपेक्षा सावकाश होणाऱ्या शैक्षणिक उत्क्रांतीवर त्यांचा जास्त विश्वास होता. या मतांमुळे रवींद्रनाथांना शारिरिक हल्ल्यांना सामोरे जावे लागले. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्यांकाडाचा निषेध म्हणून त्यांनी ब्रिटिश सरकारची सर्वोच्च पदवी परत केली. टागोरांनी रचलेली 'एकला चलो रे' व 'चित्त जेथा भयशून्य' ह्या दोन कविता भारतीय स्वातंत्र्य संग्रामात प्रेरणा गीते म्हणून वापरण्यात आल्या. महात्मा गांधींशी मतभेद असतानाही स्वतंत्र मतदारसंघाविषयी असलेला गांधी–आंबेडकर वाद मिटवण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

रवींद्रनाथांच्या आयुष्यातील शेवटची चार वर्षे प्रदीर्घ व्याधी व आजारपणांनी व्यापली. १९३७ साली शुद्ध हरपून ते बराच काळ कोमात होते. पुन्हा १९४० सालचा कोमा जीवघेणा ठरला. या शेवटच्या काळात लिहिलेल्या काव्यरचना रवींद्रनाथांच्या काव्यरचना सर्वश्रेष्ठ मानन्यात येतात.त्यांचे मृत्युविषयक चिंतन या रचनांतून प्रकटते. ७–ऑगस्ट–१९४१ रोजी रवींद्रनाथांचा कोलकात्याच्या त्यांच्या वडिलोपार्जित जोरशंका ठाकुर बाडी येथे मृत्यु झाला. भारताच्या ईतिहासात रवींद्रनाथ टागोर यांचे नाव सुवर्णक्षरात लिहिले गेले. ●●

# संगीतातील सर्वोच्च सन्मान 'संगीत महामहोपाध्याय' डॉ. भरत बलवल्ली यांना प्रदान!

राम कोंडीलकर

भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेचे शतकांपासून जतन आणि संवर्धन करणारी संस्था म्हणजे 'अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय'. यंदा या संस्थेच्या स्थापनेचा १२५ वर्षांचा प्रवास पूर्ण होत असताना, संस्थापक गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त हा सोहळा ऐतिहासिक तेजाने उजळून निघाला. १८ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता, नवी मुंबईतील तेरना सभागृहात पार पडलेला विशेष पदवीदान समारंभ म्हणजे फक्त पदव्यांचे वितरण नव्हते, तर ती एक सुरांची पवित्र यात्रा होती – ज्यात भारताच्या विविध प्रांतांतील गुणवंत विद्यार्थी, नामवंत कलाकार आणि रसिक एकत्र जमले होते.

या सोहळ्यात देशभरातून आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना संगीत विशारद आणि संगीत अलंकार या पदव्या प्रदान करण्यात आल्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या प्रख्यात भरतनाट्यम नृत्यांगना पद्मविभूषण विदुषी सोनल मानसिंह. याच प्रसंगी, संगीत क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा सन्मान –'संगीत महामहोपाध्याय' – डॉ. भरत बलवल्ली यांना प्रदान करण्यात आला. हा सन्मान म्हणजे केवळ एका कलाकाराचा गौरव नसून, भारतीय संगीतसाधनेच्या अध्यात्मिक प्रवासालाच दिलेली प्रतिष्ठा होती.

डॉ. भरत बलवल्ली हे केवळ गायक नाहीत; ते एका संगीतिक – आध्यात्मिक चळवळीचे प्रवर्तक आहेत. त्यांच्या गायकीत भारतीय रागांची अध्यात्मिक गूढता, श्रुतींचे वैदिक विज्ञान आणि स्वरांचा मंत्रोच्चार सामावलेला आहे. त्यांच्या अद्वितीय ग्रंथ रागोपनीषद मधून त्यांनी भारतीय रागदारी संगीतातील उपनिषदात्मक तत्वज्ञान जगासमोर मांडले आहे. जगभरातील मंचांवर सादर करताना त्यांनी दाखवून दिले की राग हे केवळ कलात्मक कौशल्य नसून, मानव – चेतनेला जागवणारे आध्यात्मिक साधन ठरू शकतात. डॉ. भरतजींच्या संगीतात भक्ती आहे, संवेदना आहे, आणि अंतर्मनाला स्पर्श करणारा साक्षात्कार आहे. म्हणूनच आज अनेक तरुण कलावंत व साधक त्यांच्याकडून प्रेरणा आणि मार्गदर्शन घेत आहेत. संगीताला त्यांनी केवळ कला म्हणून न सादर करता, आत्मशोधाचा मार्ग म्हणून स्वीकारले आहे. त्यांनी जागतिक स्तरावर मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या गायकीचे सामर्थ्यशाली पद्धतीने सादरीकरण करून, त्यांची शास्त्रीय गायकी जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवली आहे. त्यांच्या सादरीकरणातून दीनानाथांची स्वरप्रतिभा, गाम्भीर्य आणि भाववैभव सर्व श्रोत्यांपर्यंत दुमदुमले. हा प्रयोग म्हणजे एकाच वेळी परंपरेचा गौरव आणि जागतिक संगीतविश्वासाठी एक अमूल्य देणगी ठरली. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील त्यांची खयाल गायकी ही विलक्षण कलात्मकता आणि सामर्थ्य यांची जणू मूर्तप्रतिमा आहे. आलापातील गूढ विस्तार, तनांतील विलक्षण वेग, आणि सुरांच्या प्रत्येक वळणात उमटणारी अध्यात्मिक छटा यामुळे त्यांची गायकी एकाच वेळी गहन आणि जीवनस्पर्शी भासते. त्यांच्या स्वरांमधील अद्वितीय सामर्थ्यामुळे खयाल हा केवळ रागसंगीताचा प्रकार न राहता, तो आत्म्याच्या गाभाऱ्यातून उमटणारा मंत्रानुभव ठरतो. भगवान दत्तात्रेय आणि स्वामी समर्थ यांच्या उपासनेसह मंत्रशक्ती, योगतत्त्वे आणि स्वरशास्त्र यांचा त्यांनी अद्भूत संगम साधला आहे. त्यांच्या गायनातून एक झुळूक येते – जी सुरांसह अंतर्मनाला जागृत करते.



या सोहळ्याचा आणखी एक पैलू म्हणजे गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांच्या कार्याची स्मृती. त्यांनी १९०१ साली लाहोर येथे स्थापन केलेल्या गांधर्व महाविद्यालयाने संगीत शिक्षणाला संस्थात्मक व शिस्तबद्ध रूप दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे गुरुशिष्य परंपरेच्या चौकटीतून बाहेर पडून संगीत समाजाच्या घराघरात पोहोचले. भजन–कीर्तनापासून रागदारीपर्यंत त्यांनी संगीत सर्वसामान्यांपर्यंत नेले. आज १२५ वर्षांनंतरही गांधर्व महाविद्यालयाची परंपरा तेजाने झळकत आहे – आणि या परंपरेच्या सुवर्णपानांमध्ये डॉ. भरत बलवल्ली यांना मिळालेला सर्वोच्च सन्मान ही एक ऐतिहासिक घटना ठरली आहे. हा सोहळा म्हणजे शतकोत्तर परंपरा, आधुनिक दृष्टिकोन आणि अध्यात्मिक उंची यांचा संगम होता. पं. पलुसकरांची विचारधारा, गांधर्व महाविद्यालयाचा वारसा आणि डॉ. भरत बलवल्ली यांचे जागतिक कार्य एका व्यासपीठावर आले आणि संगीताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाणारा क्षण घडला. ●●




## राशीभविष्य

- **मेष :** घरात सणाचं आनंदाचं वातावरण राहील. विद्यार्थ्यांच्या कलांना वाव मिळेल. बाकी चिंता करू नये.
- **वृषभ :** खरेदीचा उत्साह राहील. मित्र-मैत्रिणी, आप्तेष्टांच्या भेटी होतील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **मिथुन :** दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. खर्च वाढला तरी प्राप्तीचं प्रमाण उत्तम राहील. मुलांची प्रगती होईल.
- **कर्क :** अनपेक्षित घटनांमुळे दिलासा मिळेल. खरेदीचे व्यवहार मार्गी लागतील. पित्ताचे विकार सतावतील.
- **सिंह :** कामाचं इतरांकडून कौतुक होईल. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **कन्या :** महत्त्वाच्या भेटीतून लाभ होईल. कुटुंबात उत्साह, आनंद राहील. ज्येष्ठांनी प्रकृतीकडे लक्ष द्यावं.
- **तूळ :** नव्या विचारांना चालना मिळेल. अचानक धनलाभाचे योग आहेत. विद्यार्थ्यांना नव्या संधी लाभतील.
- **वृश्चिक :** नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. उष्णतेच्या विकाराबाबत काळजी घ्या. प्रवास शक्यतो टाळावा.
- **धनु :** आर्थिक प्रश्नांमधून मार्ग निघेल. स्थावर प्रश्नात तडजोड हिताची ठरेल. मानसिक अस्वास्थ राहील.
- **मकर :** कामाचा उत्साह वाढता राहील. व्यवसायात उलाढाल मनाजोगी होईल. थोरांचा सहवाल लाभेल.
- **कुंभ :** नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. पूर्वीच्या ओळखी लाभदायक ठरतील. मानसन्मानाचे योग आहेत.
- **मीन :** आश्वासनं देताना विचार करा. बोलण्यातून गैरसमज संभवतात. प्रवास शक्यतो लाबणीवर टाका.

ब्युटी मंत्रा

## जादू फ्लॉवर फेशियलची

✻ जस्मिन फेशियल– जस्मिन म्हणजे मोगरा. चेहऱ्यावरील डाग दूर करण्यासाठी जस्मिन फेशियल महत्त्वाचं आहे.

✻ लव्हेंडर फेशियल– चेहऱ्यावर सुरकुत्या किंवा अ‍ॅक्ने असतील तर लव्हेंडर फेशियलची मदत घ्या. या फेशियलमध्ये लव्हेंडर ऑईलचा वापर केला जातो.

✻ सनफ्लॉवर फेशियल– सूर्यफुल फेशियल हे निस्तेज त्वचा उजळवण्यासाठी फायदेशीर ठरू शकतं.

फ्लॉवर फेशियल सुरुवातीला १५ दिवसातून एकदा करावं. त्यामुळे त्वचेला योग्य प्रमाणात पोषण मिळू शकतं. बजेट जास्त असेल तर ऑर्किड, लिलियम, बर्ड ऑफ पॅराडाईज अशा फुलांचं फेशियलही करता येणं शक्य आहे.

## ६ सप्टेंबर

दिनविशेष

- **१९६६ :** दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान हेन्ड्रिक व्हेरवोर्डची संसदेत भोसकून हत्या.
- **१९७० :** पॅलेस्टाईनच्या अतिरेक्यांनी युरोपमधून न्यूयॉर्कला निघालेल्या दोन विमानांचे अपहरण केले आणि ती जॉर्डनला नेली.
- **१९७१ :** भारतीय क्रिकेटपटू देवांग गांधीचा जन्म.
- **२०१३ :** तुरुंगात असणाऱ्या लोकप्रतिनिधींचा निवडणूक लढवण्याचा हक्क अबाधित ठेवणारे विधेयक लोकसभेत मंजूर.

टेक फन

## कसे काम करतात सेन्सर्स?

आपला स्मार्टफोन अनेक कामं करतो. स्मार्टफोनमध्ये असं काय असतं ज्यामुळे त्याचं काम सुरळीत सुरू राहतं? फोनमधली अ‍ॅप्स कशी चालतात? असे प्रश्न तुम्हाला पडत असतील ना? स्मार्टफोनमध्ये असलेल्या सेंसर्समध्ये याचं उत्तर दडलं आहे. या सेंसर्समुळे आपला स्मार्टफोन अगदी मस्त काम करतो. समजा तुम्ही स्मार्टफोनमध्ये कंपास नावाचं अ‍ॅप डाउनलोड केलं तर त्यामुळे फोन दिशा दाखवायला लागतो. ही सगळी फोनमधल्या सेंसर्सची कमाल असते. स्मार्टफोनमध्ये वापरल्या जाणाऱ्या सेंसर्सची माहिती घेऊ या.

✻ प्रॉक्सिमिटी हा सेंसर स्मार्टफोनमधल्या सेल्फी कॅमेऱ्याजवळ बसवलेला असतो. स्मार्टफोनच्या जवळ असलेल्या वस्तूची जाणीव या सेंसरमुळे स्मार्टफोनला होते. फोन आल्यानंतर किंवा बोलण्यासाठी फोन कानाला लावल्यानंतर या सेंसरमुळे स्मार्टफोनचा डिस्प्ले लाईट आपोआप बंद होतो.

(क्रमश:)

आरोग्यमंत्र

## गुणांचा खजिना कोरफड

अ‍ॅलोवेरा म्हणजेच कोरफड आपल्या घरामध्ये किंवा ऑफिसमध्ये विनासायास लावता येते. आजकाल लोवेराचे आरोग्याच्या दृष्टीने फायदे लक्षात येऊ लागले आहेत. त्यामुळे कोरफडीचा उपयोग रस किंवा जेल या दोन्ही प्रकारांनी केला जातो. दात घासल्यानंतरही दातांमध्ये प्लाक किंवा किटाणू राहतातच. त्यामुळे तोंडामधून क्वचित दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी येऊ नये यासाठी माऊथवॉश उपयोगात आणला जातो. लोवेराच्या रसाचा वापर देखील प्राकृतिक माऊथवॉश म्हणून करता येतो. या रसामुळे तोंडातील प्लाक आणि किटाणू दूर होऊन दातांचे आरोग्य चांगलं राहतं. लोवेराचा



वापर माऊथवॉश म्हणून केल्याने हिरड्याही बळकट होतात. कित्येकदा जेवण जास्त झाल्यामुळं, जेवणाच्या वेळा अनियमित असल्यामुळं किंवा जास्त तिखट, मसालेदार पदार्थ खाल्ल्याने छातीत जळजळ होते किंवा सिडीटी होते. अशावेळी लोवेराच्या रसाच्या सेवनानं फायदा होतो. छातीत होणारी जळजळ दूर होऊन सिडीटी ही कमी होते. तसंच दररोज सकाळी रिकाम्या पोटी कोरफडीचा रस कोमट पाण्यातून घेतल्यास पोट साफ होण्यास मदत होते. केस गळत असल्यास कोरफडीचा गर केसांना लावल्याने फायदा होतो. तसंच चेहऱ्यावर उष्णतेमुळं मुरुमं येत असल्यास लोवेराच्या गराचा फायदा होतो. या गराने त्वचेचा रंगही उजळतो. त्यामुळे पुष्कळशा स्कीन क्रीम्समध्ये लोवेराच्या गराचा अंश मिसळलेला असतो. लोवेराच्या गराच्या वापरानं वयपरत्वे त्वचेवर आलेल्या सुरकुत्याही कमी होतात आणि त्वचा सुंदर दिसू लागते.

### पंचांग

**शनिवार, ६ सप्टेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
भाद्रपद शु. १४ **(अनंत चतुर्दशी)**,
नक्षत्र : धनिष्ठा,
चंद्रराशी : मकर, योग : अतिगंड,
सूर्योदय : ६.२७, सूर्यास्त : ६.४७

### फॉरवर्डस

**सरे बाज़ार निकलूँ तो आवारगी क़ी तोहमत...**

**तन्हाई में बैठें तों इल्ज़ाम–ए–मोहोब्बत...!**

### भटकंती

✻ तुमच्याकडे ट्रॅव्हल क्रेडिट कार्ड किंवा कॅशबॅक कार्ड असेल तर ते बाहेर काढा. तुमच्याकडच्या कार्डचा योग्य वापर करा. ✻ राहण्यासाठी हॉटेल निवडताना खर्च कमी करण्यावर भर द्या. तुम्ही अपार्टमेंट किंवा इतर पर्यायांचाही विचार करू शकता. राहण्यावर जास्त पैसे खर्च होणार नाहीत याकडे लक्ष द्या. ✻ सध्या अनेक वेबसाईट्स आणि अ‍ॅप्स उपलब्ध झाले आहेत. त्यावर तुम्ही विमानाच्या तिकिटांच्या किंमतींची तुलना करू शकता. परदेशातली ट्रिप असेल तर अशी अ‍ॅप्स तुमच्या उपयोगी पडू शकतील. यामुळे स्वस्तातलं एखादं तिकिट तुम्हाला मिळू शकेल.

करिअरवाटा

## ‘सेल्फ प्रमोशन’गरजेचे

उत्तम कारकिर्द घडवण्यासाठी कामामध्ये अचूकता आणि कौशल्य असणं गरजेचं आहे. त्याचप्रमाणे ‘सेल्फ प्रमोशन’ ची कला अंगी बाणायला हवी. ‘सेल्फ प्रमोशन’ म्हणजे स्वत:ला सादर करण्याची कला. तुम्ही इतरांपुढे स्वत:ला कसं सादर करता यावर बरंच काही अवलंबून असतं. बरेचदा ‘सेल्फ प्रमोशन’कडे नकारात्मक दृष्टीने पाहिलं जातं. बरेचजण याला स्वार्थ समजतात. एखादी पुढे-पुढे करणारी व्यक्ती वरिष्ठांची चमचेगिरी करतेय असा काहीसा दृष्टिकोन निर्माण होतो. मात्र स्वत:ची पात्रता ओळखून ती समोरच्यापुढे मांडणं आणि कार्यक्षेत्रामध्ये तिची उपयुक्तता पटवून देणं ही विकासातली एक महत्त्वाची पायरी आहे.




कौशल्यपातळी उच्च असूनही आत्मविश्वासाअभावी स्वत:ला प्रेझेंट करण्यास उमेदवार कमी पडला तर अपेक्षित विकास साधू शकत नाही हेही एक सत्य आहे. म्हणूनच आपण केलेलं काम सर्वांसमोर मांडणं गरजेचं आहे.

तुमच्या अपेक्षा, भविष्यातील प्लॅन,अधिक शिक्षण घेऊन जास्त निपूण होण्याची महत्त्वाकांक्षा या सर्व गोष्टी वरिष्ठांपर्यंत पोहोचायला हव्यात. काम करूनही कामाचं श्रेय न घेणं हे अध्यात्मात ठीक आहे. वास्तव जीवनात हा भिडस्तपणा उपयोगी पडणार नाही हे लक्षात घ्या.

खेचाखेची

### घोर अपमान

मन्याचं वर्क फ्रॉम होम सुरू असतं.

**आई** – जा बाळा, बाजारातून जरा सामान घेऊन ये...

**मन्या** – आई , आत्ता क्लायंटचा कॉल आहे. नंतर जाऊ शकतो का ?

**आई** – ‘आय अ‍ॅम वर्किंग ऑन दॅट’ आणी ‘आय विल कम बॅक टू यू सून’, एवढंच बोलायचं आहे ना ? मी बोलते. तू सामान घेऊन ये!

### वेगळं काही

मध्यंतरी सोशल मिडियावर मुंगीचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. यात एक मुंगी हिरा उचलून नेत असल्याचं दिसत आहे. मुंगी हिरा चोरून नेत असल्याचं म्हटलं जात आहे. हा व्हिडिओ नेमका कुठचा आहे हे अजून स्पष्ट झालेलं नाही. तसंच हा हिरा मालकाला परत मिळाला आहे किंवा नाही याबाबतही काही पण यावर खूप मजेशीर प्रतिक्रिया येत आहेत. आता तर मुंग्यांवर विश्वास ठेवणं कठिण झालं आहे अशी प्रतिक्रिया एकाने व्यक्त केली आहे. तर ही मुंगी म्हणजे हॉलिवूडपटांमधली अँटमॅन आहे असं काहींचं म्हणणं आहे. तर आपल्या पत्नीच्या हिऱ्याच्या दागिन्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी तिच्यावर ही वेळ आली असल्याचंही काहींचं म्हणणं आहे.

स्मार्ट टिप्स

## कांद्याचे आहेत विविध फायदे

पावसाळ्याच्या दिवसात कांद्याचं सेवन प्रमाणात करण्याचा सल्ला ज्येष्ठ मंडळी देत असतात. पण कांदा इतर कारणांसाठीही उपयुक्त ठरतो. पुलाव किंवा भाताचा इतर कोणताही प्रकार करपला असेल तर बर्नरशेजारी कांदा ठेवावा; करपलेला दुर्गंध शोषला जाईल. कांदा मधोमध कापून घ्या. एक तुकडा ग्रिलवर घासा. ग्रिल स्वच्छ होईल. कांद्याच्या वासामुळे किडे, किटकांचा दंश टाळता येतो. किड्यांना लांब ठेवण्यासाठी अंगावर कांदा घासा. कांदा नैसर्गिक रिपेलंटचं



काम करतो. मधमाशीच दंश झाल्यानंतर वेदना आणि सूज कमी करण्यासाठी त्यावर कांद्याचे काप घासले जातात. किटकांच्या दंशामुळे होणाऱ्या वेदना कमी करण्यासाठी कांद्याचा वापर करता येईल. धातूचे पृष्ठभाग आणि भांडी चकचकीत करण्यासाठीही कांदा वापरता येईल. कांद्याच्या रसात सम प्रमाणात पाणी घाला. हे मिश्रण धातूच्या पृष्ठभागांच्या स्वच्छतेसाठी वापरा. कांद्याचा वापर करून गंजलेल्या सुऱ्याही स्वच्छ करता येतील. सुऱ्यांवर आणि त्यातही गंजलेल्या भागावर कांद्याचे काप घासा. काही वेळानंतर सुऱ्या पाण्याने स्वच्छ करा. सगळ्या सुऱ्यांची लकाकी परत येईल.

## सायकलिंग व्हॉमिटिंग सिंड्रोमविषयी...

आरोग्यवेध

उलटी ही तशी सर्वसामान्य बाब मानली जाते. एखाद्या व्यक्तीला उलटी झालीच तर त्याकडे फारसं गांभीर्याने पाहिलं जात नाही. घरगुती औषधांवर निभावून नेलं जातं. पण सलग दोन ते तीन वेळा उलटी झाल्यानंतर आपण त्यामागची कारणं शोधण्याचा प्रयत्न करतो. लहान मुलं किंवा प्रौढांना सतत उलटी होत असेल तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. कारण ही साधी उलटी नसून सायकलिंग व्हॉमिटिंग सिंड्रोम असू शकतो.

सायकलिंग व्हॉमिटिंग सिंड्रोम हा अत्यंत दुर्मिळ अशा आजार आहे. हा आजार लहान मुलांमध्ये अधिक प्रमाणातआढळून येतो. या आजारात सतत मळमळणं आणि उलट्या असा त्रास होत राहतो. यामुळे मुलांना काही खाताही येत नाही. या आजारामागचं नेमकं कारण सांगता येत नसलं तरी काही खाद्यपदार्थांच्या सेवनामुळे हा त्रासहोऊ शकतो. या आजारातपोटातही बऱ्याच वेदना होतात. चार ते आठ या वयोगटातल्या मुलांमध्ये सायकलिंग व्हॉमिटिंग सिंड्रोम आढळण्याचं प्रमाण बरंच जास्त असतं. अगदी सहा दिवसांच्या बाळापासून आठ वर्षांच्या मुलांपर्यंत हा आजार होताना दिसतो. प्रौढांना सत्तरीनंतर हा त्रास होऊ शकतो. मुलं मोठी झाल्यानंतर सायकलिंग व्हॉमिटिंग सिंड्रोम हा आजार बरा होण्याची शक्यता बरीच जास्त असते.

एका तासात पाचपेक्षा अधिक वेळा उलटी होणं, सकाळच्या वेळेत किंवा झोपून उठल्यानंतर उलटी होणं, उलट्यांसोबत मळमळणं, पोटदुखी आणि थकवा जाणवणं ही या त्रासाची लक्षणं म्हणता येतील. या त्रासामध्ये काही रुग्णांना ताप येऊ शकतो किंवा काहींची त्वचा पांढरी पडू शकते. ■

## पोटफुगीवर करा हे उपाय

आरोग्य चर्चा

अन्न आणि पचनाशी संबंधित समस्या आहे. जेव्हा आपल्या पोटात जास्त गॅस तयार होऊ लागतो, जेव्हा आपण वेगाने जेवतो किंवा आपल्याला एखाद्या गोष्टीची अलर्जी असते, तेव्हा पोट फुगते. याशिवाय, बद्धकोष्ठता आणि पचनाच्या समस्यांमुळे देखील फुगणे होऊ शकते.

**पण ते कसे बरे करावे?**

**बडीशेप:** बडीशेपमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात. ते पोट फुगण्याची समस्या कमी करण्यास मदत करतात. जर तुम्ही पाण्यात बडीशेप घालून ते उकळून दररोज पिण्यास सुरुवात केली, तर ते पोट निरोगी ठेवण्यास मदत करेल. यासोबतच, बडीशेपच हा तोंडाचीदुर्गंधी दूर करण्यासाठी देखील फायदेशीर आहे.

**जिरे आणि ओवा पाणी**

जिरे आणि ओवा पोटाच्या समस्येसाठी फायदेशीर असतात. पोटफुगीच्या समस्येपासून मुक्त होण्यासाठी, एका ग्लास पाण्यातअर्धा चमचा जिरे आणि सेलेरी घाला आणि ते उकळू द्या. पाणी अर्धे झाल्यावर गॅस बंद करा आणि हे पाणी चहासारखे प्या. या मुळे पोटफुगी कमी होण्यास मदत होईल.

**आले आणि हिंगपाणी**

जेव्हा जेव्हा एखाद्याला पोटाचा त्रास होतो तेव्हा तो हिंग खातो किंवा आल्याचा तुकडा चघळायला लागतो; पण जर तुम्ही हे दोन्ही पाण्यात उकळून ते पाणी प्यायले, तर पोटफुगीची समस्या दूर होऊ शकते. तसेच, पोटाशी संबंधित इतर समस्या दूर करण्यासाठी हा उपाय फायदेशीरआहे.

**या तेलाने करा मालिश**

तुम्ही तुमच्या पोटाच्या खालच्या आणि सुजलेल्या भागाला एरंडेल तेलाने मसाज करू शकता. हा उपाय पोटफुगीची समस्या अगदी सहजपणे दूर करू शकतो. थंड तेलाऐवजी कोमट तेल वापरणे चांगले.

**योगासनांचा सराव**


तुम्हाला पोटफुगीची समस्या असेल तर काही योगासनांचा सराव करू शकता. जे पोटफुगी कमी करण्यासाठी तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. ■

## सुडोकू १

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३ | ७ | ९ | | ८ | | १ | |
| ५ | | ८ | | | | | ९ | ३ |
| २ | | | १ | | ३ | | | |
| | | ४ | ५ | ९ | | | | |
| | ७ | २ | | | | ३ | ५ | |
| | | | | ३ | २ | ६ | | |
| | | | ३ | | ६ | | | ७ |
| ४ | ८ | | | | | २ | | ५ |
| | ९ | | ४ | | ५ | ८ | ६ | |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## शब्दकोडे क्रमांक १



**आडवे शब्द :–**
१) आदर्श दांपत्य
७) संत ज्ञानेशरांनी लिहिलेली प्रार्थना
१०) खिडकी
११) बोकड एडका
१२) नमस्काराचा एक प्रकार
१३) रेशीमाचे जाडसर कापड
१५) हिंमत, धैर्य
१७) वेळ
१८) चिंतन
२०) पिता, निर्माता
२१) यज्ञ
२२) लोणी
२५) च्या बरोबर
२६) छिद्र, दोष, न्यून
२७) परमेशर
२९) नंतर
३१) काळी मैना
३४) आवाज
३६) शिक्षक
३७) पत्र
३९) दात
४०) संस्थेचे धोरण ठरविणारा व चालविणारा
४१) जतन, काळजी
४२) सोन्याचा पर्वत
४४) प्रतिष्ठा, अब्रू
४६) बशीचा जोडीदार
४७) विविध
४८) बाई
५०) हात
५१) टणक
५४) नारायणराव पेशव्यांचे अखेरचे उद्गार
५७) शसनेंद्रिय
५८) माल साठविण्याची जागा
५९) प्रहर
६१) पृष्ठभागावरील छोटा तुकडा
६३) चेतक घोड्याचा मालक असलेला राजा ✻✻ ✻✻✻ सिंग
६५) नाचणी धान्याचे एक नाव
६६) संन्यासाचे निवासस्थान
६७) कट्टर, मताशी ठाम असलेला
६८) कमळ
७०) उपासना, प्रार्थना, पूजा
७१) अभिप्राय, हेतू, अर्थ
७३) वांती
७५) राजा
७६) समशेर
७७) अंग रगडणे, चोळणे


**उभे शब्द :–**
१) कपाळ
२) सुंदर, शहाणा
३) पोपट
४) पुरुन ठेवले द्रव्य
५) चालविणारा
६) पादत्राण
७) पळून जाणे
८) ✻✻ दाम दंड भेद
९) नेत्र
१२) सारखा
१४) सखी, मैत्रीण
१६) मध
१७) ठाणवई
१८) ✻✻ माऊ-मांजर
१९) मान खाली घालणे विनम्र होणे
२०) गरळ, विष
२३) छाती
२४) सरसकट
२५) संपूर्ण
२८) बाण
३०) मगज
३२) नमस्कार
३३) ढग
३५) पाहिला ऋतू
३६) धनी
३८) घोडे बांधण्याची जागा
३९) रचना करणारा
४२) लाकडाचा वा दगडाचा पातळ तुकडा
४३) अक्षरापुढची उभी रेघ
४४) आत्म्याचा दुसऱ्या शरीरात प्रवेश
४५) अनुती
४६) वैताग, बडबड
४८) चौक
४९) पुष्पगुच्छ
५०) केस
५२) हरभरा(हिं )
५३) त्वेष, आवेश
५५) माया, प्रे
५६) बातमी
६०) वंदनाचा एक शब्द
६२) सिंह
६३) पोपट
६४) वाचेच्या चार अवस्थेतील पहिली, श्रेष्ठ भक्ती
६५) समुद्रातील तांबड्या रंगाचा मासा
६७) तंबू, नाटक यामधील कापडी भिंत
६९) आयुष्य, पाणी
७०) करवत
७१) अजगर
७२) मृत्युराजा
७४) व्यापारी फायदा



# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



● १९२७ साली स्थापना केलेला भोईर परिवारांचा मु. नवखार-रोहा यांच्या निवासस्थानी विराजमान गणेश मूर्ती. (छायाचित्र- सत्यप्रसाद आडाव)



● प्रथमेश दत्ताराम पाटील मु. दिवी पारंगी (देखावा इको फ्रेंडली नारळाच्या झापानी आणि फळांनी बनवलेला आहे.)





● श्री. भालचंद्र अनंत मोकल मा. उपसरपंच वैशाली मोकल परिवार यांच्या निवासस्थानी.



● श्री. शशिकांत कमलाकर पाटील- पेझारी



● श्री. ओमकार रामेश्वर आमले व आमले परिवार यांच्या निवासस्थानी श्री गणेशाचे दर्शन घेताना चोंढी ग्रामस्थ.




● श्री. तुकाराम चांगू न्हावकर मु. न्हावे-रोहा यांच्या घरात विराजमान गणेशाची लोभस मूर्ती. (छायाचित्र- सत्यप्रसाद आडाव)



● माणगाव तालुक्यातील गांगवली मोकाशीवाडी येथील बाळकृष्ण सखाराम दाखिणकर यांच्या निवासस्थानी आकर्षक पर्यावरणपूरक सजावटीसह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र- सलीम शेख, माणगाव)



● चिरनेर येथील महाराष्ट्र शासनाच्या शेतीनिष्ठ पुरस्काराचे मानकरी प्रफुल्ल खारपाटील यांच्या निवासस्थानात प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या गणरायाच्या व गौराईच्या सुबक सुंदर मूर्तींचे दर्शन घेताना प्रफुल्ल खारपाटील यांची नात दिसत आहे. (छायाचित्र- प्रशांत खारपाटील)



● १८७३ साली बांधण्यात आलेल्या १ नंबर शाळेचे जुन्या कौलारु छत, लालसर भिंती आणि निळ्या दरवाज्यांची प्रतिकृती सजावटीतून साकारण्यात आली. बदलत्या काळासोबत शाळेचे रुपांतर झाले असले तरी विद्यार्थ्यांमध्ये रुजलेली मराठी भाषेची आणि शिक्षणाची उर्जा आजही तितक्याच जोमाने कायम असल्याचा भावपूर्ण संदेश गजानन पुळेकर भंडारवाडा मुरुड येथे या सजावटीतून देण्यात आला आहे. (छायाचित्र– सत्यप्रसाद आडाव)



● वसंत धर्मा घरत मु. वरसोली (ओमकार फ्रेंड सर्कल) ता. अलिबाग.




● शिवाज्ञा सौरभ शिवलकर, शिवलकर नाका, अलिबाग.

## नाईक शुक्ला यांच्यात टक्कर

**नवी दिल्ली :** बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण सभा या महिन्याच्या अखेरीस होत आहे. बीसीसीआय आणि आयपीएल अध्यक्षपद रिक्त होत असल्यामुळे या दोन महत्त्वाच्या पदी कोणाची नियुक्ती होणार, याची उत्सुकता आहे. रिक्त होणाऱ्या या पदासाठी मुंबई क्रिकेट संघटनेचे संजय नाईक यांच्या नावाची चर्चा आहे. बीसीसीआयचे विद्यमान उपाध्यक्ष राजीव शुक्ला हेसुद्धा शर्यतीत असतील.



● श्री. गितेश भायतांडेल मु. न्हावे-रोहा यांच्या घरातील गणेशमूर्ती. (छायाचित्र- सत्यप्रसाद आडाव)



● मजूर फेडरेशन अध्यक्ष हेमंत ठाकूर मु. यशवंतखार-रोहा यांच्या निवासस्थानी साकारलेल्या आरासात गणेशमूर्ती. (छायाचित्र- सत्यप्रसाद आडाव)

## जोकोविच उपांत्य फेरीत पोहोचला

**नवी दिल्ली :** टेनिसपटू नोवाक जोकोविचने यूएस ओपन २०२५ च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत त्याने टेलर फ्रिट्झचा पराभव केला. हा त्याचा १४ वा यूएस ओपन उपांत्य फेरी आहे. या विजयासह, त्याने कॉनर्सच्या सर्वाधिक १४ वेळा यूएस ओपन उपांत्य फेरी गाठण्याच्या विक्रमाची बरोबरी केली.



● मुरुड-मजगांव येथील ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच योगेंद्र गोयजी यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाला वंदन करताना बच्चे कंपनी. (छायाचित्र : राजीव नेवासेकर)



● श्री.प्रशांत प्रभाकर पाटील व कुटूंबीय यांचे भोगेश्वर आळी, मुरूड ता.मुरूड जि.रायगड येथील निवासस्थानी विराजमान श्रीगणेश मूर्ती व श्री विठ्ठलावरील सुंदर देखावा.



● सागर गजानन घाटकर (वाडगाव)

## अनुजा गोगरने पटकाविले रौप्यपदक

**आगरदांडा :** महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स असोसिएशनने राज्यस्तरीय ॲथलेटिक स्पर्धांचे आयोजन केले होते. जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या, महाराष्ट्र राज्यातील विविध भागातील स्पर्धक सहभागी झाले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेत जिंदाल माध्यमिक विद्यालय साळाव येथे शिकणारी अनुजा गोगर विद्यार्थीनी स्पर्धेत सहभागी झाली होती. या राज्यस्तरीय भालाफेक स्पर्धेत अनुजाने रौप्य पदकावर आपले नाव कोरले. या भरीव यशाबद्दल तालुक्याचे गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ आणि गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी शिक्षण विभागातर्फे अभिनंदन केले.



## मुलींचे प्रशिक्षण शिबीर

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पंधरा वर्षाखालील मुलींचे प्रशिक्षण शिबीर कळंबोली येथील किशोर गोसावी यांच्या स्पोर्टी–गो क्रिकेट अकॅडमी येथे संपन्न झाले.

२३ ऑगस्ट व ४ सप्टेंबर अशा दोन दिवसीय क्रिकेट शिबिरामध्ये रायगड जिल्ह्याच्या संघामध्ये निवड झालेल्या २३ मुलींनी सहभाग घेतला होता. प्रशिक्षण शिबिरामध्ये मुलींना फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण व यष्टिरक्षणाचे धडे तज्ञ प्रशिक्षक नयन कट्टा, विनय पाटील, देवदत्त शास्त्री यांच्याकडून देण्यात आले.

## पीएनपीच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली होती.



पीएनपी होली चाईल्ड स्कूल वेश्वी अलिबाग शाळेतील विद्यार्थी शिव शिवराम निर्मल रायगड जिल्हा मॅरेथॉन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, होली चाईल्ड एसएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले व उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा मार्गदर्शक अक्षय डाकी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)